


सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २०३ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



क्वॉलिफायर २




मुंबई इंडियन्स वि. पंजाब किंग्ज

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद

## विचारपुष्प



संघाचे कार्य वाढत आहे; गरज आहे ती गती वाढवण्याची. प्रत्येक स्वयंसेवकाने संघकार्याला प्राधान्य दिल्यानेच कार्याला गती प्राप्त होईल. विद्यार्थी असो, गृहस्थ असो किंवा संन्यासी, प्रत्येक स्वयंसेवकाने हे स्वीकारले पाहिजे की, संघकार्य महत्त्वाचे आहे, बाकी सर्व गौण आहे. जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होईल, तेव्हा संघकार्य वेगाने वाढेल.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
चतुर्थ सरसंघचालक


# 'सिंदूर' ठरले शौर्याचे प्रतीक

## पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन ● गोळीला उत्तर मिळेल गोळ्याने

◆ **भोपाळ, ३१ मे**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला उत्तर देताना भारताने राबवलेले ऑपरेशन सिंदूर हे शौर्याचे प्रतीक ठरले आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले. आता गोळीला उत्तर गोळ्याने दिले जाईल, असा इशारा त्यांनी पाकिस्तानला दिला.

ऑपरेशन सिंदूर ही देशाच्या इतिहासातील आजवरची सर्वांत मोठी आणि सर्वांत यशस्वी दहशतवादविरोधी कारवाई ठरली आहे. सिंदूर हे आता देशाच्या शौर्याचे प्रतीक झाले आहे. तुम्ही गोळी झाडाल, तर त्याला तोफेच्या गोळ्याने उत्तर दिले जाईल, हे लक्षात ठेवा, असे नरेंद्र मोदी यांनी अहल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आयोजित लोकमाता देवी अहल्याबाई महिला सशक्तीकरण महासंमेलनाला संबोधित करताना सांगितले.



अहल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

भारत हा एक परंपरा आणि संस्कृतीचा देश आहे आणि आपल्या संस्कृतीत सिंदूर हे महिला शक्तीचे प्रतीक आहे. रामभक्तीत मग्न असलेले हनुमानजीही सिंदूर धारण करतात. शक्ती पूजेत आपण सिंदूर अर्पण करतो. हे सिंदूर आता शौर्याचे प्रतिक झाले आहे, असे मोदी म्हणाले.

पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केवळ भारतीयांचा रक्तपात नव्हे तर त्यांनी आपल्या संस्कृतीवर हल्ला केला. त्यांनी आपल्या समाजात दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे त्यांनी भारतातील महिला शक्तीला आव्हान दिले होते. हे आव्हान अतिरेकी आणि त्यांच्या सूत्रधारांसाठी मृत्युघंटा ठरले. आपले लष्कर अतिरेकी अड्डे उद्ध्वस्त करेल, असा विचारही पाकिस्तानी लष्कराने केला नव्हता, असे मोदी म्हणाले.

### पृथ्वीला फेरा घालणाऱ्या महिला अधिकाऱ्यांचे कौतुक

नौदलाच्या दोन धाडसी कन्यांनी २२० दिवसांचा सामुद्री प्रवास पूर्ण केला, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौकेद्वारे जगाला फेरा घालणाऱ्या लेफ्टनंट कमांडर रूपा ए आणि त्यांच्या सहकारी लेफ्टनंट कमांडर दिलना के. यांचे कौतुक करताना सांगितले. ■

### महिला खासदारांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न

सध्या संसदेत ७५ महिला खासदार आहेत. हा आकडा वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे. नेमका हाच नारीशक्ती वंदन अधिनियमाचा आत्मा आहे. संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिला आरक्षण आता साध्य झाले आहे, जे बऱ्याच काळापासून प्रलंबित होते, असे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# थायलंडची ओपल सुचता बनली मिस वर्ल्ड २०२५

- भारताची नंदिनी गुप्ता टॉप-२० मध्ये
- भारताकडे सर्वाधिक ६ मिस वर्ल्ड किताब




**हैदराबाद, ३१ मे-**

थायलंडच्या ओपल सुचता हिने मिस वर्ल्ड २०२५ चा किताब जिंकला आहे. या वर्षी हैदराबादमधील हायटेक्स एक्झिबिशन सेंटरमध्ये अंतिम फेरी पार पडली. भारताची नंदिनी गुप्ता १०८ देशांतील स्पर्धकांशी स्पर्धा करून टॉप-२० मध्ये पोहोचली, परंतु ती टॉप-८ मधून बाहेर पडली.

अंतिम फेरीची सुरुवात टॉप-४० स्पर्धकांच्या सांस्कृतिक रॅम्प वॉकने झाली ज्यामध्ये भारताची नंदिनी गुप्ता शो-स्टॉपर होती. ७२ वर्षांच्या इतिहासात भारताने सर्वाधिक मिस वर्ल्ड किताब जिंकले आहेत. रीता फारिया, ऐश्वर्या राय, प्रियांका चोप्रा, युक्ता मुखी, डायना हेडन आणि मानुषी चिल्लर देखील मिस वर्ल्ड राहिल्या आहेत.

## हिजबुल्लाहचा सर्वोच्च कमांडर हल्ल्यात ठार

**जेरुसलेम** : इस्रायली सैन्याला लेबनॉनमध्ये आणखी एक मोठे यश मिळाले आहे. हवाई हल्ल्यात हिजबुल्लाहचा सर्वोच्च कमांडर मारला आहे. दक्षिण लेबनॉनमध्ये मोहम्मद अली जमौलला ठार मारले आहे. जमौल हा दक्षिण लेबनॉनच्या देर अल-जहरानी प्रदेशातील रॉकेट ॲरेच्या शाकीफ क्षेत्राचा कमांडर होता. कमांडर मोहम्मद अली जमौल संपूर्ण युद्धात इस्रायली नागरिकांवर आणि आयडीएफ सैनिकांवर अनेक रॉकेट हल्ल्यांसाठी जबाबदार होता.

## महत्त्वाचे

### वैष्णवीचे नऊ महिन्यांचे बाळ वाढणार आता आजोळकडे

**पुणे** : कुटुंबातील वादाचा, फाटाफुटीचा सर्वात जास्त फटका बसत असतो तो लहान मुलांना. आई- वडिलांचे प्रेम मिळणे हा बाळाचा नैसर्गिक हक्कच असतो आणि तो हिरावून घेण्याचा अधिकार कुणालाही नाही. पण, समाजातील पांढरपेशे पैशाच्या मोहापायी हे सर्व विसरतात. सासरच्या त्रासाला कंटाळून मृत्यू पत्करलेल्या वैष्णवी हगवणेच्या अवघ्या नऊ वर्षीय बाळाचा हा हक्क हिरावल्या गेला आहे. त्याचा ताबा वैष्णवीच्या आईकडे दिला आहे. वैष्णवीची आई स्वाती कस्पटे यांच्या घरातील कौटुंबिक आणि भावनिक वातावरण बाळाच्या हितासाठी अनुकूल असल्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. बाळाचा सांभाळ आणि संगोपनासंदर्भात अधिकाऱ्यांनी केलेल्या सामाजिक तपासणीनंतर दिलेल्या अहवालात कस्पटे कुटुंबातील वातावरण बाळासाठी योग्य असल्याचे म्हटले आहे. त्याच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी वैष्णवीची आई स्वाती आणि वडील सोपविण्यात आली आहे.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर चित्रपट

## ● चौंडीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा

**अहिल्यानगर, ३१ मे**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर चित्रपट काढण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडी येथे केली. अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त चौंडी येथे आज भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास छावा चित्रपटातून समोर आला, त्याच धर्तीवर अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी जीवनावर चित्रपट तयार करून तो जनतेसमोर आणण्यात येईल, असं फडणवीस यांनी स्पष्ट केलं. या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण देण्यात आलं होते पण त्यांचा भोपाळ येथे कार्यक्रम असल्याने ते येऊ शकले नाहीत, असे त्यांनी सांगितले.

अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करताना फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर लोककल्याणकारी राज्य चालवणाऱ्या शासकांमध्ये अहल्यादेवींचं नाव अग्रस्थानी आहे. त्यांनी तब्बल २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी अत्यंत बलशाली तोफखाना उभारला होता, त्यामुळे त्यांच्या राज्यावर कोणाचीही हल्ला करण्याची हिंमत झाली नाही.


# सहा लढाऊ विमाने पाडल्याचा पाकिस्तानचा दावा खोटा

### सीडीएस अनिल चौहान यांची स्पष्टोक्ती

**सिंगापूर, ३१ मे**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताची लढाऊ विमाने पाडल्याचा पाकिस्तानने केलेल्या दाव्याची पोलखोल सीडीएस अनिल चौहान यांनी येथील शांग्री-ला चर्चेदरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत केली. भारताची सहा राफेल लढाऊ विमाने पाडल्याचा पाकिस्तानी दावा त्यांनी फेटाळला. आपली विमाने का पडली यापेक्षा पुढे उत्कृष्ट रणनीती तयार होऊ शकते, हे समजणे जास्त गरजेचे आहे, असे चौहान यांनी सांगितले.

आमची लढाऊ विमाने पडली हा प्रश्न महत्त्वाचा नाही, तर त्यांनी उड्डाण का केले, हे अतिशय महत्त्वाचे आहे. रणनीतीच्या पातळीवर आमची झालेली चूक आमच्या लक्षात आली, ही सर्वांत चांगली बाब आहे. ती चूक आता सुधारण्यात आली. यानंतर आम्ही दोन दिवसांनंतर ती रणनीती लागू केली आणि लढाऊ विमाने उडवून दीर्घ पल्ल्यावर हल्ला केला, असे अनिल चौहान यांनी सांगितले. पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केलेला दावा त्यांनी पूर्णतः फेटाळला. आमची विमाने पडली किंवा नाही, हे अजिबात महत्त्वाचे नाही, त्यानंतर आम्ही काय केले, ते महत्त्वाचे आहे. युद्धात नुकसान होणे ही सामान्य बाब आहे. मात्र, आमचे सर्व वैमानिक सुरक्षित परतले आहेत. असे सीडीएस अनिल चौहानयांनी मुलाखतीत सांगितले.



# दहिटणे येथील लक्ष्मी नगरात गॅसचा स्फोट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

दहिटणे येथील लक्ष्मी नगर शनिवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास गॅसचा स्फोट होऊन घरगुती साहित्य जळून खाक झाले. या घटनेत कोणतीही मनुष्यांनी झाली नाही.



अमीर जहागीर पठाण हे दहिटणे परिसरातील लक्ष्मी नगरात राहण्यास आहेत. त्यांचे घर पत्राचे आहे. शनिवारी सायंकाळी सात वाजण्याची सुमारास त्यांच्या पत्नी घरात स्वयंपाक करीत होत्या. स्वयंपाक सुरू असतानाच अचानक गॅस लिक होऊन आग लागली. यामुळे पठाण यांच्या घरातील सर्व जण घाबरून गेले होते. त्यांनी सुरुवातीला गॅस लिक होऊन लागलेली आग नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. परंतु आग भडकत गेल्याने त्यांनी अग्निशामक नियंत्रण कक्षाला याबाबतची माहिति दिली. यानंतर काही वेळातच तेथे दाखल झालेल्या अग्निशामक विभागाच्या जवानांनी पाणी मारून आग नियंत्रणात आणली. यादरम्यान घरातील धान्य तसेच संसारोपयोगी वस्तू आगीत जळून खाक झाले. या आगीत नेमकं किती नुकसान झालं याबाबतचा अंदाज आला नसल्याचे अग्निशामक विभागाकडून सांगण्यात आले. याप्रकरणी पोलिसात तक्रार नोंदणीचे काम सुरू होते.

# विनयभंगाच्या गुन्ह्यातील अटक आरोपीचे पलायन

### जेलरोड पोलिस ठाण्याच्या आवारात शनिवारी मध्यरात्री घडली घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ मे -**

एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या विनयभंगाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीला जेलरोड पोलिस ठाण्यातील लॉक अप येथे जमा करण्यासाठी आल्यानंतर आरोपी पोलिस कर्मचाऱ्यांची नजर चुकवून पळून गेला. ही घटना शनिवारी मध्यरात्री १ च्या सुमारास घडली असून याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रफिक अशपाक शेख (वय २६, रा. ८२१, सोना नगर, भवानी पेठ, हनुमान मंदीर शेजारी, सोलापूर सध्या रा. प्लॉट नं. १९, सुमय्या नगर, उमर खलिफा मशिदशेजारी, नई जिंदगी, सोलापूर) याच्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून रफिक शेख याच्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गु. र. नं. ८२१/२०२४ नुसार गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील पिडीतने पुन्हा गु. र. नं. ४७८/२०२५ नुसार विनयभंगप्रकरणी दुसरा गुन्हा दाखल केलेला आहे. त्यामुळे एमआयडीसी पोलिसांकडून रफिक शेख यास ३० मे २०२५ रोजी रात्री साडेबारा वाजता गुन्ह्यात अटक करण्यात आली. अटकेनंतर या आरोपीची नियमाप्रमाणे शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करून त्यास सुरक्षितेकरीता जेलरोड पोलस ठाण्याच्या आवारात असलेल्या लॉकअपमध्ये जमा करण्यासाठी एमआयडीसी पोलिस ठाण्यातील कर्मचारी हवादलार संजीवकुमार भालेराव व शिंदे हे सरकारी वाहनातून गेले होते. आरोपीला जेलराड पोलस ठाण्यातील ठाणे अंमदार कक्षासमोर भालेराव यांच्या ताब्यात देऊन लॉकअपमध्ये जमा करण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे घेऊन शिंदे हे ठाणे अंमलदार यांच्याकडे गेले होते. त्यावेळी भालेराव यांची नजर चुकवून आरोपी शेख हा पळून गेला. त्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांनी आरोपीची शोधाशोध केली, परंतु तो मिळून आला नाही. त्यामुळे याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# रोटरी नॉर्थच्या कार्याचे पैलू वाखाणण्याजोगे : भाग्यश्री जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

रोटरी नॉर्थ नेहमीच समाज उपयोगी कार्यात अग्रेसर आहे त्याचेच हे उदाहरण. या लोकांनी आपल्या क्षेत्रातील कामाची फक्त नोकरीसाठी नाही तर कर्तव्य, जबाबदारी आणि तळमळ दाखवून दिली. असे प्रतिपादन राज्य उत्पादन शुल्कच्या अधिक्षक - भाग्यश्री जाधव यांनी केले. येथील रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ तर्फे समाजाभिमुख अलौकीक कार्य सेवा वृत्तीने करणाऱ्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना 'रोटरी गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले.

त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. हे पुरस्कार अनुक्रमे डॉ. अरुंधती हराळकर, शोभा मोरे, डॉ वैशाली शिरशेट्टी परिमल भंडारी आणि ॲड. विकास कोडमुर यांना प्रदान करण्यात आले. प्रास्ताविक रोटे वंदना कोपकर यांनी केले . पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा परिचय अनुक्रमे मधुरा वडापूरकर, आसावरी सराफ, दीपक आहुजा यांनी करून दिला. भाग्यश्री जाधव यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले. रोटरी नॉर्थया अध्यक्षा डॉ जानवी माखिजा यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल देऊन सत्कार केला तर संचालक सुनील दावडा यांनी स्मृती चिन्ह देऊन सन्मान केला. कार्यक्रमाचे संयोजक सुनील दावडा यांनी उपस्थितांचे आणि मान्यवरांचे आभार मानले तर सूत्रसंचालन स्वप्नील कोंडगुळे यांनी केले. कार्यक्रमास सुनील दावडा, जयेशभाई पटेल, अण्णासाहेब कोटली हरेश पटेल, धनश्री केळकर, सीताराम महांकाळ, प्रशांत अपराध, संतोष सपकाळ, युगंधर जिंदे, बाळासाहेब शितोळे, कीर्ती दावडा, क्षितिजा गाताडे, योगिता बोधले, सौ व श्री.बळीराम पावडे आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ महिलेची फसवणूक; अशिक्षितपणाचा फायदा घेत बँकेतील ६ लाख घेतले काढून

● दीर, जाऊ, पुतण्यासह पाचजणांवर सदर बझार पोलिसात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

ज्येष्ठ महिलेच्या अशिक्षित पणाचा फायदा घेत चक्क दिरानेच घर नावावर करून घेतले. व्यवहारापोटी ठरलेली सहा लाखाची रक्कम सोलापूर जनता बँकेत जमा केली होती. ती रक्कम ही आरोपींनी फिर्यादीला दिली नाही. स्वतःच काढून घेत फसवणूक केली. याप्रकरणी दीर, जाऊ व पुतण्या,भाचा यांच्यासह पाच जणांवर फसवणुकीचा गुन्हा सदर बझार पोलिसांत दाखल झाला आहे.




याबाबत विजयालक्ष्मी नागनाथ बोगा (वय ६४ रा. जोडभावी पेठ,सोलापूर )यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नागनाथ भुमय्या बोगा, पुष्पावती नागनाथ बोगा, गूपेश नागनाथ बोगा,प्रशांत दशरथ कुडक्याल, राजेश चिप्पा अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. ही घटना १८ मार्च २०२४ ते आजतागायत दुय्यम निबंधक कार्यालय,उत्तर सोलापूर व जनता बॅक पाच्छा पेठ सोलापूर याठिकाणी घडली आहे. १८ मार्च २०२४ रोजी विजयालक्ष्मी वडीलांचे वर्ष श्राध्द असल्याने त्या भाऊ दशरथ कुडक्याल यांच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी विजयालक्ष्मी बोगा यांचे दिर नागनाथ,जाऊ पुष्पावती, पुतण्या भूपेश,भाचा प्रशांत व नातलग राजेश चिप्पा यांनी संगनमत केले. काम असल्याचा बहाणा करून फिर्यादीस पाच्छा पेठ येथील सोलापूर जनता बॅंकेत घेवून गेले. फॉर्मवर विजयालक्ष्मी यांचे अंगठे घेवून त्याचे नावे बॅंकेत खाते उघडले. त्यानंतर फिर्यादीच्या मयत पतीच्या नावे शासनाकडून पैसे मिळणार आहेत,जिल्हा परिषद येथे सर्व काम झाले आहे. आपणास कार्यालयात जावून फक्त सह्या करायच्या बाकी आहेत. असा बहाणा केला. विजयालक्ष्मी यांना रजिस्टर कार्यालयात नेले. अशिक्षित पणाचा फायदा घेत मनपा हद्दीत असलेले तिचे घर आरोपींनी खरेदी करून नागनाथ व पुष्पावती यांच्या नावावर करून घेतले. त्यानंतर सदर दस्तमध्ये व्यवहारापोटी ठरलेली सहा लाखाची रक्कम फिर्यादीच्या जनता बॅंकेत जमा केल्याचे दाखवले. मात्र ती रक्कम आरोपीनी फिर्यादीच्या संमतीविना २७ मार्च, ३० मार्च व ३ एप्रिल २०२४ रोजी जनता बॅंकेच्या खात्यावरून परस्पर काढून घेतली,ती रक्कम फिर्यादी महिलेस न देता फसवणूक केली असल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. याप्रकरणाचा तपास सहा पोलिस निरीक्षक जगताप करीत आहेत.

# अवकाळी पावसामुळे एसटीच्या १०५ फेऱ्या रद्द

● पाच दिवसात सहा लाखांचे नुकसान
● गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

राज्यात तसेच सोलापूर शहर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत सलग सुरू असलेल्या पावसामुळे पाच दिवसांच्या कालावधीत एसटी बसच्या १०५ फेऱ्या रद्द झाल्या आहे. त्यामुळे १८ हजार ८१३ किमीचा प्रवास रद्द होऊन सोलापूर एसटी आगाराचे पाच लाख ८२ हजार इतके नुकसान झाले आहे.

सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रात २० मे पासून पावसाला सुरुवात झाली. २९ मेपर्यंत सलग पाऊस पडल्याने जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी जमले होते. बऱ्याच ठिकाणी पाण्यामुळे एसटीच्या फेऱ्या रद्द करण्याची वेळ एसटी प्रशासनावर आली. बार्शी, अक्कलकोट, कुईवाडी, माळशिरस, मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळसह अन्य आगारातील तालुक्यांतील व ग्रामीण भागातील एसटीच्या फेऱ्या पावसामुळे रद्द करण्यात आल्या. अनेक ठिकाणी पाणीं इंजिनला लागल्याने एसटी बसेस या बंद पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. पावसामुळे काही एसटी बसेसला नियोजित ठिकाणी पोहोचण्याकरिता उशीर झाल्याने बहुतांश गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले होते.

सोलापूर आगारातील एसटी बस २७ मे रोजी बार्शीच्या दिशेने रवाना झाली होती. बार्शी शहरापासून दोन किमी अंतरावर असलेल्या रेल्वे पुलाखाली बस अडकली. बसमध्ये पाणी शिरल्याने ती बंद पडली होती, त्यामुळे या मार्गावरील फेऱ्या रद्द केल्या होत्या. जिल्ह्यात अन्य ठिकाणच्या फेऱ्याही रद्द केल्या होत्या.

**अवकाळी पावसाने उत्पन्नावर परिणाम :** राज्यात तसेच सोलापूर शहर व जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाला. यामुसळधार पावसामुळे ग्रामीण भागातील रस्ते खराब झाले होते. या रस्त्यांवर पाणी साचल्याने एसटीची सार्वजनिक वाहतूक कोलमडली. भिगवण सारख्या अनेक सखल भागात व रोडवर पाणी साचल्याने एसटीची वाहतूक सुरळीत करता येत नव्हती. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी व एसटीचे नुकसानही होऊ नये, म्हणून पाच दिवसांत काही भागांतील १०५ फेऱ्या बंद केल्या होत्या.
**-अमोल गोंजारी,** विभाग नियंत्रक, सोलापूर



# महत्वाचे...



## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त शिवसेनेच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. ३१ मे-**

शिवसेना सोलापूर वतीने सोलापूर येथील चार पुतळा जवळ असलेल्या अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शिवसेना महानगर अध्यक्ष दत्ता माने, चंद्रकांत मानवी, कामगार सेनेचे अध्यक्ष अजय खांडेकर, नाना मोरे, सुधीर संगेपान, उपशहरप्रमुख विभाग प्रमुख शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बिरूलिंगेश्वर धनगर समाज संघटनेच्या वतीने अहिल्यादेवी होळकरांची महापूजा

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त बिरूलिंगेश्वर धनगर समाज संघटना भवानी पेठ,घोंगडे वस्ती भागात भारतीय जनता पार्टीचे नूतन शहराध्यक्ष रोहिणी तडवलकर, सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, दादासाहेब सरवदे यांच्याहस्ते राजमातांची पूजन करून स्थापना करण्यात आली. त्यानंतर प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान भाजपच्या नूतन शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी म्हणाले, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी वयाच्या नऊ वर्षांपासून संघर्ष यात्रा सुरू केली त्यामध्ये अनेक अडचणी आल्यात कुठल्याही अडचणीला न डगमगता त्यांनी पुढे गेले राजमाता ने त्यावेळी केलेले हिंदूसाठी काम आतापर्यंत आपल्यासमोर दिसतात असे त्यांनी भाषणात सांगितले. प्रास्ताविक माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांनी केले. यावेळी मंडळाचे जेष्ठ सिद्राम तेग्गेळी, निंगप्पा पुजारी, शरणप्पा डोळे,बसवराज जाटगल, बंडोपंत डोळे, नरसप्पा मंदकल, सायबंण्णा मुडल, गंगाराम डोळे, विशवनाथ मंदकल, जंगनाथ मंदकल, रेवण वग्गूर, प्रभू पुजारी, तायपा पुजारी, बसवराज करली, विनायक पाटील, ॲड. प्रेमलता व्यास, उषा पाटील, डोळे अव्वा, मलूरे अव्वा, गंगुबाई पुजारी,जगूबाई कोळी, आदी महिलांनी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा नेते बिपीन पाटील, पवन तगारे, नविन गोटीमुकूल, प्रविण डोळे, नागेश गंदाळ, प्रशांत गाडेकर, देवराज पाटील, नागेश डोळे, कुमार शिरसगीकर, अंबादास पाटील, प्रभू कोळी, विजय कोळी, सिद्राम मंदकल, अक्षय कलशेट्टी, गणेश मलूरे, संतोष करली, दिपक करली, कुमार कामुर्ती तसेच जेमिनी क्रिडा व बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## महिलेच्या मोबाईलवर अश्लिल शिवीगाळ करून बदनामी

**सोलापूर, दि. ३१ मे-**

महिलेच्या मोबाईलवर अश्लिल शिवीगाळ करून बदनामी करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन सुलतान सिराज पटेल (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीतेच्या मोबाईल नंबरवर २७ मे रोजी सुलतान पटेल याने वॉटसअॅपवर अर्वाच्च व अश्लिल भाषेत शिवीगाळ करून बदनामी केली होती. याबाबत २८ मे रोजी विचारणा केली असता पटेल याने पिडीतेस तुझी बदानामी अजुन करणार आहे, अजून खूप काही करणार आहे, तुला आत्महत्या करायला लावतो, तु जर आत्महत्या नाही केलीस तर तुझा अंत माझ्याच हातात आहे, तुझी गाढवावरून धिंड काढतो असे बोलून शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक वाघमारे पुढील तपास करीत आहे.

# संप कायदेशीरच; माघार घेणार नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३१ मे-**

संघटनेने निवेदन देऊन सनदशीर मार्गानेच संप पुकारला असून भूमी अभिलेख विभाग संपावर ठाम असल्याचे परिपत्रक राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेने काल जारी केले.

**राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेचा निर्धार**

शासनाच्या भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी दिनांक १५ मे २०२४ पासून बेमुदत संपावर आहेत .याबाबत पत्रकारांनी विचारले असता सदरचा संप बेकायदेशीर असून भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी तात्काळ कामावर हजर राहावे अन्यथा कारवाई केली जाईल असे सुतोवाच सोलापूर दौऱ्यावर असताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. आम्ही सन २०१५ पासून सातत्याने शासनाकडे तांत्रिक वेतनश्रेणी मिळणे बाबत मागणी करत आहोत . महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण (मॅट) नागपूर खंडपीठाने आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी न करता त्यावर एक समिती गठन केली असून तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्या बाबत शासन जाणून बुजून चालढकल करत असल्याचे परिपत्रकात म्हटले आहे. शासना सोबत वारंवार बैठका व चर्चा होऊनही गेली दहा वर्षे तांत्रीक वेतन श्रेणीची मागणी अद्याप प्रलंबित आहे.मागण्या मान्य न झाल्यास न्याय मिळेपर्यंत संप चालूच राहणार असल्याचे संघटनेने एका परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

# होटगी रोडवरील क्रोमा शोरूममधून ४० लाखांचे मोबाईल चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे -**

शहरातील होटगी रोडवर असलेल्या टाटा क्रोमा शोरूममधून चोरट्याने ४० लाख ४२ हजार रुपये किंमतीचे विविध कंपनीचे ५२ मोबाईल चोरून नेले.




ही घटना शुक्रवारी उघडकीस आली असून याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत टाटा क्रोमा शोरूमचे व्यवस्थापक जितेंद्र दिलीप वाणी (रा. रोहिणी नगर भाग १, ओम गर्जना चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर शहरात टाटा क्रोमा शोरूम एस टी स्टॅन्डजवळ आणि होटगी रोडवर या दोन ठिकाणी आहे. २९ मे रोजी रात्री शोरूम बंद करण्यात आल्यानंतर रात्री चोरट्याने स्टोअरच्या काचेचे फसाड फोडून आत प्रवेश केला आणि ५२ मोबाईल व बॅग चोरून नेले. शुक्रवारी सकाळी कर्मचारी हे शोरूम उघडण्यास आले असता ही चोरीची घटना दिसून आली. चोरट्यांनी या शोरूममधून ४० लाख ४२ हजार रुपये किंमतीचे ५२ विविध कंपन्याचे महागडे मोबाईल चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# घरगुती भांडणातून बालिकेने फिनेल प्राशन केले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३१ मे-**

घरगुती भांडणातून १४ वर्षिय बालिकेने फिनेल प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. निकिता सुरेश राठोड (वय १४, रा. शिवाजी नगर, बाळे, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या बालिकेचे नाव आहे. शनिवारी सकाळी ७ च्या सुमारास राहत्या घरी घरगुती भांडणाच्या कारणावरून निकिता हिने फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी आई उषा राठोड हिने शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सासरी का आलात म्हणत काठीने मारहाण

**सोलापूर :** सासऱ्याच्या घरी का आलात असे म्हणत काठीने मारहाण केलेल्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुकुंद पोमू चव्हाण (वय ५४, रा. नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३० मे रोजी दुपारी सैफुल चौक येथे माझ्या सासऱ्याच्या घरी तुम्ही का आला असे म्हणून मुकुंद चव्हाण यांस सचिन किसन चव्हाण याने लाकडी काठीने मारहाण केली. यामध्ये मुकुंद चव्हाण यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांस उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# घरगुती वादातून मुलाकडून बापाला मारहाण

**सोलापूर :** घरगुती वादातून मुलाकडून बापाला मारहाण करण्यात आली. ज्ञानेश्वर शंकर उंचीकट्टी (वय ४९, रा. दमाणी नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३० मे रोजी दुपारी राहत्या घरी घरगुती वादातून मुलगा पवन ज्ञानेश्वर उंचीकट्टी याने वडील ज्ञानेश्वर यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून ढकलून दिले. त्यामध्ये ज्ञानेश्वर यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# महिलेने केले फिनेल प्राशन

**सोलापूर :** अज्ञात कारणावरून महिलेने फिनेल प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. देवमनी येतीश ज्योती (वय ३१, रा. थोरली इरण्णा वस्ती, सोलापूर सध्या रा. हुडको कॉलनी, कुमठा नाका, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. ३० मे रोजी दुपारी राहत्या घरी देवमनी ज्योती यांनी अज्ञात कारणावरून फरशी पुसण्याचे फिनेल प्राशन केले. यामध्ये देवमनी यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली.



# 'शिवरत्न' चे उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिर यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३१ मे-**

येथील शिवरत्न शिक्षण संस्थेच्या ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्र व शिवरत्न कुस्ती केंद्रातर्फे १ ते ३१ मे या कालावधीत झालेल्या उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिरातील ७९ सहभागींना शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आणि शिबिराची सांगता झाली. ३१ मुली आणि ४८ मुलांनी यामध्ये सहभाग घेतला. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण कुस्तीगीर मुला-मुलींना बौद्धिक, तांत्रिक तसेच आधुनिक नवीन डाव, नियम व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळावे यासाठी हे केंद्र उभारण्यात आल्याचे अध्यक्षा मोहिते-पाटील यांनी सांगितले. ताराराणी महिला व शिवरत्न कुस्ती केंद्रात फ्री स्टाईल, ग्रीको-रोमन, भारतीय शैलीतील मॅट कुस्ती, तसेच योगा व प्राणायामाचे प्रशिक्षण नियमित दिले जाते. यावेळी सचिव धर्मराज दगडे, अनिल जाधव, नितीन बनकर, श्रीकांत राऊत, दत्तात्रय लीके, राहुल जगताप, रामकृष्ण काटकर, काकासाहेब जगदाळे, राहुल कोडक, सतपाल सिंह, सुहास तरंगे, अश्रफ शेख, बाळासाहेब रणवरे व इतर मान्यवर उपस्थित होते.



# सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील २८ जण सेवानिवृत्त

## १ पोलीस निरीक्षक, २७ अंमलदारांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील २८ जण ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते सेवानिवृत्त सत्कार करण्यात आला. यामध्ये १ पोलीस निरीक्षक, २७ अंमलदारांचा समावेश आहे. पोलिस मुख्यालयातील अलंकार हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमात दर सत्कार समारंभास अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, उपअधिक्षक श्रीमती विजयालक्ष्मी कुर्री, दिपक चव्हाण व इतर पोलीस अधिकारी हजर होते.

पोलीस खात्यामध्ये सेवा करताना पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समाजाच्या प्रत्येक घटकास सामोरे जावे लागते. त्यात वेळी-अवेळी बंदोबस्त, रात्रगस्त अशी कर्तव्य पार पाडावी लागतात. यामुळे पोलीसांना कर्तव्याचा ताण येणे सहाजीक आहे. त्याचा परीणाम पोलीसांच्या आरोग्य व कौटुंबीक जीवनावर होत असतो. अशा वेळी पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या पाठीशी त्यांचे कुटूंबीय खंबीरपणे उभे राहून साथ देतात.

यामुळे पोलीस अधीक्षक यांनी सेवा कालावधीत पाठीशी राहणारे कुटंबींसह सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांचा कुटुंबासह सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास उपस्थित सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांनी उत्स्फुर्तपणे आपल्या सेवा कालावधीत गंमती-जमती तसेच खडतर अनुभव कथन केले. तसेच सत्कार समारंभास उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आपले पुढील सेवा कालावधीत चाणाक्ष व कादेशीरपणे कर्तव्य पार पाडण्याबाबत सल्ला दिला. तसेच अधिक्षक कुलकर्णी यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील आयुष्य आरोग्यदायी जाण्याबाबत शुभेच्छा दिल्या. तसेच सेवानिवृत्ती नंतर मिळणारे सर्व निवृत्तीवेतन व भत्ते हे तात्काळ दिले जातील याबाबत आश्वासीत केले. सदर कार्यक्रमास पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखा प्रमुख, लिपीक वर्ग व पोलीस अंमलदार हे हजर होते.

# जिल्ह्यातील चार गोशाळांना ७० लाखांचे अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

राज्य सरकारने सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेंतर्गत जिल्ह्यातील चार तालुक्यांमधील चार गोशाळांना ७० लाखांचे अनुदान दिले आहे.

राज्य सरकारने प्राणी रक्षण कायद्यानुसार राज्यात गोवंशाच्या कत्तलीस प्रतिबंध केला आहे. परिणामी अशा अनुत्पादक पशुंच्या संख्येत वाढ होत असल्याने त्यांचा सांभाळ करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना राबवली जात आहे. त्या अंतर्गत प्रत्येक तालुक्यातील एका गोशाळेस एकवेळ अनुदान देण्यात येत आहे.



राज्य सरकारने या योजनेंतर्गत यापूर्वी जिल्ह्यातील सात तालुक्यांमधील सात गोशाळांना दोन कोटी पाच लाखांचे अनुदान दिले होते.

अनुदानासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांनी दक्षिण सोलापूर व बार्शी येथील गोशाळांना भेटी देऊन पाहणी केली होती. तेव्हा तेथे गोधन नसल्याने ते प्रस्ताव नामंजूर केले होते. आता उर्वरित चार तालुक्यांतील चार गोशाळांना ७० लाखांचे अनुदान दिले आहे. या गोशाळांमध्ये एकूण ३८३ गोधन आहेत. या उपलब्ध निधीतून पशुसंवर्धन आयुक्तांच्या परवानगीने गोशाळांमध्ये सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत.

**या गोशाळांना मिळाले अनुदान**

- दक्षिण सोलापूर : श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळ -१५ लाख
- बार्शी : श्री नवकार जैन सेवा तीर्थ - २५ लाख
- मंगळवेढा : बसवेश्वर ग्रामविकास मंडळ मुंढेवाडी- १५ लाख
- माळशिरस : सद्गुरू संत बाळूमामा गोशाळा धर्मपुरी- १५ लाख

**गोधनाला इयर टॅगिंग केले जाईल**

अनुदान मंजूर झालेल्या गोशाळांना भेटी देण्यात येतील. तेथील गोधनाला इयर टॅगिंग केले जाईल. ती खात्री केल्यानंतर त्या अहवालाच्या आधारे ६० टक्के निधी वितरित करण्यात येईल. तो निधी योग्य बाबींवर खर्च केल्याची तपासणी केल्यानंतर तसा प्रस्ताव पाठविण्यात येईल. त्यानंतर उर्वरित ४० टक्के निधी गोशाळांना देण्यात येईल.
**- डॉ. विशाल येवले,**
उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन , सोलापूर

**अनुदानामुळे गोधन रक्षणासाठी हातभार**

शासनाकडून आमच्या गोशाळेला १५ लाख रूपये अनुदान मिळाले. गोशाळा चालविताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अनुदानामुळे गोधन संरक्षणासाठी आर्थिक हातभार लागणार आहे. शिवाय गोशाळेच्या विकासासाठी मदत होणार आहे.
**- उमा बिराजदार,**
अध्यक्ष, श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळ

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# उड्डाणपूल, विकास आराखडा; लोकांचे मत जाणूनच निर्णय

- पोर्टलवर लोकांना मत नोंदविता येणार
- पालकमंत्री जयकुमार गोरे यांची महापालिका बैठकीनंतर माहिती
- एमआयडीसीतील आगी प्रकरणी संबंधित विभागांकडून अहवाल मागविला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर शहरातील उड्डाणपूलांबाबत लोकांची मत-मतांतरे आहेत. यामुळे उड्डाणपूल, शहर विकास आराखडा ,पाणी आणि स्वच्छतेविषयी शहरातील लोकांचे मत जाणून घेणार आहोत. त्यासाठी पोर्टल वर लोकांची मते घेणार आहे. जनभावना लक्षात घेऊन त्या आधारे मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज दुपारी सोलापूर महापालिकेत इंद्रभुवन मधील मीटिंग हॉलमध्ये अक्कलकोट रोड एमआयडीसीतील आगीच्या घटनेसह विविध विषयांचा आढावा घेतला. यावेळी आ. देवेंद्र कोठे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगररचना उपसंचालक मनीष भिष्णुरकर , विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

या आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ही माहिती दिली. उड्डाण पुलासंदर्भात बोलताना ते म्हणाले, शहरातील उड्डाण पुलाबाबत मत - मतांतरे आहेत. काही लोकांचे मत उड्डाणपूल झाले पाहिजे आहे तर काही लोकांना उड्डाणपूल नको आहे. उड्डाणपूल झाले तर व्यापार मार खाईल, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. सोलापूर शहरात महापालिकेच्या दृष्टीने शहर विकास आराखडा विषय महत्त्वाचा आहे. या आराखड्यामध्ये अनेक गोष्टी चुकीच्या झाल्या आहेत. लोकांमध्ये याबाबत मोठा असंतोष आहे. शहरात कचऱ्याचा बोजवारा उडाला आहे. यासंदर्भात ही काही बदल झाले आहेत. त्यामुळे याविषयी निर्णय घेणे आवश्यक आहे. शहरातील पाणीपुरवठा हा विषयही लोकांसाठी महत्त्वाचा आहे. एकूणच सोलापूर शहरातील उड्डाणपूल, शहर विकास आराखडा, पाणी आणि स्वच्छता याविषयी शहरातील लोकांची मते जाणून घेण्यात येतील. त्यासाठी येणाऱ्या दहा दिवसात एक पोर्टल तयार करण्यात येणार आहे. या पोर्टलच्या माध्यमातून या विषयांवर जनभावना जाणून घेण्यात येणार आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्यावर निर्णय घेण्यात येईल, असे पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, उजनी - सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम चांगले झाले आहे. पंधरा दिवसात पाणी सोरेगाव येथे पोहोचेल. दुहेरी जलवाहिनीमुळे नदीद्वारे होणारा पाण्याचा अपव्यय थांबणार आहे.त्याचबरोबर नवीन जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेचा विषय मार्गी लागला आहे. ते काम व्हायला एक वर्ष लागेल, असेही त्यांनी सांगितले.

अक्कलकोट रोड एमआयडीसी मधील सेंट्रल टेक्सटाईल कारखान्याला लागलेल्या आगीत आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या आगी संदर्भात महापालिका, अग्निशामक दल, एमआयडीसी प्राधिकरण, बांधकाम विभाग, पोलीस या विभागाच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. तेथील आग आटोक्यात आणण्यासाठी नेमक्या काय अडचणी आल्या ? आगीची नेमकी कारणे काय आहेत? कोणती परिस्थिती उद्भवली? या संदर्भात माहिती घेतली. पोलीस तपासात कोण दोषी आहे याही गोष्टी जाणून घेतल्या. सर्व परिस्थिती पाहता त्या ठिकाणी काही गोष्टी अडचणीचे असल्याचे सांगण्यात आले.

उद्योग, व्यवसाय वाढला पाहिजे. व्यवसायिकांना पाठबळ दिले पाहिजे, ही महाराष्ट्र सरकारचे धोरण आहे. उद्योग वाढले पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ताकदीने काम करत आहेत. सोलापूर शहर हे टेक्स्टाईल हब आहे. अलीकडच्या काळात या अक्कलकोट रोड एमआयडीसीत पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी रस्त्याची व्यवस्था अडचणीची आहे. कारखान्यात अग्निशमन व्यवस्था बाबत गंभीर परिस्थिती आहे. त्याचाही आढावा महापालिका आयुक्तांनी घेतला आहे. ८० टक्के कारखान्यांमध्ये अग्निशामक व्यवस्थाच नाही. एखाद्या कारखान्याला आग लागली तर ती कशी विझवावी, त्याची साधने नाहीत. काही ठिकाणी आग विझवण्याचे सिलेंडर उपलब्ध नाहीत. काही ठिकाणी त्याची मुदत संपलेली आहे. अशी एकूणच गंभीर परिस्थिती त्या ठिकाणी आहे. एमआयडीसी ज्या ठिकाणी बेकायदेशीर बांधकामे आहेत त्याची माहिती घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. किमान कारखान्याच्या प्रवेशद्वारात तर अग्निशामकची गाडी पोहोचली पाहिजे. हे का घडले? यासह इतर सर्व बाबी तपासण्याचे आदेश दिले आहेत. त्या कारखान्यातील एक भाग तोडला असता तर आग लवकर आटोक्यात आणता आली असती परंतु त्या ठिकाणी काही लोकांनी त्या बाजूने भिंत पाडण्यास विरोध केला. त्यामुळे लोकांना वाचवणे शक्य झाले नाही. यात महापालिकेच्या अग्निशामक दलाचे कर्मचारीही जखमी झाले. त्या कारखान्यातील प्रार्थना स्थळ १०० टक्के बेकायदेशीर होते. तेथील भिंत तातडीने काढली असती तर आग आटोक्यात आणता आले असते. पोलीस आणि अग्निशामक दलाचे तसे म्हणणे आहे. त्याचीही चौकशी करण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत, असेही पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.

कारखानदार संघटनेचे म्हणणे ऐकून घेतले. आगी नंतर त्यांना नोटीसा देणे चालू झाले आहे. सर्व गोष्टी करण्यासाठी त्यांनी वेळ मागितला आहे. टप्प्याटप्प्याने या गोष्टी करता येतील असेही कारखानदाराचे म्हणणे आहे. त्यासाठी आठ दिवसात संपूर्ण अहवाल मागविला आहे. त्यानंतर पुन्हा बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार आहे, असेही पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.



### अंतर्गत जलवाहिनी कामासाठी दीड महिन्यात टेंडर होईल

सोलापूर शहरातील अंतर्गत जलवाहिनी ५० वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळे अनेक अडचणी येतात. त्यासाठी ८५० कोटीच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी दिली आहे. त्यापैकी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचा आराखडा अंतिम टप्प्यात आहे. येत्या दीड महिन्यात त्याचे टेंडर होईल, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

### सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांचे जबाब घेण्याच्या सूचना

अक्कलकोट रोड एमआयडीसीतील आगीच्या घटने प्रकरणी एमआयडीसी प्रशासन, अग्निशामक विभाग, महापालिका अधिकारी, कारखानदार यांचे जबाब घेण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. नेमकी कशामुळे आग लागली ? ही जबाबदारी नेमकी कोणावर निश्चित करायची ? आठ दिवसात याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, असेही पालकमंत्री म्हणाले.

### अक्कलकोट रोड एमआयडीसी पाच लाख लिटर पाणी उपलब्ध ठेवा

अक्कलकोट रोड एमआयडीसीमध्ये पाण्याची व्यवस्था नसल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. त्यामुळे या ठिकाणी पाच लाख लिटर पाणी नेहमी उपलब्ध ठेवण्यात यावे, अशा सूचना महापालिका आयुक्तांना दिल्या आहेत. एमआयडीसीतच नव्हे तर शहरातील कुठेही आग लागली तरी पाणी कमी पडू नये याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. अत्याधुनिक अग्निशामक दलाच्या गाड्यांसाठी निधीही लवकरच उपलब्ध करून देणार असल्याचेही यावेळी पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

# ईशान्य भारतात मुसळधार, १४ ठार

## १० हजारांपेक्षा जास्त लोक प्रभावित ● रेड अलर्ट

◆ **गुवाहाटी, ३१ मे**

मान्सूनने आता देश व्यापला आहे. काही राज्यांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे हजारो लोक प्रभावित झाले आहेत. ईशान्येतील मिझोरम, त्रिपुरा, मेघालय आणि आसाममध्ये जोरदार बरसला. मिझोरममध्ये काही घरे कोसळली आणि भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले. आसाममध्ये मागील चोवीस तासांत भूस्खलनात पाच जणांचा, तर अरुणाचल प्रदेशातील भूस्खलनात ९ जणांचा मृत्यू झाला. आसाममध्ये १० हजार नागरिक पुरामुळे प्रभावित झाले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

शुक्रवारी रात्री उशिरा झालेल्या भूस्खलनात दोन कुटुंबांची वाहने वाहून गेली. त्यातील सात जणांचा मृत्यू झाला. ही घटना पूर्व कामेंग जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १३ वर घडली. सुबानसिरी जिल्ह्यात दोन कामगार मृत्युमुखी पडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आसामच्या कामरूप महानगर जिल्ह्यात पाच जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. गुवाहाटीच्या बाहेरील बोंडा भागात भूस्खलनात तीन महिलांचा मृत्यू झाला आहे, असे नगरविकास मंत्री जयंत मल्ल बरुआ यांनी सांगितले. शुक्रवारी शहरातील बहुतांश भागांत मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे प्रभावित लोकांना मदत व बचाव करण्यासाठी अनेक संस्था काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

कामरूप महानगर, कामरूप व कछार या तीन जिल्ह्यांतील पाच महसूल विभागांतील शहरी भागांत पूर आल्याची नोंद झाली आहे. एकूण १०,१५० लोक प्रभावित झाले आहेत. प्रभावित लोकांसाठी दोन छावण्या व एक मदत वितरण केंद्र उघडण्यात आले आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

धेमाजी, लखीमपूर आणि गोलाघाट या तीन जिल्ह्यांतील आठ महसूल विभागांमध्येही शहरी भागात पूर आल्याची नोंद झाली असून, यामुळे सुमारे दोन हजार लोक प्रभावित झाले आहेत. मात्र, पूरग्रस्त शहरी भागात आतापर्यंत कोणतेही छावण्या किंवा मदत वितरण केंद्रे कार्यरत नाहीत. उत्तर लखीमपूर महसूल विभागांतर्गत एक बांध फुटला. एनडीआरएफ व एसडीआरएफचे कर्मचारी वेगवेगळ्या प्रभावित भागांतील लोकांना बाहेर काढत आहेत, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. प्रादेशिक हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, चिरांग, बक्सा, बारपेटा, बोंगाईगाव, बाजाली, तामुलपूर, दरंग आणि उदलगुरी हे शनिवारी रेड अलर्टवर आहेत. शुक्रवारी १८ जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. ईशान्येकडील अनेक भागांत झालेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे राज्यात असामान्य परिस्थिती निर्माण झाली आहे, असे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



पावसामुळे वस्तीत साचलेल्या पुराचे पाणी बघताना नागरिक

### अरुणाचल प्रदेश, मेघालयातही बरसला

अरुणाचल प्रदेश आणि मेघालयातही मुसळधार पाऊस पडला आहे, त्यामुळे आसाम, विशेषतः गुवाहाटीमध्ये, मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे, असे ते म्हणाले. कामरूप व कामरूप महानगर जिल्ह्यातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी शनिवारी विशेष सुटी जाहीर करण्यात आली आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे गुवाहाटी विमानतळावरील विमान सेवा प्रभावित झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### केदारनाथ महामार्गावर दरड कोसळली, एक ठार

उत्तराखंडातील रुद्रप्रयाग येथे केदारनाथ राष्ट्रीय महामार्गावर दरड कोसळून एक जण ठार, तर पाच जखमी झाले आहेत. छत्तीसगडमधील भाविकांना घेऊन जाणाऱ्या वाहनावर गुप्तकाशीजवळ दरड कोसळली, अशी माहिती प्रशासनाने दिली. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तत्काळ राज्य आपत्ती प्रतिसाद पथकाला बचावमोहिमेसाठी पाठवले.

# हिंदी आता मुंबईची बोलीभाषा झाली आहे : सरनाईक

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ३१ मे :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी घाटकोपर येथील एका कार्यक्रमात मराठी शिकणे गरजेचे नसल्याचे वक्तव्य केले होते. त्यावरून निर्माण झालेला वाद मिटला असताना आता महायुती सरकारमध्ये एक प्रमुख मंत्री असलेल्या प्रताप सरनाईक यांनी एक पाऊल पुढे टाकत, हिंदी ही आता मुंबईची बोलीभाषा झाली आहे. आमची लाडकी बहिण बनली आहे, असे जाहीर वक्तव्य करून पुन्हा एकदा हिंदी प्रेमाचे गाणे गायले आहे.

मीरा-भाईंदर येथील एका कार्यक्रमात त्यांनी बोलताना हे वक्तव्य केले असून त्यामुळे राज्यातील राजकारणात मराठी- हिंदी भाषेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. असल्याचा दावा केला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत राहायचे म्हणून मराठी शिकणे गरजेचे नसल्याचा जावाई शोध लावला होता. त्या पाठोपाठ राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी तर आता हिंदीला डोक्यावरच घेतले आहे. हिंदी ही आता मुंबईची बोलीभाषा बनली आहे. हिंदी ही आमची लाडकी बहीण आहे, असं वक्तव्य सरनाईकांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याने मराठी भाषिक नाराज झाले आहेत. तर त्यामुळे वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि मनसेने त्यांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे. मुंबईमध्ये एका कार्यक्रमादरम्यान ना. सरनाईक म्हणाले की, हिंदी आता मुंबईची बोलीभाषा झाली आहे. आम्ही मराठीला मातृभाषा म्हणतो पण आमच्या तोंडी कधी हिंदी येते, कधी इंग्रजी येते. त्यामुळं हिंदी आता बोलीभाषा झाली आहे. ठाणे व मिरा भाईंदर हा माझा मतदारसंघ आहे. जनतेशी बोलताना शुदध मराठीत बोलतो. जेंव्हा मिरा भाईंदरकडे जातो तेंव्हा आपोआप तोंडातून हिंदी बाहेर पडते. आजकाल आपण मराठी आमची मातृभाषा आहे, आमची माय आहे असं म्हणतो. पण हिंदी आपली लाडकी बहीण आहे. कारण लाडक्या बहिणींमुळं आम्ही आज २३७ च्याही पुढे गेलो आहोत, अशी पुश्ती सरनाईक यांनी यावेळी जोडली.



त्याच्या वक्तव्यावरून सोशल मीडियावर व मराठी जनतेतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे.ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत म्हणाले,' मराठी माणसाच्या उद्धारासाठी कल्याणासाठी, बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेना स्थापन केली. आणि हेच लोक आता म्हणतात की आम्ही बाळासाहेब ठाकरेंचे वारसदार आहेत. त्यांच्या नेत्यांना विचारा की मराठी संदर्भातली हीच तुमची मुख्य भूमिका आहे का? त्यांचा जो विचार आहे तो हा भाजपचा विचार आहे हा अमित शहांचा विचार आहे. त्यांच्या पक्षाचे नेते आणि प्रमुख अमित शाह आहेत. त्यामुळे ते जे बोलतात, तेच हे लोक बोलतात असा टोला राऊतांनी लगावला. मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष खा वर्षा गायकवाड म्हणाल्या की, मुंबईवर पहिला हक्क हा मराठी माणसाचा आहे आणि तो कायम राहील,'

मनसेचे यशवंत किल्लेदार म्हणाले,' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना आवरावे, मतांच्या लाचारीसाठी मराठी आणि मुंबई गहाण ठेवणार असणार ते आम्हाला मान्य नाही. मनसे मराठी माणसासाठी लढत राहील.'

# मद्यधुंद चालकाने चहा पित असलेल्या एमपीएससीच्या १२ विद्यार्थ्यांना उडवले

## पुण्यातील सदाशिव पेठ परिसरात भावे हायस्कूल परिसरातील घटना

**पुणे, दि. ३१ मे :**

शहरातील सदाशिव पेठ परिसरात भावे हायस्कूल जवळ चहा प्यायला आलेल्या एमपीएससीच्या १२ विद्यार्थ्यांना एका कार चालकाने उडवल्याची घटना घडली. हा कार चालक दारू पिऊन कार चालवत होता हे समोर आले आहे. दारू पिऊन कार चालवणाऱ्या ड्रायव्हरला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यातील जखमी विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत.

शनिवारी संध्याकाळी पुण्यातील भावे हायस्कूलजवळ ही घटना घडली. चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी आलेल्या १२ विद्यार्थ्यांना एका भरधाव वेगाने आलेल्या कारने उडवलं. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले. तर नऊ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींवर संचेती आणि मोडक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

भरधाव वेगाने कार चालवणाऱ्या ड्रायव्हरने दारू प्यायल्याचं स्पष्ट झालं आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. जखमींमध्ये काही विद्यार्थी हे रविवारी होणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षेला सामोरे जाणार होते.

पुण्यातील भावे हायस्कूलचा परिसर म्हणजे अरुंद रस्ते आणि छोटी गल्ली असलेला परिसर. असं असतानाही कार चालक भरधाव वेगाने आला. त्यामुळे त्याचे कारवरील नियंत्रण सुटलं आणि समोर चहा पित असलेल्या विद्यार्थ्यांना त्याने उडवलं. जखमींमध्ये तीन मुलीही असल्याची माहिती आहे. या घटनेचे



सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. घटनेची माहिती मिळताच त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक आमदार हेमंत रासणे उपस्थित राहिले. हेमंत रासणे यांनी मुख्यमंत्र्यांना या घटनेची माहिती दिली. या सर्व विद्यार्थ्यांवर तातडीने उपचार करण्यात यावेत असा आदेश मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. यांचा जो काही खर्च असेल तो शासन करणार आहे.

### या विद्यार्थ्यांच्या रविवारच्या परीक्षेचं काय?

या अपघातात जखमी झालेले काही विद्यार्थी हे रविवारी होणाऱ्या एमपीएससीच्या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. पण त्यांची सध्याची परिस्थिती गंभीर आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसंदर्भात काही वेगळा मार्ग निघू शकतो का यावरही विचार करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जखमी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. युवा सेनेच्या नेत्या शर्मिला येवले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणला. या विद्यार्थांना जी काही मदत लागेत ती करू असं आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिलं.

# पाकिस्तानकडून होतेय सिंधू कराराचे उल्लंघन

## ▸ 'यून ग्लेशियर मीट' मध्ये भारताचा जोरदार हल्लाबोल

**दुशांबे, ३१ मे**

सिंधू पाणी कराराच्या उल्लंघनासाठी भारताला दोष देणे पाकिस्तानने थांबवावे, कारण त्यांच्याच भूमीतून सातत्याने होणारा सीमापार दहशतवाद हाच कराराच्या अंमलबजावणीत प्रमुख अडथळा ठरत आहे, असा जबरदस्त हल्लाबोल आज भारताने येथे आयोजित 'यून ग्लेशियर मीट' मध्ये पाकिस्तानवर केला.

ताजिकिस्तानच्या दुशान्बे येथे शुक्रवारी हिमनद्यांवरील संयुक्त राष्ट्रांच्या पहिल्या परिषदेच्या पूर्णकालीन सत्राला संबोधित करताना भारताचे पर्यावरण राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह म्हणाले की, खुद्द पाकिस्तानच दहशतवादाच्या माध्यमातून कराराचे उल्लंघन करीत आहे. 'पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय मंचाचा गैरवापर करण्याचा आणि मंचाच्या कक्षेत न येणाऱ्या मुद्यांवर अनावश्यक संदर्भ आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आम्हाला धक्का बसला आहे. आम्ही अशा प्रयत्नाचा तीव्र निषेध करतो, असे ते म्हणाले. सिंधू पाणी करारावर स्वाक्षरी झाल्यापासून परिस्थितीत मूलभूत बदल झाले आहेत हे निर्विवाद सत्य आहे. त्यामुळेच कराराच्या दायित्वांचे पुनर्मूल्यांकन आवश्यक आहे. या बदलांमध्ये तांत्रिक प्रगती, लोकसंख्याशास्त्रीय बदल, हवामान बदल आणि सीमापार दहशतवादाचा सततचा धोका यांचा समावेश आहे, असे कीर्तिवर्धन सिंह म्हणाले. या कराराच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की तो सद्‌भावना आणि मैत्रीच्या भावनेने करण्यात आला आहे

आणि या कराराचा सदभावनेने आदर करणे आवश्यक आहे. मात्र, पाकिस्तानकडून सातत्याने सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी कारवायांमुळे कराराच्या तरतुदींचा फायदा घेण्यात अडथळे येत आहेत, असे कीर्तिवर्धन सिंह यांनी रोखठोकपणे सांगितले. त्यामुळेच जो पाकिस्तान स्वत: कराराचे उल्लंघन करीत आहे,

### पाकिस्तानच्या ११८ पेक्षा अधिक चौक्या उद्ध्वस्त

**पूंछ** : ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारताच्या निवासी भागांवर हल्ला केला असता जम्मू फ्रंटियरमधील बीएसएफने पाकिस्तानच्या ११८ हून अधिक चौक्या उद्ध्वस्त केल्या. किमान पाच वर्षे पाकिस्तान युद्ध लढू शकणार नाही. दहशतवाद आणि चर्चा एकत्र होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही, असा हल्लाबोल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जम्मू-काश्मिरच्या पूंछ येथून केला.

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात जम्मूकाश्मीरमधील पूंछ जिल्ह्यातील अनेक घरांचे नुकसान झाले. शिवाय मोठ्या प्रमाणावर जीवितहानीही झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी या भागाचा दौरा करत नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच लोकांशी संवाद साधत त्यांना दिलासा दिला. यावेळी शाह म्हणाले, सीमेपलीकडून झालेल्या गोळीबारात पूंछमधील अनेकांना आपले प्राण गमवावे लागले.

# गृहिणींसाठी आनंदवार्ता खाद्यतेल होणार स्वस्त

**नवी दिल्ली, ३१ मे**

स्वयंपाक घरातील सध्या सर्वाधिक भाव खाणारी वस्तू म्हणजे खाद्यतेल होय. गेल्या चार-पाच वर्षांपासून खाद्यतेल जे शंभरीच्या पार गेले ते खाली आलेच नाही. त्यात थोडाफार दिलासा म्हणून केंद्र सरकारने कच्च्या खाद्यतेलावरील आयात शुल्कात १० टक्के कपात केल्याने भाव कमी होणार आहेत.

एकूण गरज असलेल्या खाद्यतेलापैकी ७० टक्के आपण आयात करतो. इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड येथून पामतेलाची आयात केली जाते. तसेच ब्राझील, अर्जेंटिना, रशिया आणि युक्रेन आदी देशांमधून सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाची आयात केली जाते. कच्च्या खाद्यतेलाच्या मुलभूत आयात किंमतीत १० टक्के कपात केल्याची अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. कचे पाम तेल, सूर्यफूल आणि सोयाबीन या तिन्ही प्रकारच्या तेलांवर एकूण २७.०५ टक्के आयातशुल्क लावले जात होते जे आता १६.०५ टक्के एवढे झाले आहे.

# पहलगाम हल्ल्यातून घेतला १९७१ च्या सूडाचा बदला

**लाहोर** : जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामागे लष्कर-एतोयबाचा कमांडर सैफुल्ला कसुरी याचा सहभाग होता.

कसुरी याने नुकतेच लाहोरमधील सभेत भारताविरोधात गरळ ओकत म्हटले की, आम्ही गोळीबाराला घाबरणारे नाही. जर त्यांना वाटत असेल आम्ही घाबरलो,तर हा त्यांचा गैरसमज आहे, ती त्यांची चूक आहे. आम्ही पहलगाम हल्ल्यातून १९७१च्या युद्धाचा सूड घेतला. सैफुल्लाचे मूळ गाव कसूरमध्ये सभा आयोजित करण्यात आली होती.

## रोखठोक

दिनेश गुणे

# 'पुण्यप्रभावा'ची परिमाणे...

समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होऊन उत्कर्षाच्या स्पर्धेत सामील होण्याची इच्छा अनेकांच्या मनात असते. पण केवळ इच्छा असणे पुरेसे नसते. त्यासाठी ऊर्जा असावी लागते आणि उत्कर्षाची ऊर्मीदेखील असावी लागते. अशी ऊर्मी जागृत करण्यासाठी त्यांना त्यांच्या अंगातील क्षमतांची जाणीव करून द्यावी लागते. समाजाचेही तसेच असते. कोणत्याही समाजसमूहास त्याच्या क्षमतांची जाणीव करून दिली की त्या जागृत होतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध झाले आहे. एखादा श्रमिक कामगार रात्रपाळीतील कष्टाचे काम संपवून कधीतरी उशिरा घरी येतो आणि झोपडीबाहेर रस्त्याकडेला टाकलेल्या खाटेवर अंग टाकतो. काही क्षणातच त्या शिणलेल्या शरीराला गाढ झोप लागते. सकाळ होते, जगाचे व्यवहार सुरू होतात, झोपडीसमोरच्या रस्त्यावर वाहनांची वर्दळ वाढते, कोलाहल सुरू होतो, तरी रात्रीच्या श्रमांनी शिणलेला तो कामगार मात्र, त्या कोलाहलातही खाटेवर शांत झोपलेलाच असतो. अशाच वेळी, त्याची आई बाहेर येते आणि त्या कोलाहलात कुणाला फारसे ऐकूदेखील जाणार नाही अशा, नेहमीच्या घरगुती आवाजात आपल्या झोपलेल्या मुलाला नावाने हाक मारते. आसपास प्रचंड गोंधळ असतानाही, आपल्या आईने नावाने मारलेली हाक झोपेतही त्या कामगाराच्या कानावर पडते आणि तो जागा होतो. समाजाचेही तसेच असते. त्याला त्याच्या नावाने हाक मारली तरच जाग येते आणि तो कामाला लागतो. काही वर्षांपूर्वी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी असाच एक प्रयोग केला. त्या प्रयोगासाठी त्यांनी दिलेले उदाहरण धादांत असत्य, अतिरंजित आणि काहीसे अज्ञानमूलक असले तरी त्यामागचा त्यांचा हेतू मात्र, सामाजिकदृष्ट्या चांगलाच होता. ही सुमारे सात वर्षांपूर्वीची म्हणजे जून २०१८ मधील गोष्ट आहे. दिल्लीमध्ये काँग्रेस पक्षाच्या ओबीसी संमेलनात बोलताना राहुल गांधी यांनी कोका कोला या जागतिक कीर्तीच्या उत्पादनाच्या मालकाची एक कपोलकल्पित गोष्ट अतिरंजित करून सांगितली. कर्तबगारी असेल तर माणूस किती मोठा होऊ शकतो, हे त्यांना सुचवायचे होते. कोका कोला कंपनीचा मालक सुरुवातीच्या काळात शिकंजी विकत असे, तर मॅकडोनल्ड कंपनीचा मालक धाबा चालवत होता, असे सांगून ते थांबले नाहीत. मर्सिडीज आणि होंडा या जागतिक कीर्तीची प्रतिष्ठा असलेल्या मोटार कंपन्यांचे मालकही त्यांच्या सुरुवातीच्या काळात साधे मोटार मेकॅनिक होते, असाही शोध राहुल गांधी यांनी लावला. कोका कोलाचा मालक त्याच्या शिकंजीच्या व्यवसायात असताना, पाण्यात साखर मिसळून विकत होता आणि त्याच्या अनुभवाच्या आधारावर त्याने व्यवसायाचा विस्तार करत कोका कोला कंपनी सुरू केली. आज त्या व्यवसायाचा पसारा जगाच्या कानाकोपऱ्यात पसरला आहे, अशी रंजक कहाणी राहुल गांधींनी या मेळाव्यात सांगून टाकली. अनुभव, कर्तबगारी आणि क्षमतेच्या जोरावर या उद्योजकांनी जागतिक स्पर्धेत आपले स्थान निर्माण केले, असे राहुल गांधींना सांगायचे होते. ओबीसी समाजही आपल्या कर्तबगारी आणि क्षमतेच्या जोरावर स्पर्धेत सहभागी होऊ शकतो, ही त्यांच्या त्या कल्पित कथेमागची कल्पना होती. पण त्यांच्या या कहाणीमुळे देशात जे काही वैचारिक वादळ माजले, त्यामध्ये राहुल गांधी यांच्या बौद्धिक क्षमतेचे वाभाडेही निघाले होते. आता राहुल गांधींनी सांगितलेली उद्योजकांच्या यशाच्या वाटचालीची ती रंजक कहाणी अनेकांच्या विस्मरणातही गेली असेल. कोका कोला, मॅकडोनल्ड्स, मर्सिडीझ या कंपन्यांच्या मालकांची राहुल गांधी यांनी कथन केलेली कहाणी कपोलकल्पित असली, तरी जगभरात त्या त्या क्षेत्रांत सुरू असलेल्या वर्चस्वाच्या स्पर्धेत या कंपन्यांच्या मालकांनी आपल्या क्षमतेच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले, हे वास्तव मात्र शिल्लक आहे. अशा स्पर्धेत दाखल होण्यासाठी आणि आपले स्थान निर्माण करण्यासाठी, आपली स्वतःची ओळख प्रस्थापित करावी लागते, ही व्यापारी क्षेत्रातील स्पर्धेत टिकून राहण्याची पहिली अट असते. त्यासाठी आपल्या सेवा किंवा उत्पादनाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी उपाय आखावे लागतात आणि त्यासाठी मार्केटिंग नावाची आधुनिक स्पर्धेच्या युगातील कला आत्मसात करावी लागते, हे सत्य आता केवळ व्यापारउदीमापुरते मर्यादित राहिलेले नाही. कोणत्याही क्षेत्रातील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किंवा टिकून राहण्यासाठी आणि आपले अस्तित्व किंवा स्थान निर्माण करण्यासाठी मार्केटिंगच्या शास्त्राचा प्रभावी वापर करावा लागतो. राहुल गांधी यांनी कोका कोलाच्या मालकाला शिकंजीचा दुकानदार ठरविले, मर्सिडीझच्या मालकास मेकॅनिक बनविले किंवा मॅकडोनल्डच्या मालकास धाबावाला ठरविले, तरी या व्यक्तींनी आपल्या उत्पादनांची ओळख बाजारपेठांच्या स्पर्धेत गुणवत्तेच्या जोरावर प्रस्थापित केली आणि त्यांचे स्थान निर्माण केले ही बाब नाकारता येणार नाही. म्हणूनच, बाजारपेठेतील आपले स्थान निर्माण करून आपल्या उत्पादनाची ओळख संबंधित उपभोक्त्यापर्यंत पोहोचवण्याच्या स्पर्धेत यशस्वी ठरणाऱ्यांच्या कहाण्या यशोगाथा म्हणून गणल्या जातात आणि त्यांच्या उत्पादनांची ओळख केवळ 'ब्रॅण्ड' नावाच्या एका व्यापारचिन्हातूनच जगाला परिचित होत असते. अशा यशाच्या कहाण्या अनेकदा अतिरंजित करून सांगितल्या जात असल्या, तरी काही कहाण्या खरोखरी प्रेरणादायकही असतात. जगातील सर्वात श्रीमंत गुंतवणूकदार म्हणून वॉरेन बफे हे नाव घेतले जाते. त्यांनी त्यांच्या लहानपणी उपसलेल्या कष्टाच्या कहाण्या त्यांच्या यशोगाथेहून अधिक उजळ करतात. लहानपणी शेंगदाणे, पॉपकॉर्न, वर्तमानपत्रे विकून रोजची गुजराण करणारा हा माणूस आज जगातील सर्वात श्रीमंत गुंतवणूकदार म्हणून परिचित आहे. पार्ले नावाच्या उद्योगसमूहाची यशोगाथादेखील अशीच प्रेरणादायी आहे. या समूहाचे जयंतीलाल चौहान यांना पिण्याचे शुद्ध, आरोग्यदायी बाटलीबंद पाणी विकण्याची कल्पना सुचली आणि आपल्या स्थिरावलेल्या शीतपेयांचा व्यवसायास काहीशी विश्रांती देऊन त्यांनी पाण्याचा व्यवसाय सुरू केला. बिसलेरी नावाची प्रतिष्ठित कंपनी विकत घेऊन पाण्याच्या बाजारपेठेतील साठ टक्क्यांहून अधिक क्षेत्रावर त्यांनी आज बिसलेरीचे वर्चस्व प्रस्थापित केले आहे आणि हिरव्या रंगाच्या लेबलनिशी



बाजारात दिसणाऱ्या या बाटलीबंद पाण्याशी स्पर्धा करणाऱ्या इतर व्यावसायिकांना त्या नावाशी आणि त्याची ओळख देणाऱ्या बोधचिन्हाशी साम्य दाखविणारी लेबले चिकटवून ग्राहकांची दिशाभूल करत व्यवसायात टिकून राहण्याची कसरत करावी लागत आहे.

स्पर्धेच्या बाजारपेठेत आपले कोणतेही उत्पादन लोकांच्या गळी उतरविण्यासाठी किंवा लोकप्रिय करण्यासाठी त्याला आकर्षक, लक्षात राहील अशी आणि आठवणीच्या कप्प्यात टिकेल अशी सुटसुटीत ओळख द्यावी लागते. व्यापारक्षेत्रात या ओळखीच्या चिन्हाला 'ब्रॅण्ड' असे म्हणतात. असे ब्रॅण्ड लोकप्रिय करण्याच्या काही कला असतात. अशा ब्रॅण्डचे प्रभावी मार्केटिंग करणे ही त्यापैकीच एक कला असते. बाजारात उत्पादनाची ओळख निर्माण करून ती पोहोचविण्याची कला, म्हणजे मार्केटिंग, ज्याला जमते, त्याचे उत्पादन लोकप्रिय होतेच, पण कधीकधी ग्राहकही डोळे मिटून अशी उत्पादने विश्वासाने वापरू लागतो. सातत्याने प्रचार करणे, त्यासाठी प्रचारक्षेत्रात उपलब्ध असलेल्या प्रत्येक माध्यमाचा प्रभावी वापर करणे ही ब्रॅण्ड लोकप्रिय करण्याच्या कलेची सूत्रे असतात. ती साधली, की ग्राहकांकडून ब्रॅण्डच्या कथेला लोकांची मान्यता मिळते आणि स्पर्धेच्या जगातील अन्य प्रतिस्पर्धी नकली मालाची निर्मिती करून प्रतिष्ठित मालाच्या लोकप्रियतेचा गैरफायदाही घेण्याचे प्रयत्न सुरू करतात. एखाद्या विशिष्ट उत्पादनाची ओळख असलेल्या ब्रॅण्डशी साधर्म्य दाखविणारी परंतु सूक्ष्म फरक असलेल्या उत्पादनांची बाजारपेठांममध्ये सुरू असलेली चलती ही प्रस्थापित ब्रॅण्डची प्रतिष्ठा टिकविण्याच्या प्रयत्नांपुढील मोठे आव्हान असते.

याच स्पर्धेत काही प्रस्थापित ब्रॅण्ड काळाच्या प्रवाहासोबत विस्मृतीच्या गर्तेतही गेलेले आढळतात. ही केवळ व्यापार, उद्योगांचीच व्यथा नाही. अलिकडे राजकारणातदेखील याच व्यथेच्या वेदना उमटताना दिसतात. मोठ्या कष्टाने उभा केलेला राजकीय प्रतिष्ठेचा आणि जनतेच्या मान्यतेचा डोलारा नव्या स्पर्धेत टिकवून ठेवण्यासाठी काय करावे, या चिंतेने राजकारणातील काही प्रस्थापित ब्रॅण्ड व्यथित आहेत, असे दिसू लागले आहे. कदाचित, त्या ब्रॅण्डच्या उभारणीच्या काळात मान्यता मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न, विश्वास संपादन करण्यासाठी आखलेल्या मोहिमा व त्यातून उभी केलेली त्या ब्रॅण्डची पुण्याई कमी होत असल्याची शंकादेखील या ब्रॅण्डना छळत असावी. राहुल गांधींनी सांगितलेल्या त्या कहाणीतील उद्योगांच्या उभारणीसारखेच कट राजकारणातील त्या ब्रॅण्डना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी कोणे एके काळी घेतले गेले असतील. कोणताही ब्रॅण्ड त्याने कमावलेल्या विश्वासार्हतेच्या गुणवत्तेवरच स्पर्धेच्या जगात टिकून राहात असतो. ही गुणवत्ता कायम राखण्याचे आव्हान ज्याला पेलते, त्याला स्पर्धेची भीती वाटत नाहीच, उलट स्पर्धेच्या काळातही त्याची विश्वासार्हता अधिक उजळते, हे बाजारपेठेचे वास्तव राजकारणातील ब्रॅण्डसाठीदेखील लागू पडते. त्यामुळे, आज राजकारणातील ज्या ब्रॅण्डना आपल्या अस्तित्वाची चिंता लागून राहिली आहे, त्यांनी आपली विश्वासार्हता आणि प्रतिष्ठा कायम राखण्याकरिता काय केले पाहिजे याचा विचार प्राधान्याने करावयास हवा.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या सुरुवातीचा काळ महाराष्ट्राच्या जनतेस अक्षरशः संमोहित करणारा होता. आपल्या हक्काच्या भूमीतही अन्याय सोसणाऱ्या मराठी माणसाला त्याच्या नावाने हाक मारून बाळासाहेबांनी त्यास त्याच्या क्षमतांची जाणीव करून दिली आणि झोपी गेलेल्या त्या श्रमिकाप्रमाणे जागा झालेला मराठी माणूस विश्वासाने शिवसेनेच्या पाठीशी उभा राहिला. ही संघटना आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करेल, आपल्या हक्कांचा वाटा आपल्यालाच मिळावा यासाठी आपली ताकद पणाला लावेल, असा विश्वास बाळासाहेबांच्या संघर्षशील नेतृत्वाकडून जनतेस मिळाला आणि शिवसेनेचे संस्थापक या नात्याने ठाकरे नावाचा एक ब्रॅण्ड राजकारणाच्या स्पर्धेत उदयास आला. पूर्वी, जेव्हा प्रसार आणि प्रचाराची माध्यमे मर्यादित होती, तेव्हा मराठीमध्ये एक म्हण लोकप्रिय होती. बोलणाऱ्याची माती विकली जाते आणि गप्प राहणाऱ्याचे मोतीदेखील पडून राहातात, ही म्हण तेव्हा राजकारणातदेखील चपखल लागू होती. या सिद्धांताचा आधार घेऊनच काही राजकीय पक्षांनी त्या काळात प्रतिष्ठा प्राप्त केली, लोकांचा विश्वासही संपादन केला. पुढे माहिती क्षेत्रात क्रांती घडत गेली आणि माध्यमांचा विस्तार होत गेल्यामुळे केवळ बोलण्यावर विश्वास न ठेवता, सर्व बाबी पडताळून पाहण्याएवढा सजगपणा लोकांमध्ये रुजू लागला. आता केवळ बोलघेवडेपणा करून माती विकण्याचे जुने प्रयोग लोकांवर प्रभाव पाडणार नाहीत, हे स्पष्ट होऊ लागले आहे. जुन्या काळात प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता प्राप्त केलेल्या काही प्रस्थापित ब्रॅण्डना सतावणाऱ्या भविष्यभयामागेही कदाचित ते कारण असू शकते.

शिवसेनेने प्राप्त केलेली विश्वासार्हता आणि प्रतिष्ठा ही केवळ बाळासाहेब ठाकरे यांची पुण्याई आहे याबाबत कोणाचेही दुमत असू शकत नाही. आज त्यांचा वारसा सांगणारे उद्धव ठाकरे हेदेखील त्याची स्पष्ट कबुलीदेखील देतात. आपल्या नावामध्ये बाळासाहेबांचे नाव आहे म्हणून आपल्याला किंमत आहे, अन्यथा आपण केवळ शून्य आहोत, असे त्यांनी एकदा बोलूनही दाखविले आहे. त्यामुळे, ब्रॅण्डचे भविष्य जपायचे असेल, तर बाळासाहेबांची पुण्याई जपली पाहिजे आणि त्यासाठी त्यांनी निर्माण केलेल्या संघटनेची प्रतिष्ठा जपली पाहिजे, हाच त्या चिंतेवरील एकमेव उपाय ठरतो. ठाकरे ब्रॅण्ड राजकारणातून कधीच पुसला जाणार नाही, असे ठाकरे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी अलिकडेच ठणकावून सांगितल्याचे वृत्त आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही तेच मत व्यक्त केले आहे. ठाकरे या ब्रॅण्डची प्रतिष्ठा आणि विश्वासार्हता ही केवळ बाळासाहेबांच्या पुण्याईवरच उभी आहे, त्यामुळे, ही पुण्याई जपण्याची जबाबदारी उद्धव ठाकरे व बाळासाहेबांचे राजकीय वारस म्हणविणाऱ्या प्रत्येकावरच राहणार आहे. बोलणाऱ्याची माती विकली जाते हा जुन्या काळातला सिद्धांत आता कालबाह्य झाला आहे आणि ब्रॅण्डची प्रतिष्ठा टिकविण्यासाठी पुन्हा नवी पुण्याई पाठीशी उभी करावी लागणार आहे.

शिवसेनेच्या स्थापनेपासून बाळासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून संघटनेत काम करणारे दिवंगत नेते डॉ. मनोहर जोशी यांनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीच्या उभारीच्या काळातच, शिवसेनेच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारा 'शिवसेना : काल-आज-उद्या' या नावाचा एक प्रदीर्घ शोधनिबंध प्रसिद्ध केला. शिवसेनेच्या उभारणीत बाळासाहेबांच्या पुण्याईचा असलेला वाटा त्या प्रबंधात्मक दस्तावेजात स्पष्टपणे अधोरेखित होतो आणि राजकारणातील 'ठाकरे ब्रॅण्ड'ने लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा एक आलेखही समोर येतो. याच ग्रंथात, शिवसेनेच्या भविष्याबाबतचे भाष्यदेखील आहे. पण विशेष म्हणजे, संपूर्ण ग्रंथ सिद्ध करण्यासाठी अपार मेहनत घेणाऱ्या मनोहर जोशी यांनी शिवसेनेचे भविष्य वर्तविण्याचे काम मात्र अन्य प्रतिष्ठितांवरच सोपविले. याच परिशिष्टात, शिवसेनेचे भविष्य कसे असेल यावर ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दत्ताजी ताम्हाणे यांनी वर्तविलेले भाकीत वर्तमानाच्या कसोटीवर घासून पाहिल्यास, सध्या सुरू असलेली ब्रॅण्ड टिकविण्याची चिंता अगदीच अनाठायी नाही, हे स्पष्ट होते. 'जोपर्यंत बाळासाहेबांचे गारुड असलेली पिढी महाराष्ट्रात आहे, तोवर शिवसेनेची पुण्याई टिकून राहील आणि उद्धव ठाकरे यांची प्रतिमा लोकप्रिय राहील व नंतर ती उतरणीस लागेल, तर राज ठाकरे यांच्या नेतृत्वावरचा लोकांचा विश्वास कमी होत जाईल व त्यांचे आजचे अनुयायी त्यांच्याकडे पाठ फिरवतील व शिवसेना हलके हलके अंतर्धान पावेल', असे स्पष्ट भाकीत ताम्हाणे यांनी या लेखात वर्तविले आहे. (शिवसेना- काल, आज- उद्या. लेखक : मनोहर जोशी, पृष्ठ ९४३). याच ग्रंथात प्रसिद्ध साहित्यिक राम शेवाळकर यांनी नोंदविलेले शिवसेनेच्या भविष्याचे भाकीतही आजच्या संदर्भात नोंद घेण्यासारखे आहे. 'ध्येयाचा धागा हातून सुटलेल्या पतंगाचे भाकीत कोण सांगू शकेल', असा प्रश्नच प्रा. शेवाळकर यांनी उपस्थित केला आहे. (पृष्ठ ९३७) कोणत्याही ब्रॅण्डविषयी लोकांच्या मनात असलेली विश्वासार्हता आणि त्या ब्रॅण्डने उभी केलेली पुण्याई या दोनच बाबी ब्रॅण्ड टिकविणाऱ्याची क्षमता सिद्ध करू शकतात. मग ते उत्पादन असो, सेवा क्षेत्र असो अथवा राजकारण!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### ग्राहकांचा माहिती अधिकार हक्क

ग्राहक संरक्षण कायदा १९८६ नुसार प्रत्येक ग्राहकाला सहा हक्क मिळाले आहेत. त्यातील माहिती अधिकार हा महत्त्वाचा हक्क म्हणावा लागेल. ग्राहक पंचायतीचे प्रणेते, ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांना, ग्राहक संरक्षण कायद्यानुसार, ग्राहकाला त्याचे हक्क तर मिळावेच, त्यासोबतच ग्राहकांच्या समस्या निवारणासाठी प्रशासकीय सेवेत अंकुश निर्माण होऊन, व्यवस्था परिवर्तनाच्या आंदोलनात ग्राहकांचा सहभाग राहावा आणि त्याचे सहकार्य मिळावे, हे उद्दिष्ट होते. त्याचाच महत्त्वपूर्ण हक्क म्हणून माहिती अधिकार होय.

माहितीचा अधिकार कायदा २००५ हा भारताच्या संसदेने तयार केलेला आहे. या कायद्यामुळे नागरिकांना माहिती मिळण्याचा अधिकार मिळतो. नागरिकांना सक्षम करणे, शासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे आणि प्रशासनाने खऱ्या अर्थाने लोकांसाठी काम करणे, हे या कायद्याचे उद्दिष्ट म्हणावे लागेल.

१५ जून २००५ रोजी संसदेने मंजूर केलेला हा कायदा १३ ऑक्टोबर २००५ रोजी लागू झाला होता. त्या कायद्यानुसार अधिकृत माहितीसाठी नागरिकांच्या विनंतीस वेळेवर प्रतिसाद देणे बंधनकारक आहे. माहितीसाठी करण्यात आलेले अर्ज/विनंती हे एक तर माहिती देऊन किंवा विनंती फेटाळून तीस दिवसांच्या कालावधीत निकाली काढले पाहिजे.

माहिती कायदा झाला खरा, पण कालांतराने तो निष्प्रभ करणे सुरू झाले. जनहिताची हमी ज्यांनी प्रत्यक्षात आणायची ती आयुक्ताची पदे रिक्त राहू लागली. केंद्रीय दक्षता आयोगावर आयक्त नेमण्याच्या समितीत कोण असावे, असे वाद झडू लागले. तसेच माहिती आयुक्ताबाबत झाले. लोकशाहीचे क्रियान्वयन करणाऱ्यांनी माहिती कायद्याचा वापर करत, प्रकल्प ठप्प पाडणे, ते बंद करणे, काही जणांना ब्लॅकमेल करणे हे सगळे सोपस्कार केले. परिणामी सत्ताधाऱ्यांनी कारणे शोधत माहिती आयुक्त नेमण्यात चालढकल सुरू केली.

तथापि, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याकडे जातीने लक्ष देऊन माहिती आयुक्तांच्या नियुक्त्या करून, वरील सर्वसामान्यांच्या समस्यांना न्याय देण्याचा निश्चित प्रयत्न केला आहे आणि तो अभिनंदनीय आहे.

सरकारी कार्यालयाची अवस्था काय आहे? तेथील कारभारामुळे राईट ऑफ इन्फॉर्मेशन हा कायदा राईट ऑफ मनी अंडरटेकर असाच तयार झाला, तर नाहीना, अशी शंका आहे. नागरिकांना न्याय मिळेल म्हणून माहितीच्या अधिकाराचे अर्ज नागरिक करतात. त्याचे पुढे काय होते, हा खरा संशोधनाचा विषय ठरावा. अपवादात्मक परिस्थितीमध्ये माहिती नाकारता येते. परंतु, सोळा वर्ष माहिती अधिकार मिळवणारा नागरिक निराशाने ग्रासला आहे. प्रथम अर्ज, प्रथम अपील, तृतीय अपील यात दोन ते तीन वर्षांचा कालावधी जातो. मग माहिती मिळते. अशी विटंबना वाट्याला येते आहे. सरकारी यंत्रणांना अर्ज करणारे त्रासदायक वाटत आहे. अर्ज करणारा प्रत्येक नागरिक हा नकारात्मक मानसिकतेचा आहे, शासनविरोधी आहे, अधिकाऱ्याचा विरोधक आहे, असा अर्थ लावून सरकारी यंत्रणा माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी काटेकोरपणे न करता, त्याची वासलात लावण्यात धन्यता मानते आहे. तीस दिवसांत कार्यवाही अपेक्षित आहे. पुढील ४५ दिवसांत प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पूर्तता करणे अपेक्षित आहे. पूर्तता यावरही बाधित झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसांत अपील करता येते. परंतु, सरकारने केलेल्या नियुक्त्यांमुळे खऱ्या अर्थाने उत्तरदायित्व नागरिकांना लाभले आहे. अपेक्षित माहिती मिळून समस्या मार्गी लागतील, अशी अपेक्षा आहे.

**श्यामकांत पात्रीकर**/९८८१७१७८४६

### एका हाताची टाळी!

एका हाताची टाळी वाजत नाही हे सगळ्यांना माहिती आहे. मलाही हे कळत. शुद्ध, सात्त्विक, प्रेम अपने कार्य का आधार है! हे सांगत मी पाहिलं ही टाळी एका ठिकाणी सहज वाजते. अगदी एका हाताने वाजते. आपुलकी आणि प्रेम भावनेने नित्य नियमित वाजते. सकाळी वाजते. सायंकाळी वाजते. रात्रीसुद्धा वाजते. लहानांना घेऊन वाजते. मोठ्यांना घेऊन वाजते. वेगवेगळ्या नावांनी संपूर्ण जगात वाजते. शंभर वर्षांपूर्वी एका दूरदृष्टीच्या द्रष्ट्या व्यक्तीला हा साक्षात्कार झाला. प्रचंड अभ्यास आपल्या समाजाचा त्यांना झाला होता. प्रेमातून, आपलेपणातून एक फार मोठे संघटन आपण उभं करू शकतो हे त्यांनी ओळखलं. त्या ठिकाणी त्या छोट्या मैदानावर काही बाल सेवकांना घेऊन ही टाळी पहिल्यांदा वाजली होती. आज या टाळीचा आवाज संपूर्ण जगात घुमतो आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे एका हाताने वाजणारी टाळी. राष्ट्रभक्ती समजून घेताना राष्ट्र प्रथम शिकावयास कुठे मिळत असेल तर ते येथे. माणूस म्हटला की गुण-दोष आलेच. पण प्रेमाची भावना घेऊन फक्त गुणांचा आदर करायचा हे शिकावं तर ते या संघटनेकडून. आलेल्या स्वयंसेवकाचे गुण ओळखून त्यातील दोष अगदी सहजपणे बाजूला निघतील एवढी छान व्यवस्था या संघटनेत आहे. तो सहज कसा घडतो. राष्ट्रप्रेमाने ओथंबून कसा जातो हा अभ्यासण्याचा विषय आहे. अगदी बालपणापासून मी स्वयंसेवक आहे. माझ्यासारखे लाखो आहेत. पण कोणालाच अजून संघ कळला नाही. सातत्याने एखाद्या ठिकाणी वावरल्यावर एखादी गोष्ट कळायला हरकत नसते. मला संघ कळला असं म्हणणारा आजही भेटत नाही. संघ ही अनुभवण्याची गोष्ट आहे. लहानपणी ऐकलेल्या आंधळ्यांच्या गोष्टीत हत्ती जसा प्रत्येकाला वेगवेगळ्या रूपात दिसला तशी ही सर्व गोष्ट आहे. सशक्त, संपन्न देशभक्तियुक्त राष्ट्र निर्माण करणे हे संघाचे उद्दिष्ट निश्चित आहे.

आपल्या आंतरिक प्रेमाची एका हाताची ही टाळी संघ आजीवन वाजवतोच आहे. याविषयी आदर, प्रेम असणाऱ्यांनी आपलाही हात पुढे केल्यास येणाऱ्या शताब्दी वर्षात या टाळीचा कडकडाट संपूर्ण जगात झाल्याशिवाय राहणार नाही. समस्त हिंदू समाजाने आपली जबाबदारी ओळखून आपला हात या टाळीसोबत टाळी द्यायला मिळवला पाहिजे. राष्ट्रहिताच्या कितीतरी आयामांवर संघ काम करतो. आपल्या आवडीच्या अभ्यासाच्या क्षेत्रात आपण आपले योगदान देऊ शकतो. येणाऱ्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आपला हात या टाळीसाठी पुढे यावा आणि विश्वगुरुपदी सनातन पुन्हा एकदा विराजमान व्हावे.

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

### 'ऑपरेशन सिंदूर जारी है...!'

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी हिंदू कुटुंब वेगळे करून त्यातील केवळ हिंदू पुरुषांची हत्या केली. देशातील हा पहिला हल्ला आहे, ज्यात देशवासीयांचा धर्म विचारून हत्या करण्यात आली. गेल्या वर्षी इस्रायलला असेच पर्यटकांवर हल्ला करून पुरुषांची हत्या करण्यात आली आणि महिलांना ओलिस ठेवले होते. काश्मीरमधील भारतीय सैन्यांमुळे या हत्याकांडानंतर उरलेल्या हिंदू महिला वाचल्या. पुरुषांना मारल्यानंतर दहशतवाद्यांनी तिथून पळ काढला व ते काश्मीर खोऱ्यात लपून बसले. ही घटना कळताच पंतप्रधान सौदी अरबमधून आपला दौरा अर्धवट सोडून भारतात परतले. नियोजनबद्ध पद्धतीने ७ मे २०२५ रोजी पाकिस्तानने केलेल्या हल्ल्याचे चोख उत्तर देत पाकड्यांचे सर्व मिसाईल्स भारताने पाडले. एकूण ६०० मिसाईल्स पाकिस्तानने भारतावर टाकली होती, परंतु भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने हे सर्व मिसाईल्स हवेतच उडवले आणि त्यांची मस्ती उतरवली. सर्वसामान्य जनतेने विचार करण्यासारखी बाब आहे की, देशात भाजपाऐवजी काँग्रेसची सत्ता असती आणि अशी परिस्थिती उदभवली असती तर... या ६०० मिसाईल्सपैकी किती मिसाईल्स भारताने उडविले असते. जो राहुल खान म्हणतो देशाला राफेलची गरज नाही, त्यांचे सरकार असते तर दिल्ली, हरयाणा, पंजाब राज्यांवर पाकिस्तानने टाकलेले मिसाईल्स परतवले गेले असते काय?



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या संरक्षणाचे बजेट वाढवले असून देशाच्या सुरक्षेला सर्वांत जास्त महत्त्व दिले आहे. आज देशात राफेल, तेजस व सुखोई ही अत्यंत शक्तिशाली विमाने भारताजवळ आहे. देशभरातीलच काय तर जगभरातील संरक्षण क्षेत्रातील सर्वांच्या तोंडात एस-४०० नाव आहे, जे रशियाकडून भारताने घेतले आहे. सोबतच स्पायडर ही देखील एक संरक्षण प्रणाली आहे. स्पायडर ही इस्रायलकडून आपण घेतलेली महत्त्वाची संरक्षण प्रणाली आहे; ज्यामुळे पाकिस्तानचे एकही मिसाईल भारताच्या कोणत्याच शहराच्या सीमा ओलांडू शकल्या नाहीत. आधीच आर्थिक अडचणीत सापडलेला पाकिस्तान आता भिकेला लागला आहे. देशाला मोदींसारखे कणखर नेतृत्व मिळाले त्यामुळे देशाच्या सैन्याची जीवित हानी कमी झाली आहे. परंतु पाकिस्तान यापुढे भारताशी सरळ युद्ध करण्याची शक्यता आता संपल्यात जमा झाली आहे. अनेक जण म्हणतात, युद्धबंदी नको. परंतु जी युद्धबंदी झाली ती पाकिस्तानची दाणादाण उडविल्यानंतर झाली आहे. या आधी १९७१ च्या युद्धात भारतीय सैन्यांनी युद्ध जिंकले, परंतु तत्कालीन नेतृत्वाने तहात हारले, अशी अवस्था होती. सध्या युद्धबंदी झाली असली, तरी १९७१ च्या युद्धानंतर सैन्याने जिंकले ते राजकीय नेतृत्वाने गमावले, असे म्हणायची जी वेळ भारतीयांवर आली होती, ती आता नक्कीच येणार नाही एवढे मात्र खरे. कारण 'ऑपरेशन सिंदूर जारी है..!'

**जितेंद्र अशोकराव कुयरे**/९४२२२००००८

### शिक्षक व्यासपीठाचे पुनरुज्जीवन : काळाची गरज

सध्या समाजात एक विचित्र मानसिकता तयार होत चालली आहे. शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला आहे. शिक्षक होणं म्हणजे जणू काही फार मोठा अपराध केल्यासारखं मानलं जाऊ लागलं आहे. हे केवळ दुर्दैव नव्हे, तर समाजासाठी मोठी आपत्ती आहे. कारण जिथं शिक्षक दुर्लक्षित होतो, तिथं समाजाचं भवितव्य अंधारात जातं हे आपण इतिहासात वारंवार अनुभवलेलं आहे. एकेकाळी 'शिक्षक व्हायचं' हे प्रत्येक सुजाण मनाचं स्वप्न असायचं. समाजात मान, आदर आणि जगाला दिशा देण्याचं व्रत म्हणून ही भूमिका पाहिली जायची. पण आजच्या स्पर्धेच्या युगात मुलं डॉक्टर, इंजिनीअर, वकील, अधिकारी, उद्योजक होण्यासाठी धडपडताना दिसतात आणि शिक्षक होणं म्हणजे मागासलेपणाचं लक्षण वाटायला लागलंय. यात भर म्हणून समाजात 'डी. ईएल. ईडी. अभ्यासक्रम बंद होतोय', 'या क्षेत्रात काही भविष्य नाही' असे गैरसमज मुद्दाम पेरले जात आहेत. हे फार धोकादायक चित्र आहे. कारण समाज घडवणारा, माणूस घडवणारा आणि देश उभारणारा खरा कारागीर शिक्षकच असतो. डॉक्टर जीव वाचवतो, इंजिनीअर पूल बांधतो, वकील न्याय मिळवून देतो पण हे सगळे घडतातच कसे? त्यांना घडवणारा शिक्षक नसता, तर कोणतंच क्षेत्र घडू शकलं नसतं.

आज देशात नवीन शैक्षणिक धोरण लागू झालंय. शिक्षणाचा नवा आराखडा तयार झालाय. त्यात प्राथमिक शिक्षणाला अधिक बळकट करण्याचा निर्णय घेतला आहे. लहान वयाच्या मुलांना समजून घेणं, त्यांच्या वयाला साजेसं शिक्षण देणं, बालमानसशास्त्रावर आधारित शिक्षण देणं यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची गरज वाढली आहे. आणि हे शिक्षक डी. ईएल. ईडी. मधूनच घडतात. ग्रामीण भागात, आदिवासी वस्त्यांमध्ये, झोपडपट्ट्यांमध्ये शिक्षणाचं बाळकडू पाजणारा शिक्षक हवा आहे. शहरी मुलं तंत्रज्ञानाच्या आहारी जाताहेत, माणुसकी, मूल्ये बाजूला पडताहेत. मुलांच्या डोळ्यांतले स्वप्नं ओळखणारा, त्यांच्या मनाच्या तारांवर प्रेमाने हात फिरवणारा शिक्षक हवा आहे.

ही जबाबदारी कोण घेणार? समाज कोण घडवणार? त्याचं उत्तर एकच शिक्षक. डी. ईल. ईडी. हा अभ्यासक्रम केवळ नोकरीसाठी नसून, पिढ्या घडवण्यासाठी आहे. दोन वर्षांत शिक्षण घेऊन, मुलांच्या भावविश्वात डोकावणारा शिक्षक घडतो. पुस्तकं शिकवणं ही त्याची भूमिका असतेच, पण त्याही पुढं जाऊन तो स्वप्न दाखवतो, जगायला शिकवतो, घडवतो. सध्या शिक्षण क्षेत्रात शिक्षकांची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. नवीन शाळा, शैक्षणिक संकुल उभारली जात आहेत. हजारो शिक्षकांच्या जागा निर्माण होत आहेत. पण अपप्रचारांमुळे आणि गैरसमजांमुळे तरुण पिढी या क्षेत्राकडे पाठ फिरवत आहे. ही धोक्याची घंटा आहे. शिक्षक म्हणून काम केल्यावर समाजात सन्मान मिळतो. प्रत्येक पिढीला घडवण्याचं भाग्य लाभतं. एखाद्या गरीब, कष्टकरी कुटुंबातील मुलाला शिकवून अधिकारी बनवल्यावर, तो स्वतःच्या पायावर उभा राहतो तेव्हा त्या यशाचा खरा वाटेकरी शिक्षक असतो. नोकरी करणं आणि नोकरी घडवणं यात फरक आहे आणि शिक्षक ही नोकरी नव्हे, ती समाज घडवण्याची साधना आहे.

आज डी. ईएल. ईडी. करणाऱ्या तरुणांनी न लाजता अभिमानाने सांगायला हवं 'हो मी शिक्षक होणार आहे.' ही नोकरी नसेल, तर पिढ्या घडवण्याची जबाबदारी असेल. शिक्षक व्यासपीठाचं पुनर्वैभव आणायचं असेल, तर नव्या दमाचे, सामाजिक जाणिवा असलेले तरुण यायला हवेत. हे स्पष्ट समजून घ्या डी. ईएल. ईडी. अभ्यासक्रम बंद होत नाहीये. उलट त्याचं महत्तव वाढतंय. सरकारी नोकऱ्यांच्या आणि खाजगी शाळांच्या संधी वाढतायत. पिढ्या घडवणं ही आजची सर्वांत मोठी गरज आहे आणि ही संधी हाती आहे. समाज शिक्षकांकडून नेहमीच अपेक्षा बाळगतो. शिक्षकाने हे करावं, ते करावं म्हणणारे असतात. पण हे सांगणारे समाजाचे घटक हे विसरतात की, शिक्षक घडवणारी व्यवस्था सुद्धा तितक्याच जिवंतपणानं, सन्मानानं आणि सातत्याने टिकणं गरजेचं आहे. शिक्षक घडले नाहीत, तर समाजाच्या आणि देशाच्या भविष्याचा पायाच उद्ध्वस्त होईल. म्हणूनच शिक्षक व्हा देशासाठी, समाजासाठी आणि आपल्या आत्मसन्मानासाठी.

**प्रा. भागवत भांगे**/७२७६४६९८००

### विस्मरण, एक आठवण

विसरभोळेपणाचे अनेक किस्से आपण कथेमधून वाचले असतील. सिनेमातून बघितले असतील. अनेकदा तर अनुभवले देखील असतील. विशेषतः प्राध्यापक वर्ग, विद्वान व आपल्या विषयात सतत मग्न असतात तेव्हा त्यांच्या संबंधात अनेक किस्से बोलले जातात. परंतु अन्य क्षेत्रातील विद्वानांची अशीच परिस्थिती असेल. फार काय घरोघरी संवाद ऐकायला येतात. "अहो , ऑफिसमधून घरी येताना अमुक एक वस्तू घेऊन या बरं." आणि संध्याकाळी ऐकायला मिळते, "काय करणार ऑफिसच्या कामात विसरून गेलो बघ."

अशा प्रकारचा विसरभोळेपणा आपल्या परिचयाचा आहे व याची गंभीर दखल घ्यावयाची आवश्यकता नसते. प्रश्न निर्माण होतो तो साधारण साठीनंतर अथवा निवृत्तीनंतर. जे स्वतःचा व्यवसाय करीत असतात त्यांना देखील अशा परिस्थितीला सामोरे जावेच लागते. कदाचित अशी अवस्था विलंबाने येत असावी. स्मरण-विस्मरण यासंबंधी विचार करत असताना १९७८ सालात गेलो. आमच्या घरी अचानक एक पाहुणे आले. गेल्या वर्षीच एका विवाह कार्याच्या निमित्ताने मिरज येथे गेलो होतो. तेथेच यांची भेट झाली होती. परिचितांचे परिचित असा प्रकार होता. एक दिलखुलास व्यक्तिमत्तव, धिप्पाड शरीरयष्टी, वयानुसार केस पांढरे, डोक्यावर मोठे पागोटे असे हे माझ्याशी बोलताना माझा पत्ता वगैरे, बोलण्याच्या ओघात विचारून घेतात.

दोन दिवसांचा मुक्काम व आम्ही परत आपल्या घरी आले असू. यांची भेट माझ्या विस्मरणात गेली होती आणि आज अचानक हे आमच्या घरी. काल संध्याकाळीच नागपुरात आले व उद्याच गाडीने परत जाणार, कोणा परिचितांकडील विवाहाचे निमित्त. मला देखील आनंद झाला. खास माझ्या भेटीकरिता आले म्हणून. माझ्यात काय विशेष बघितले त्यांनाच ठावूक.

साधारण तासभर गप्पा म्हणजे त्यांच्या संबंधितच, खूप मोठी शेती, दोन बायका वगैरे मस्त गमती जमती सांगत होते. पण खरी गंमत पुढेच आहे. चहा, फराळ सर्व झाले आता त्यांना परत जायचे होते. मी बोललो रिक्षा करून देतो तर नाहीच म्हणाले. पायी चालत आलो तसाच परत जाईन म्हणाले. मी ठीक आहे म्हणालो. पण आता अडचण अशी आली की ते कोणाकडे कार्यास आले आहेत त्यांचे नाव त्यांना काही केल्या आठवेना. बराच प्रयत्न केला तरी नेमके नावच विसरले व कोणत्या ठिकाणी म्हणजे घर, वस्ती काहीच आठवेनासे झाले. फक्त स्टेशनवर उतरलो व डाव्या हाताने गेल्यावर एक दहा मिनिटांनी मुक्कामाच्या ठिकाणी पोचलो. कॉर्नरचे पिवळ्या रंगाचे घर एवढेच आठवत होते.

आता माझी परीक्षा होती. एवढ्या धिप्पाड व्यक्तिमत्त्वास स्कूटरवर बसवून तोल संभाळत ती चालविणे म्हणजे परीक्षाच म्हणावी लागेल ना? मी विचार केला, स्टेशनवरून दहा मिनिटांत घरी पोहोचले म्हणजे अजनी स्टेशनच असणार. तसे त्यांना घेऊन धंतोलीच्या मार्गाने निघालो. तसे गंमतीशीर दृश्य असावे. मी त्यांच्या मानाने एकदम छोटा व मागे बसलेले हे भारदस्त व मोठे पागोटे वगैरे घातलेले. कुत्रा आपल्या दुचाकीवरून हत्तीला डबलसीट घेऊन जात असावा असे ते दृश्य असावे. एका दोघांनी तर थांबवून माझी चौकशी केली. आता त्यांनी सांगितल्याप्रमाणे घर सापडणे कठीणच होते. कारण बहुतांश इमारतींना पिवळा रंगच देत असत. धंतोलीतील सगळ्या गल्ली बोळा दोन नाही तीन तीन वेळा फिरून झाल्या. धंतोली सोडून लागून असलेल्या रामदासपेठेतील कॉर्नर झाले. आता मात्र आम्ही दोघेही थकलो व कंटाळलो होतो. शेवटी मी त्यांना सुचविले, तसेही तुम्ही उद्या जाणार आहात व मिरजेला थेट जाणारी एकच गाडी आहे. तेव्हा उद्या स्टेशनवर मी पोहोचवून देईन. आज आमच्याच घरी थांबा. होय म्हणण्याशिवाय त्यांना पर्यायच नव्हता. मी स्कूटर परतीच्या मार्गावर घेतली. एवढ्यात एका चहाच्या टपरीवरून दोघा तिघांनी यांना आवाज दिला. लग्नासाठी आलेलीच मंडळी होती. एकदम हायसे वाटले आणि मी स्कूटरवर तोल सांभाळण्याच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन घरी निघालो.

मला आठवते एका न्यूरोलॉजिस्टच्या व्याख्यानाला गेलो होतो. विषय देखील अल्मायझर हाच होता. विस्ताराने हा विषय मांडला. अर्थात मेडिकल टर्मिनॉलॉजीमध्ये जे विशद केले ते माझ्यासारख्या सामान्यांना समजणारे नव्हते पण मधून मधून विनोदाची पेरणी करून विषय सोपा करण्यात ते नक्कीच यशस्वी म्हणावे लागतील.

वयपरत्वे जसे आपले अवयव थकतात म्हणू अथवा कमजोर होतात तसे हे मेंदूला देखील लागू होते. औषधे घेऊन मर्यादित लाभ होतो मात्र तो अंशकालीन असेल. अशा आजारावर स्वतःचे व्यवस्थापन हेच प्रमुख असेल. जसे योग्य आहार, बदाम, सुकामेवा आदी पचन क्षमतेनुसार, नियमित व्यायाम (झेपेल असा), बीपी, शुगर असे काही असल्यास डॉक्टरांनी सांगितलेली औषधे नियमित व वेळेवर घ्यावी. स्वतःला आवडत्या विषयात गुंतवावे.

आपली ज्ञानेश्वर माउली तर सांगते

**... अंतकाळी तैसा संकटाचेवेळी हरी**
**तया संभाळी अंतर्बाह्य...**

अशा अवस्थेचा सामना प्रत्येकाला आयुष्यात करवाच लागेल. मात्र प्रयत्नपूर्वक ती लांबवण्याचा वा दूर ठेवण्याचा प्रयास तर आपण करू शकतो हे नक्कीच.

**संजय विष्णू वेलणकर**/८९२८६५०००५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बाजार समितीमध्ये ५०० ट्रक कांद्याची आवक

## प्रति क्विंटल मिळतोय २०० ते १५०० रुपये दर

## वाढीव दर मिळण्याची शेतकऱ्यांना आपेक्षा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी कांद्याची ५०० ट्रक मधून सुमारे ३०६९१ क्विंटल इतकी आवक आली होती. गेल्या काही दिवसांपासून राज्यांमध्ये हे अवकाळी पावसाचा जोर कायम होता. पावसामध्ये कांदा खराब होऊ नये. यासाठी गोडाऊन मध्ये ठेवण्यात आलेला कांदा शेतकऱ्यांनी शनिवारी पाऊस उघडल्यानंतर बाजारपेठेत विक्रीसाठी आणला. भविष्यात मान्सून मोठ्या प्रमाणात बरसेल आणि कांदा खराब होईल, या भीतीने शेतकऱ्यांनी शनिवारी मोठ्या प्रमाणात कांद्याची खेप आणली होती. या कांद्याला प्रति क्विंटल २०० ते १५०० रुपये घाऊक दर मिळाला.

दरम्यान, अवकाळी पावसाचा कहर राज्यात होता. सलग पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांना कांदा बाजारपेठेत विक्रीसाठी आणता आला नाही. अवकाळी पावसामुळे कांदा मोठ्या प्रमाणात खराब होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांनी आपला कांदा गोदामात ठेवला होता. दोन दिवस अवकाळी पावसाची हजेरी लागली नाही. त्यामुळे सोलापूर जिल्हा सोडून राज्यातील इतर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात कांदा विक्रीसाठी सोलापुरात दाखल झाला. शनिवारी कांद्याला लिलावामध्ये कमीत कमी २०० , सर्वसाधारण १५०० तर जास्तीत जास्त १९०० रुपये प्रति क्विंटल असा घाऊक दर मिळाला. भविष्यात आवक आणखीन वाढेल असा अंदाज वर्तवला जात आहे.

### पाऊसमानावर कांद्याचे दर अवलंबून

सध्या बाजारपेठेत मध्यम ते मोठ्या आकाराचे कांदे विक्रीसाठी दाखल झालेले आहेत. तर काही प्रमाणात छोट्या आकाराचे देखील कांदे आहेत. खरेदीदार व्यापाऱ्यांकडून मोठ्या आकाराच्या कांद्यांना मागणी आहे. मात्र मोठ्या आकाराचे कांदे बाजारपेठेत कमी प्रमाणात आले आहेत. त्यामुळे कांद्याचे दर सध्या घसरलेलेच आहेत. पाऊसमान पाहता कांद्याचे दर वाढू किंवा घसरू शकतात.

**- प्रकाश पाटील, व्यापारी**

### तीन हजारपर्यंतचा दर मिळावा

सध्या अवकाळी आणि यापुढे मान्सून मोठ्या प्रमाणात सुरू होणार आहे.`. त्यामुळे कांदा बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन आलेलो आहे. मात्र पावसामुळे कांद्याचे दर घसरलेले आहेत. खराब कांदा जास्त प्रमाणात आल्याने चांगल्या कांद्याला देखील म्हणावं तसा दर मिळत नाहीये. कांद्याला कमीत कमी तीन हजार रुपये पर्यंतचा दर मिळावा, अशी अपेक्षा आहे.

**- तानाजी खंडागळे, शेतकरी, कासेगाव**

### कांद्याची आवक वाढली

काही प्रमाणात भिजलेला कांदा विक्रीसाठी बाजारपेठेत आलेला आहे. तर काही कांदा लवकर काढल्यामुळे ओला कांदा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झालेला आहे. त्यामुळे अशा कांद्यांना अपेक्षित दर मिळाला नाही. भविष्यात पाऊस लक्षात घेता शेतकरी बाजारपेठेत कांदा विक्रीसाठी आणत आहेत.

**-सिद्धाराम तंबाके, आडप व्यापारी**



# विविध मागण्यांसाठी लिपिक संवर्ग संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
महाराष्ट्र राज्य लिपिक संवर्ग संघटना पुणे शाखेतर्फे विविध मागण्यांसाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सोलापूर कार्यालयासमोर शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात आले. सुधारित आकृतीबंध मध्ये लिपिक संवर्गीय अधिकारी कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध आयुक्तालय ते क्षेत्रिय कार्यालय स्तरावरील कोणतेही पद कमी न करता संघटनेने सुचवलेल्या किफायतशिर व आर्थिक बचतीच्या प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यात यावी. लिपिक संवर्गातील पदोन्नती स्तर कमी करण्यासाठी सुधारित आकृतीबंध मध्ये सहाय्यक अधीक्षक पद सुधारित मागणीनुसार कक्ष अधिकारी गट ब कनिष्ठ या पदांमध्ये समाविष्ट होण्याबाबत व पदनामात बदल करण्यात मान्यता देण्यात यावी , लिपिक संवर्गीय अधिकाऱ्याचे सुधारित सेवा प्रवेश नियम तयार करावे, लिपिक संवर्गीय प्रति नियुक्तीची पदे चिन्हांकित होऊन त्यास मान्यता देण्यात यावी. वरिष्ठ लिपिक पदे १०० टक्के पदोन्नतीने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात यावा, सहाय्यक प्रशासन अधिकारी हे पद ७५ टक्के पदोन्नतीने व २५ टक्के सरळ सेवेने भरण्याबाबत सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात यावा, इत्यादी मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा लिपिक संघटना जिल्हाध्यक्ष गौरीशंकर होनमुटे, शिवाजी सुरवसे, जीवन मद्रासी, कांचन इंगोले, रेश्मा पवार, विभुते व अधीक्षक उडानशिवे उपस्थित होते.

### दोन जून पासून लेखणी बंद

मागण्याची दखल घेतली नाही तर दोन ते चार जून पर्यंत लेखणी बंद आंदोलन करण्यात येणार आहे तसेच ५ जून पासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेला आहे.

# वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल संदर्भात तक्रारीच्या चौकशीची मागणी

**सोलापूर** : एन.एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल संदर्भात सोलापूर जिल्हाधिकारी, धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय समिती आणि मुख्यमंत्री यांच्याकडे दिलेल्या तक्रारीची चौकशी करावी, अशी मागणी डॉ. संदीप आडके यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

गरीब गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी १९३४ साली डॉ. विष्णू गणेश वैशंपायन यांनी वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलची स्थापना करून हे हॉस्पिटल सुरू केले होते. सन २००६ पर्यंत हे हॉस्पिटल वैद्यकीय सेवा देत होते. त्यानंतर विविध कारणास्तव सन २००९ पासून हे हॉस्पिटल पूर्णपणे बंद झाले. या संस्थेच्या कारभारासंदर्भात दि. १० मार्च २०२५ रोजी लेखी तक्रार दिली आहे. मात्र ट्रस्टी याप्रकरणी सुनावणीस येत नाहीते. तातडीने या प्रकरणी चौकशी करावी. या पत्रकार परिषदेस डायना आडके, डॉ. शिरीष दामले, रमाकांत गड्डम, दीपक पेंढारकर आदी उपस्थित होते.

# भारती विद्यापीठात मंगळवारी नोकरी महामेळावा

**सोलापूर, दि. ३१ मे-**
भारती विद्यापीठा अंतर्गत अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्स, सोलापूर तसेच शिखर पहारीया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व क्यू.जे.पी. आर. ग्रुप यांच्या सहकार्याने मंगळवार दि. ३ जून रोजी सकाळी ९ ते ५ या वेळेत भारती विद्यापीठ, विजापूर रोड, सोलापूर येथे मोफत नोकरी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले, अशी माहिती संचालक प्रा. डॉ. एस. बी. सावंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा नोकरी महामेळावा नवोदित तसेच अनुभवी उमेदवारांसाठी संपूर्ण मोफत आयोजित करण्यात आलेला आहे. या महामेळाव्यामध्ये पदवीधारक पदव्युत्तर, डिप्लोमा व आय.टी. आय.चे उमेदवार सहभागी होऊ शकतात. महामेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून क्यू.जे.पी.आर मोबाईल एप्लीकेशन डाउनलोड करावे. त्यामध्ये आपली माहिती भरून नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी महामेळाव्याच्या दिवशी वेळेत उपस्थित रहावे. महामेळाव्याच्या उद्घाटनासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. सोलापुरातील या महामेळाव्यामध्ये सुमारे २ हजार लोकांना नोकरी मिळू शकते. शहर व परिसरातील उमेदवारांनी या मोफत नोकरी मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. एस. बी. सावंत यांनी केले आहे. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी.पी. कोठारी, समन्वयक डॉ. शबनम माने, शिखर पहारीया फाउंडेशनचे सोलापुरातील समन्वयक तन्वीर शेख, राज सलगर क्यू.जे.पी.आर. ग्रुप संचालक मारुती गायकवाड, धर्मराज गुंडे आदी उपस्थित होते.

# नागरी समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी उद्या मोर्चा

**सोलापूर, दि. ३१ मे-**
प्रभाग क्रमांक १ मधील विविध नागरी समस्याकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने दि. २ जून रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेवर निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष सुजित अवघडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. चार हुतात्मा पुतळा चौक ते महानगरपालिका प्रवेशद्वारापर्यंत हा निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे. प्रभाग क्र. १ मधील प्रभाकर वस्ती, सम्राट चौक, मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, हनुमान नगर, चमडा कारखाना, पोफल वस्ती, मंठाळकर वस्ती आदी परिसरात विविध नागरी समस्या आहेत. या परिसरात पिण्याचे पाणी. सार्वजनिक शौचालय, ड्रेनेज लाईन, रस्त्याचे समस्या आहे. खासगी झोपडपट्टी मध्ये रमाई आवास योजना लागू करण्यात यावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात ओपन जीम करावी. येथे माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा उभारण्यात यावा आदी मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस विजयानंद काळे, आनंद इंगळे, दत्ता सोनवणे आदी उपस्थित होते.

**वस्तीत सर्वत्र ड्रेनेजचे पाणी साचते; मग सांगा कसं जगायचं?**

मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर व इतर वस्त्यांमध्ये पाण्याच्या दिवशी आणि पाऊस आल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. ड्रेनेज तुंबल्याने ते पाणी सर्वत्र पसरते. जणू तलावाचे स्वरूप प्राप्त होते. अशा परिस्थितीत कसं जगायचं असा सवाल शोभा सोनवणे यांनी यावेळी उपस्थित केला.

**ज्योतिष वर्ग प्रवेश**
**अभिनव ज्योतिष मंडळातर्फे**
8 जून 2025 पासून ज्योतिष वर्ग प्रवेश सुरु (पारंपरिक व K. P. )
संपर्क : दाते पंचांगकर्ते
६२४, दक्षिण कसबा , आनंद मंगल कार्यालय समोर, सोलापूर.
फोन - २६२५३०९ ; वेळ : सकाळी ११ ते १ व दुपारी ५ ते ७
Jhaveri

## जाहीर नोटीस

बार्शी व तालुक्यातील व विशेस्तः यावली येथील लोकांना आमचे अशिल नामे आमचे अशिल सुरेखा सुभाष मते रा. उपळे (दु), ता. बार्शी शोभा प्रल्हाद वाघमारे रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर मीनाक्षी दशरथ काकडे रा.यावली, ता. बार्शी, जि. सोलापूर. ह. मु-वाल्हेकरवाडी, पुणे यांनी सांगितलेल्या माहितीवरून जाहीर नोटिस देण्यात येते की, डी. सोलापूर सब डी व ता. बार्शी पैकी मौजे यावली येथील जमीन गट नं गट नं १८४, क्षेत्र १ हे ९९.00 आर +पो.ख.0.0१.00 आकार ७ रु.३७ पै यासी चतु:सिमा-पू- सरवदे वैगेर, द-गट नं १८७ व गट नं २३४, प-गावठाण व सदर नं पैकी २ गुंठे, उ-गट नं १७९ ते १८३ हि मिळकत आमचे अशिल व त्यांचे बहिणीची वडिलोपार्जित एकत्र कुटुंबाची समाईक कब्जे वहीवाटीची मिळकत होती व आहे. सदर मिळकतीचे अद्याप पावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही. सदर मिळकतीस असलेल्या पोकळ नोंदीचा गैरफायदा घेऊन सुलभा आण्णासाहेब पाडुळे, विजय आण्णासाहेब पाडुळे लक्ष्मी उर्फ अमृता मोहन शिंदे सदर मिळकत विक्री करणार असल्याचे खात्रीलायक समजले आहे. सदर इसमांनी बेकायदेशीर पोकळ नोंदी आधारे गट नं १८४ यावली येथील मिळकती संदर्भात कोणताही साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, लीज, इत्यादी स्वरूपाचे तत्सम व्यवहार केलेस, ते आमचे अशिल यांचे वर नमूद मिळकती मधील असणारे कायदेशीर हक्कावर व कब्जे वहिवाटीवर बंधनकारक राहणार नाही. तसेच घेणार व देणार यांना कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटिस दिली असे. ता.३१/०५/२०२५

सही/-
अशिल तर्फे adv
**ADV. RUPLI. D. TARKE.**
B.Sc. LL.M.
District and Session Court, Barshi,
**Mob. No. 866913132**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः शहर बार्शी, तालुका बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि.व ता.बार्शी पैकी शहर बार्शी म्यू. पल हदीतील दत्त बोळ सि.र.नं. ३०७०/३अ याचे क्षेत्रफळ ३४.३० ची मी. आहे. यासी चतु:सिमा पुर्वेस -सि.स.नं. ३०६९, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - सि.स.नं. ३०७०/अ व रस्ता, उत्तरेस. सि.स.नं. ३०१६. येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक जागा वागणूक व पाणी दक्षिण व पश्चिम बाजुच्या रस्त्याने जाते व आहे येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक जागा आतील बांधकामासह जागा आतील तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे वापराचे हक्कासह जागा.

वर नमूद केलेली मिळकत ही सुहास भाऊसाहेब गोदणे, रा. सोमवार पेठ, बार्शी, ता. बार्शी यांचे खरेदी मालको कबजे वहिवाटीची असून त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी ती विक्रीस काढून आमचे खरेदीदार अशिलास ती कायम खुष खरेदी देण्याचा ठराव करून इसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निषेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा भरवसा व निर्वाळा विद्यमान मालकानी आमचे अशिलास दिलाला आहे.

तरी या जाहीर नोटीसी ने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकती संबंधाने कोणाचे कांही हक्क अधिकार, तक्रारी, करार मदार, कोर्ट मॅटर वा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार व्यवहार वा दस्त असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून आठ दिवसात आमचे खालील पत्त्यावर संपर्क करुन आमची कागदोपत्री पुराव्यानिशी खातरजमा करुन द्यावी अन्यथा कोणाचेही कसलेही हक्क अधिकार नाहीत आणि असतील तर त्यांनी सोडून दिले असे आमचे अशिल गृहीत धरुन पुढील व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ३१/०५/२०२५

सही/-
**श्री.प्रसाद जे. कुलकर्णी, ॲडव्होकेट**
**लक्ष्मीनृसिंह, कासारवाडीरोड, सिध्देश्वरनगर**
**बार्शी. ता. बार्शी (अशिलातर्फे ॲडव्होकेट)**
**मो.नं. ९४२३३३२०४८**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी तथा ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी येथील म्यु. पल, हद्दीतील बिनशेती प्लॉट याचा तपशील :- गट नं. १३७८/३/ब पैकी, बिनशेती प्लॉट नं. १९ याचे क्षेत्रफळ १३९.७२ चौमी, प्लॉट नं. २० याचे क्षेत्रफळ १३९.७२ चौमी, प्लॉट नं. २१ याचे क्षेत्रफळ १३९.७२ चोमी, प्लॉट नं.२२ याचे क्षेत्रफळ १३९.७२ चौमी चौमी, या चार हि प्लॉट चे एकत्रात एकूण क्षेत्रफळ ५५८.८८ चौ.मी. आहे, यासी चतुः सिमा पुर्वेस प्लॉट नं. २५, २६, २७,२८., दक्षिणेस : प्लॉट नं. १८, पश्चिमेस ०९.०० मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस प्लॉट नं. २३ आहे, असा चतु:सीमापूर्वक बिन शेती प्लॉट आतील इतर तदंगभूत वस्तू हक्कासह.

सदरचे प्लॉट हे **श्री. स्वप्नील प्रदिप बुटे** यांच्या मालकीचे असून प्रत्यक्ष मालकी -कब्जे वाहिवाटीस आहे व सदर प्लॉट जागेच्या ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचे प्लॉट ते विक्री करू इच्छितात, सदरचे प्लॉट विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने **श्री. स्वप्नील प्रदिप बुटे** यांनी सदरचे प्लॉट विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशीला बरोबर ठरविला आहे. सदरचे प्लॉट वर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून सदरचा प्लॉट बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे, असे गृहीत धरून सदर मिळकत / सदरचे प्लॉट खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. ३१/०५/२०२५.

सही/-
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**ऑफिस पत्ता : ३९४५, भवानी पेठ, सोलापूर रोड, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिला तर्फे ॲडव्होकेट)**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे आहेरगाव ता. माढा जि. सोलापूर व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली नवीन शर्तीची (सिलिंग कायद्या अंतर्गत) मिळकत ही मारुती शिवा कांबळे यांचे मालकी व ताबे वहिवाटीची असुन सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल सिध्देश्वर भैरु कदम यांना कायम खुशखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. त्यानुसार त्यांनी आमचे अशिलाबरोबर बोलणी चालु केली आहेत व सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी बांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ वहिवाट, इसारपावती, इ. कोणत्याही स्वरुपाचा हक्क संबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत तहसिलकार्यालय माढा येथे मुळ कागदपत्रानिशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचे हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिलेले आहेत. असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. जमीन विक्री कामी जमीन मालक मारुती शिवा कांबळे यांनी मा. उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्दुवाडी यांचेकडे जमीन विक्रीस परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ही सिध्देश्वर भैरु कदम यांना जमीन मालक विक्री करणार आहे. तरी सदर जमीन विक्री करण्यास कोणाची हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत तहसिलकार्यालय माढा / जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर/उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी यांना कळवावे. परिशिष्ट जि. सोलापूर ता. माढा गाव/पंचायत आहेरगाव मिळकतीचे वर्णन - गट नं. ५०/क पैकी, क्षेत्र ०२-२० हे. आर., आकार ०१-९० रु. पैसे यांसी चतु:सिमा पुर्वेस राजु अजगर यांची जमीन, दक्षिणेस-भाऊ बनसोडे यांची जमीन, पश्चिमेस - मोहन मंडलीक यांची जमीन, उत्तरेस गट नं.५०/क पैकी जमीन. येणेप्रमाणे चतुः सिमेतील जमीन मुदतीमध्ये तक्रार न आल्यास आमचे अशिल सदर जमीनीचा ठरलेला व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे. दि.०१/०६/२०२५

सही/-
**श्री. सिध्देश्वर भैरु कदम**
**रा.अकुंभे ता. माढा जि.सोलापूर तर्फे**
**ॲड. हरिदास तानाजी गोसावी**
**बी.कॉम.एलएल.बी ॲडव्होकेट**
**रा. माढा ता. माढा जि. सोलापुर**
**मो.८९८३१८८१७३**

## नावात बदल

माझे लग्नापूर्वीचे नाव **शबाना बेगम महिबुब चौधरी** असे होते. तरी माझ्या लग्नानंतर **शबाना मशाक आळंदकर** असे आहे. सदर दोन्ही व्यक्ती एकच असून यापुढे नवीन नावाने वाचण्यात यावे.

## कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १४/३० तळमजला, बी. विंग, कटारे कॉम्पलेक्स
कॉम्प्लेक्स, गांधीनगर, बि.नं. १०, सोलापूर, MH-413006
CIN: L17119PN1980PLC022962
ई-मेल : katarespinningmills@gmail.com
Ph.: 2623981, 2628581

**३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे विवरण**

| अ. क्र. | विशेष | तिमाही समाप्त/ चालू वर्ष समाप्त ३१ मार्च २०२५ (ऑडिट केलेले) | मागील वर्षात संबंधित ३ महिने संपले ३१ मार्च २०२४ (ऑडिट केलेले) | चालू वर्षाचा शेवट ३१ मार्च २०२५ (ऑडिट केलेले) | वर्ष ते तारीख आकडे/ मागील वर्ष समाप्ती ३१ मार्च २०२४ (ऑडिट केलेले) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | 159.65 | 114.75 | 536.42 | 435.49 |
| 2 | निव्वळ नफा / (तोटा) कालावधीसाठी (कर आधी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम) | (71.37) | (189.93) | (201.55) | (206.06) |
| 3 | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंतर) | (71.37) | (189.93) | (201.55) | (206.06) |
| 4 | करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण आयटम नंतर) | (42.86) | (189.93) | (173.04) | (187.31) |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न या कालावधीसाठी नफा / (तोटा) यांचा समावेश आहे (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | (42.86) | (189.93) | (173.04) | (187.31) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 285.00 | 285.00 | 285.00 | 285.00 |
| 7 | मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळून) | | | | |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्य) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) - १. मूलभूतः २. पातळ केलेले: | (1.50) | (6.66) | (6.07) | (6.57) |
| | निव्वळ नफा / (तोटा) कालावधीसाठी (कर आधी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम) | (71.37) | (189.93) | (201.55) | (206.06) |
| | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंतर) | (71.37) | (189.93) | (201.55) | (206.06) |

**टीप:**
**अ)** उपरोक्त **31** मार्च **2025** रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी **SEBI** (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, **2015** च्या नियमन **33** अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये दाखल केलेल्या तपशीलवार आर्थिक परिणामांचा एक उतारा आहे. चे संपूर्ण स्वरूप **31** मार्च **2025** रोजी संपलेल्या तिमाहीचे आणि वर्षाचे आर्थिक निकाल स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** वेबसाइटवर आणि कंपनीच्या **www. katarespinningmillslimited.com** वर उपलब्ध आहेत.

**ब)** वरील आर्थिक परिणामांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने **30** मे **2025** रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

**ठिकाण - सोलापूर**
**तारीख - 30/05/2025**

सही/-
**किशोर कटारे**
**व्यवस्थापकीय संचालक**
**(DIN-00645013)**

सह्याद्री शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित
**सह्याद्री प्रशाला व ज्यु. कॉलेज**
दमाणीनगर, सोलापूर-४१३ ००१

**पाहिजेत** खालील पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | १२ वी पास, MS-CIT टायपिंग, मराठी ३०,इंग्रजी ३०/४० | १ | अनुदानित |

वरील शैक्षणिक अर्हता पात्र इच्छुक उमेदवारांनी आपली मूळ कागदपत्रे व सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतिसह स्वहस्ताक्षरीत अर्जासह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.
मुलाखत : रविवार, दिनांक ०८/०६/२०२५ । वेळ सकाळी ११ वाजता
मुलाखत ठिकाण : सह्याद्री प्रशाला व ज्यु. कॉलेज, दमाणीनगर, सोलापूर

अध्यक्ष
सह्याद्री शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर

सचिव
सह्याद्री शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर

Soham Ads

## मध्य रेल्वे

**डिझाइन, पुरवठा आणि विविध इतर कामे**

उपमुख्य विद्युत अभियंता/कंन्स्ट/पीएल, मध्य रेल्वे, तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबळ-400 001 भारताचे राष्ट्रपती खालील कामांसाठी आणि त्यांच्या वतीने वेबसाइटद्वारे प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून ऑनलाइन खुल्या निविदा मागवत आहेत. **कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या दौंड-सोलापूर विभागातील 2x25 केव्ही ट्रॅक्शन सिस्टम (स्कॉट कनेक्टेड ट्रान्सफॉर्मर) मध्ये 220/132/55 केव्ही ट्रॅक्शन सबस्टेशन, सेक्शनिंग पोस्ट (एसपी) आणि सबसेक्शनिंग पोस्ट (एसएसपी) चे डिझाइन, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वित करणे, ईपीसी मोडवर 3000 मेट्रिक टन लोडिंग लक्ष्य पूर्ण करण्यासाठी. **अंदाजे निविदा किंमत:** 228,05,60,035.54 (रुपये दोनशे अठ्ठावीस कोटी पाच लाख साठ हजार पस्तीस आणि चौपन्न पैसे फक्त). **बयाणा रक्कम (ईएमडी):** 1,14,03,000/- (रुपये एक कोटी चौदा लाख तीन हजार फक्त). **निविदा प्रकार:** ईपीसी (एकल टप्पा). **निविदा प्रणाली:** दोन पॅकेट प्रणाली. **निविदा शैली:** प्रत्येक वेळापत्रकासाठी एकच दर. **निविदा पुस्तिकेची किंमत:** शून्य. **पूर्णता कालावधी:** पावसाळ्यासह 24 (चोवीस) महिने. ऑफरची वैधता: 180 (एकशे ऐंशी) दिवस निविदा उघडल्याच्या तारखेपासून. वेबसाइट पत्ता: **http://www.ireps.gov.in** निविदा कागदपत्रांची उपलब्धता निविदा क्रमांक आणि निविदा कागदपत्रे वरील वेबसाइटवर पाहता येतील. **पहिली निविदापूर्व परिषद तारीख आणि वेळ:** 23/06/2025 रोजी सकाळी 11.30 वाजता. **दुसरी निविदापूर्व परिषद तारीख आणि वेळ:** 15/07/2025 रोजी सकाळी 11.30 वाजता. **निविदा सुरू होण्याची तारीख:** 24/07/2025. **निविदा सादर करण्याची आणि उघडण्याची तारीख आणि वेळ:** आवश्यक कागदपत्रांसह सर्व बाबतीत योग्यरित्या पूर्ण केलेले ई-निविदा 07/08/2025 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत. हे निविदा (तांत्रिक निविदा) त्याच दिवशी दुपारी 3.00 वाजता उघडले जाईल. जर त्या तारखेला सुट्टी जाहीर झाली तर, निविदा पुढील दिवशी वर सांगितल्याप्रमाणे त्याच वेळी उघडल्या जातील. **वरील कामांसाठी निविदाधारकांसाठी महत्त्वाच्या सूचना:** **(अ)** निविदा केवळ ई-निविदा प्रक्रियेद्वारेच भरल्या जातील. सर्व इच्छुक कर्जदारांना प्रथम IREPS वेबसाइटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. **(ब)** संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांची ऑफर सादर करण्यापूर्वी, अटी आणि शर्ती, पात्रता निकष इत्यादींबद्दल निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. **(क)** वेळोवेळी जारी केलेले निविदा दस्तऐवज आणि शुद्धीपत्रक निविदा उघडण्याच्या किमान 15 दिवस आधी या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि ते वेबसाइटवर पाहता येतील. **(ड)** आर्थिक दर पृष्ठात प्रविष्ट केलेले आणि योग्यरित्या डिजिटल स्वाक्षरी केलेले दर केवळ विचारात घेतले जातील. **(इ)** जोडल्या जाणाऱ्या कागदपत्रांवर कर्जदाराने त्याच्या मुख्य भागावर स्वाक्षरी केली पाहिजे.

**ई-निविदा सूचना क्रमांक पुणे-टीडीसी-2025-ईपीसी-05, दिनांक 29/05/2025** Sai/141

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

## मध्य रेल्वे

**सोलापुर मंडळ**

**ई-टेंडर सूचना**

डीआरएम (एस अँड टी) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.In** वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहे. **कामाचे नाव आणि त्याचे स्थान:** मध्य रेल्वेमधील सोलापूर विभागातील मिरज ते लातूर विभागात आपत्कालीन नियंत्रण परिपथ, टीएसएस/एसपी/एसएसपी कम्युनिकेशन आणि केबल जॉइंट्ससह दोषपूर्ण कार्ड केबल बदलणे. **ई-टेंडर सूचना क्रमांक: SUR-N-T-2025-26-07** तारीख: 30/05/2025. **कामाची किंमत:** रु.4,38,53,855.07. **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य. **बयाणा रक्कम:** 3,69,300/-. **काम पूर्ण होण्याची मुदत:** 12 महिने. **www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** 23/06/2025 दुपारी 3.30 वाजता. तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मॉल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. बयाणा रक्कम (EMD) पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक तपशीलांसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

**DRM(S&T) सोलापूर** Sai/SUR/50

**रेलवे फाटक को बंद स्थिती में पार करना मना है**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट - भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
Zonal Office, Agarwal Palace, First Floor, D Mart-Bharati Vidyapith Road, Opp. Patanjali Mall, Jule Solapur, Solapur - 413004.
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail : staff_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

जेथे,
सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, 2002 च्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार यांनी **10/02/2025 रोजी डिमांड नोटिस** जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.
कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, 29/05/2025 रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतीक ताबा** अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित करण्यात येत आहे, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

| अ. क्र. | शाखेचे नाव, कर्जदार आणि जामीनदार | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सुचनेची तारीख आणि एकूण देणी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- SSPM** **कर्जदार:-** १.श्री. प्रतिक ज्ञानेश्वर ठोंगे. सध्याचा पत्ता :- गट क्र. 1427 प्लॉट क्र 6 +7B दासपिंपळगाव रोड ता. बार्शी जि. सोलापूर पिनकोड 413401 कायम पत्ता :- पोस्ट हिंगणगाव पोस्ट वाकडी, ता. परंडा, जि. धाराशिव 413502 **कर्जदार:-** **श्रीमती शुभांगी प्रतीक ठोंगे** पत्ता :- गट क्र. 1427 प्लॉट क्र 6 +7B दासपिंपळगाव रोड ता. बार्शी जि. सोलापूर पिनकोड 413401 कायम पत्ता :- पोस्ट हिंगणगाव पोस्ट वाकडी, ता. परंडा, जि. धाराशिव 413502 | **श्री. प्रतीक ज्ञानेश्वर ठोंगे** आणि **सौ. शुभांगी प्रतीक ठोंगे** यांच्या नावे मालमत्ता गहाण. सर्व जमिनीचा तुकडा आणि तुकडा सोलापूर जिल्ह्यातील बार्शी गावात आहे आणि त्याचे क्षेत्रफळ 73.99 चौरस मीटर आहे आणि त्यावर सीटीएस/सर्वेक्षण क्रमांक गट क्रमांक 1427 प्लॉट क्रमांक 6 + 7ब आहे. **सीमा खालीलप्रमाणे: -** उत्तर:- प्लॉट क्रमांक 6+ 7A ची मालमत्ता पूर्व:- प्लॉट क्रमांक 3 आणि 4 पश्चिम:- रस्ता दक्षिण:- प्लॉट क्रमांक 6+ 7क ची मालमत्ता 73.99 चौरस मीटर कार्पेट म्हणजेच 73.99 चौरस मीटर आकाराच्या इमारती आणि संरचना / निवासी ब्लॉक बांधकामासह **CERSAI आयडी:- 200073603344** | **मागणी सूचना :** दिनांक **10/02/2025** रु. **31,89,689.00/- (एकतीस लाख एकोणनव्वद हजार सहाशे एकोणनव्वद रुपये)** अधिक **10/02/2025** पासून लागू न केलेले व्याज कर्जाची वसुली होईपर्यंत **सांकेतिक ताबा दिनांक: 29/05/2025** |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक** - 31/05/2025

सही/-
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...





**चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया**

**भाग - १५**

## मेटाबोलीझम आणि रनिंग

मेटाबॉलिझम आणि रनिंग यांचा खूप जवळचा संबंध आहे. धावण्यामुळे शरीरातील ऊर्जा वापर, चरबी जळणे आणि संपूर्ण मेटाबॉलिक रेट वाढतो. काही महत्त्वाचे मुद्दे असे आहेत.

**मेटाबॉलिझम म्हणजे काय?**

मेटाबॉलिझम म्हणजे आपल्या शरीरात होणारी सर्व केमिकल प्रक्रिया ज्या ऊर्जा निर्माण करतात. यामध्ये दोन भाग असतात.

**कॅटाबोलीझम:** अन्नाचे तुकडे होऊन ऊर्जा निर्माण होते.

**अन्याबोलीझम :** शरीराचे पेशी, स्नायू, आणि ऊती तयार होतात.

**रनिंगचा मेटाबॉलिझमवर प्रभाव:**

रेस्टिंग अबोलीक रेट वाढतो: नियमित रनिंगमुळे शरीर विश्रांतीच्या वेळेसही अधिक ऊर्जा खर्च करतं.

**फॅट बर्न वाढतो:** रनिंगमुळे चरबीचा वापर इंधन म्हणून होतो, विशेषतः लाँग रन दरम्यान.

**आफ्टर बर्न इफेक्ट :** रनिंग झाल्यानंतरही शरीर ऊर्जा वापरत राहतं. म्हणजे धावण्यानंतरही मेटाबॉलिझम वेगवान राहतो.

**इन्सुलिन सेन्सिटिव्हिटी सुधारते:** शरीर कार्बोहायड्रेट्स चांगले प्रोसेस करतं, जे वजन नियंत्रणासाठी फायदेशीर आहे.

वजन कमी करण्यासाठी रनिंग कसा मदत करतो?

नियमित धावल्यास शरीर साठलेले फॅट वापरायला सुरुवात करतं.

मसल मास टिकवून ठेवताना फॅट कमी करणं शक्य होतं.

धावणं आणि स्ट्रेंग्थ ट्रैनिंग अधिक काळ टिकवू आणि मजबूत मेटाबॉलिझम.

**मेटाबॉलिझम वाढवण्यासाठी रनरने काय करावं?**

आठवड्यातून किमान ३ ते ५ रनिंग सेशन्स ठेवावेत (टेम्पो, इंटरव्हल्स, लॉन्ग रन मिक्स करून).

प्रोटीन युक्त आहार घ्यावा. तो मसल रिपेअर आणि मेटाबॉलिझमसाठी महत्त्वाचा असतो.

पुरेशी झोप घ्यावी. झोपेचा मेटाबॉलिझमवर मोठा परिणाम होतो.

हायड्रेशन आणि कॅफिनेटेड ड्रिंक्स (कॉफी/ग्रीन टी) यामुळेही मेटाबॉलिक रेट थोडा वाढतो.

**सरांश :** मेटाबॉलिझम आणि रनिंग यांचा परस्परपूरक संबंध आहे. रनिंगमुळे शरीराची उर्जा वापरण्याची क्षमता वाढते, फॅट जळतो, आणि विश्रांतीच्या वेळेसही अधिक कॅलोरी खर्च होतो. नियमित धावणं, योग्य आहार, पुरेशी झोप आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग यामुळे मेटाबॉलिक रेट दीर्घकाळ टिकून राहतो. वजन नियंत्रण, ऊर्जा पातळी वाढवणं, आणि एकूण आरोग्यासाठी रनिंग हा एक प्रभावी उपाय आहे. (क्रमशः)

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

## पंजाब किंग्जची मुंबईविरुद्ध परीक्षा

**दुसरा क्वॉलिफायर-२ सामना आज**

**पंजाब किंग्ज विरुद्ध मुंबई इंडियन्स**
**स्थळ :** नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर



हार्दिक पांड्या



श्रेयस अय्यर

**अहमदाबाद, ३१ मे**

रविवारी इंडियन प्रीमियर लीगच्या क्वॉलिफायर २ मध्ये पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स आमने-सामने उभे ठाकणार आहे. या आभासी उपांत्य फेरीत पंजाब किंग्जची पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्ससमोर आक्रमक कामगिरीची कठोर परीक्षा असणार आहे.

एकतर्फी ठरलेल्या क्वॉलिफायर १ सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून ८ गड्यांनी झालेल्या पराभवामुळे श्रेयस अय्यरच्या पंजाब किंग्ज संघाचा आत्मविश्वास काहीसा कमी झाला असेल, कारण ते आता आयपीएलचे पहिले करंडक जिंकण्याचे स्वप्न पाहत असताना करो या मरोच्या परिस्थितीत आहेत.

दुसरीकडे, मुंबई इंडियन्सने एका व्यापक विजयासह संभाव्य सहाव्या आयपीएल जेतेपदाच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकत आहे. शुक्रवारी एलिमिनेटरमध्ये विजेतेपदाचा प्रबळ दावेदार असलेल्या गुजरात टायटन्सचा मुंबई इंडियन्सकडून पराभव झाला.

आयपीएलच्या या प्ले-ऑफच्या मार्गावर मुंबई इंडियन्सची कामगिरी इतर दोन संघांपेक्षा चांगली आहे आणि त्यामुळे हार्दिक पांड्याचा संघ अधिक आक्रमकपणे खेळेल. पण प्रशिक्षक महेला जयवर्धने यांच्यासमोर आपल्या संघाला संघटित ठेवण्याचे आव्हान असेल. श्रीलंकेचा माजी कर्णधाराने संघाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुंबई इंडियन्सने गत हंगामाच्या तुलनेत यंदा खूप चांगली कामगिरी केली आहे. गत हंगामात मुंबई इंडियन्स गुणतालिकेत तळाच्या स्थानी होता.

गत सामन्यातीला पराभवाला मूठमाती देऊन श्रेयस अय्यर व रिकी पॉण्टिंगच्या पंजाब किंग्ज संघाला नवीन जोमाने खेळावे लागेल. विशेषतः गोलंदाजी क्रमवारीत निर्माण झालेल्या आगीशी लढण्यासाठी त्यांची ऊर्जा वापरावी लागेल. क्वॉलिफायर १ सामन्यातील संधी गमावल्यानंतर आता पंजाब किंग्जला अंतिम फेरीत पोहोचण्याची आणखी एक संधी मिळाली आहे व ती संधी ते गमावू इच्छित नाही. श्रेयस अय्यरसह प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग, जोश इंग्लिस, मार्कस स्टोयनिस, नेहल वढेराला अधिक जबाबदारीने फलंदाजी करावी लागेल, पण त्यांना मुंबईच्या ट्रेंट बोल्ट, जसप्रीत बुमराह व मिचेल सॅण्टनरच्या प्रभावी माऱ्यापासून स्वतःचा बचाव करावा लागेल, त्यांच्याविरुद्ध खेळताना संयम बाळगावा लागेल.

मुंबई इंडियन्स संघ सध्या चांगल्या फॉर्मात आहे, त्यांना कोणतीही कमतरता भासणार नाही. रोहित सर्मा, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि हार्दिक पांड्या यासारख्या भारतीय खेळाडूंच्या समृद्ध मिश्रणावर ते एकत्र येतील. त्यांना जॉनी बेअरस्टो आणि रिचर्ड ग्लीसन यांचीही उत्तम साथ असेल.

शेवटी, नरेंद्र मोदी स्टेडियमवरील स्पर्धेचा निकाल दोन्ही गोलंदाजी आक्रमणे त्यांच्या योजना कशा राबवतात यावर अवलंबून असेल. (वृत्तसंस्था)

## जय शाह यांनी घेतली यूईएफए अध्यक्ष सेफेरिन यांची भेट

**म्युनिक, ३१ मे**

क्रिकेटचा जागतिक प्रसार सुरू ठेवत, आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी शनिवारी अलायन्झ अरेना येथे होणाऱ्या इंटर मिलान आणि पॅरिस सेंट-जर्मेन यांच्यातील चॅम्पियन्स लीग फुटबल अंतिम सामन्यापूर्वी म्युनिकमध्ये युईएफएचे अध्यक्ष अॅलेक्झांडर सेफेरिन यांची भेट घेतली.

बीसीसीआयचे माजी सचिव शाह यांनी शुक्रवारी सेफेरिन यांची भेट घेतली.

'अंतिम सामन्यापूर्वी म्युनिकमध्ये क्रिकेटचे प्रतिनिधित्व करणे आणि युईएफए अध्यक्ष अॅलेक्झांडर सेफेरिन यांच्याशी चर्चा करणे हा सन्मान आहे. आपल्या खेळाची जागतिक पोहोच वाढवत असल्याने इतर क्रीडा नेत्यांसोबत वेळ घालवणे नेहमीच मौल्यवान असते, असे जय शाह यांनी शनिवारी एक्सवर पोस्ट केले.



म्युनिक येथे इंटर मिलान व पॅरिस सेंट-जर्मेन यांच्यातील चॅम्पियन्स लीग अंतिम सामन्यापूर्वी यूईएफए अध्यक्ष अॅलेक्झांडर सेफेरिन व आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान छायाचित्र

या वर्षाच्या सुरुवातीला शाह यांनी आयओसी सत्रापूर्वी लॉसने येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीचे (आयओसी) माजी अध्यक्ष थॉमस बाक यांची भेट घेतली होती. लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकमध्ये खेळांच्या स्पर्धेत क्रिकेटचे पुनरागमन होणार आहे. (वृत्तसंस्था)

## इंग्लंडमध्ये भारतीय युवा खेळाडूंची विशेष कामगिरीची क्षमता : डिव्हिलियर्स

**मुंबई, ३१ मे**

भारताच्या युवा क्रिकेटपटूंमध्ये आगामी इंग्लंड कसोटी मालिकेत काहीतरी खास कामगिरी साध्य करण्याची प्रतिभा आहे, जर त्यांनी स्वतःवर विश्वास ठेवला तर, चमत्कारिक कामगिरी करु शकतील, असा विश्वास दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार ए. बी. डिव्हिलियर्सने व्यक्त केला. नवीन पिढीने पुढे येण्याची वेळ आली आहे, असेही ते म्हणाले.

२५ वर्षीय शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ पुढील महिन्यात इंग्लंडच्या पाच कसोटी सामन्यांच्या दौऱ्यासह जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे एक नवीन चक्र सुरू करणार आहे, यात भारतीय संघ रोहित शर्मा व विराट कोहली या अनुभवी खेळाडूंशिवाय खेळेल. या दोघांनीही अलीकडेच निवृत्तीची घोषणा केली.

गत वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यात निवृत्त झालेला ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विन व कसोटीसाठी



तंदुरुस्त नसल्यामुळे या दौऱ्यासाठी निवड न झालेला वरिष्ठ वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याचीही उणीव भासेल.

हो, तरुण खेळाडूंनी पुढे येण्याची वेळ आली आहे. शुभमन गिल कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारत आहे. भारतात खूप प्रतिभा आहे त्यासाठी आयपीएलला श्रेय दिले पाहिजे, कारण आयपीएलमुळे काही तरुणांना अगदी लहान वयातच उत्तम अनुभव मिळत आहे, असे डीव्हिलियर्सने मुंबईतील एका कार्यक्रमादरम्यान माध्यमांना सांगितले.

आम्ही या वर्षी वैभव सूर्यवंशी व इतर अनेक तरुणांना पाहिले. त पहिल्यांदाच आयपीएलमध्ये आले व त्यांनी अतिशय प्रगल्भता दाखविली व ते उच्चस्तरावर क्रिकेट खेळण्यास तयार दिसतात. आयपीएल हे, भारतीय क्रिकेटसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे, असेही तो म्हणाला.

इंग्लंड दौरा हा तरुण भारतीय संघासाठी एक कठीण परीक्षा असेल, परंतु विश्वास कायम ठेवल्याने त्यांना अनुकूल निकाल मिळविण्यास मदत होऊ शकते. त्यांना इंग्लंडमध्ये काही जबाबदारी घ्यावी लागेल, जोखीम उचलावी लागेल, ती एक कठीण परीक्षा असेल, परंतु जर त्यांना विश्वास असेल तर कदाचित ते काहीतरी खास साध्य करू शकतील, असा त्यांनी पुनरुच्चार केला.

कसोटी क्रिकेटमध्ये विराट कोहलीची उणीव भासेल, असे ते म्हणाले. एबी डिव्हिलियर्सचे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा माजी सहकारी विराट कोहलीशी विशेष संबंध आहे. (वृत्तसंस्था)

## सचिन, पारुलला रौप्य, कुजूरसह तिघांना कांस्य

**आशियाई अॅथ्लेटिक्स**

**गुमी, ३१ मे**

येथे सुरु असलेल्या २६ व्या आशियाई अॅथ्लेटिक्स स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी पारुल चौधरीने आपले दुसरे रौप्यपदक जिंकले आणि भालाफेकपटू सचिन यादवनेही रौप्यपदक मिळविले, तर धावपटू अनिमेश कुजूरने नवीन राष्ट्रीय विक्रमासह कांस्यपदक जिंकले. विद्या रामराज आणि पूजानेही आपापल्या स्पर्धांमध्ये कांस्यपदक जिंकले. भारतीय खेळाडूंनी सरस कामगिरी करत आपल्या झोळीत पदकांची भर टाकली.

यापूर्वी ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये रौप्यपदक जिंकणाऱ्या पारूल चौधरीने १५:१५.३३ सेकंदांची वेळ नोंदवत महिलांच्या ५००० मीटर शर्यतीत दुसरे स्थान मिळवले.

पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत उदयोन्मुख स्टार यादवने वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत ८५.१६ मीटर भाला फेकला. ऑलिम्पिक विजेता पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ८६.४० च्या सर्वोत्तम प्रयत्नाने सुवर्णपदक जिंकले.



सचिन यादव

उत्तर प्रदेशातील बागपत जवळील खेकरा गावातील शेतकरी कुटुंबातील असलेल्या या २५ वर्षीय सचिन यादवची मागील वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ८४.३९ मीटर होती. भारताचा सहकारी यशवीर सिंगनेही ८२.५७ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करून पाचवे स्थान मिळवले.

भारताचे दिवसातील पहिले पदक कुजूरने मिळवले. कुजूरने पुरुषांच्या २०० मीटरमध्ये एक दुर्मिळ पदक जिंकले. त्याने २०.३२ सेकंदांचा नवा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करत उत्कृष्ट कामगिरी केली.

२१ वर्षीय कुजूरने या वर्षाच्या सुरुवातीला राष्ट्रीय फेडरेशन वरिष्ठ गट अॅथ्लेटिक्स स्पर्धेत प्रस्थापित केलेल्या २०.४० सेकंदांच्या आपल्या मागील विक्रमात सुधारणा केली.

जपानच्या टोवा उझ्झावाने २०.१२ सेकंदांच्या वेळेसह सुवर्णपदक जिंकले, तर सौदी अरबच्या अब्दुलअझीझ अब्दु आय अताफीने २०.३१ सेकंदांच्या वेळेसह रौप्यपदक जिंकले.

आशियाई क्रीडा पदक विजेत्या विथ्या रामराजने ४०० मीटर अडथळे सहजतेने पार करत कांस्यपदक मिळविले. २६ वर्षीय तामिळनाडूच्या या विथ्याने ५६.४६ सेकंद वेळ नोंदवत पदक मंचावर स्थान मिळवले.

चीनच्या मो जियाडीने ५५.३१ सेकंद वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले, तर बहरीनच्या ओलुवाकेमी अदेकोयाला मागे टाकले, ज्याने ५५.३२ सेकंद वेळ नोंदवत दुसरे स्थान मिळवले. या शर्यतीत दुसरी भारतीय अनु राघवन ५७.४६ सेकंद वेळ नोंदवून सातव्या स्थानावर राहिली.

पूजाने महिलांची ८०० मीटर शर्यत २:०१.८९ सेकंद वेळ नोंदवत भारताला दिवसातील तिसरे कांस्यपदक मिळवून दिले.

महिलांच्या २०० मीटर शर्यतीच्या अंतिम फेरीत, ज्योती याराजीने २३.४७ सेकंद वेळ नोंदवत पाचवे स्थान पटकावले, तर नित्या गंधे २३.९० सेकंद वेळ नोंदवून सातवे स्थान मिळवले. याराजीने आठवड्याच्या सुरुवातीला महिलांच्या १०० मीटर अडथळ्यांमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. (वृत्तसंस्था)

## इमाने खेलिफला करावी लागेल लिंग तपासणी

**लंडन, ३१ मे**

ऑलिम्पिक मुष्टियुद्ध विजेती इमाने खेलिफला खेळाच्या नवीन नियामक मंडळासोबत आगामी स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी अनुवांशिक लिंग तपासणी करावी लागेल.

जागतिक बॉक्सिंगने सर्व खेळाडूंसाठी अनिवार्य लिंग चाचणीची घोषणा केली. धोरण जाहीर करताना नियामक मंडळाने विशेषतः खेलिफचा उल्लेख केला. अल्जेरियन सुवर्णपदक विजेती खेलिफला पुढील महिन्यात नेदरलॅण्डमध्ये होणाऱ्या आइंडहोव्हन बॉक्स चषकासह कोणत्याही आगामी स्पर्धांमध्ये लढण्यासाठी मान्यता मिळण्यापूर्वी तिची अनुवांशिक लिंग तपासणी करावी लागेल. सर्व सहभागींची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि पुरुष आणि महिलांसाठी स्पर्धात्मक पातळीचे खेळाचे मैदान प्रदान करण्यासाठी अनिवार्य चाचणीची सुरुवात लिंग, वय आणि वजन यावरील नवीन धोरणाचा भाग असेल, असे जागतिक बॉक्सिंगने एका निवेदनात म्हटले आहे. चाचण्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी व जागतिक बॉक्सिंगला निकाल प्रदान करण्यासाठी लढाऊ खेळाडूंच्या राष्ट्रीय महासंघ जबाबदार असतील, असेही जागतिक बॉक्सिंगने स्पष्ट केले आहे.

गत उन्हाळ्यात पॅरिस ऑलिम्पिकमध्ये खेलिफने सुवर्णपदक जिंकले. रशियाचे वर्चस्व असलेल्या आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग असोसिएशनने, दोन्ही खेळाडूंना पात्रता चाचणीत अपयशी ठरल्याचा दावा करून २०२३ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतून अपात्र ठरवले.

आयबीएला अनेक दशकांपासून झालेल्या गैरकृत्यांमुळे आणि वादामुळे हद्दपार केल्यानंतर आयओसीने मागील दोन ऑलिम्पिक बॉक्सिंग स्पर्धा आयोजित केल्या आणि मागील ऑलिम्पिकमध्ये वापरले जाणारे लिंग पात्रता नियम लागू केले. खेलिफ आणि तैवानच्या लिन त्या मानकांनुसार स्पर्धा करण्यास पात्र होत्या.

लॉस एंजेलिस ऑलिंपिकमध्ये तिच्या सुवर्णपदकाचे रक्षण करण्याच्या तिच्या योजनेचा भाग म्हणून खेलिफ पुढील महिन्यात आइंडहोव्हन येथे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत परतण्याचा मानस आहे, परंतु काही खेळाडूंनी व त्यांच्या महासंघांनी तिच्या समावेशाचा निषेध करण्यासाठी आधीच आवाज उठवला होता. (वृत्तसंस्था)

## २५ व्या फिट इंडिया संडे सायकल तिरंगा रॅलीसाठी देश सज्ज

**नवी दिल्ली, ३१ मे**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय फिट इंडिया संडेज ऑन सायकल उपक्रमाच्या २५ व्या आवृत्तीचे नेतृत्व करणार आहे. या विशेष रॅलीला तिरंगा रॅली म्हणून संबोधण्यात येत आहे. हा एक देशव्यापी कार्यक्रम आहे, जो या रविवारी भारतीय सशस्त्र दलांना देखील सन्मानित करेल.

ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीगीर योगेश्वर दत्त, कुस्तीपटू सरिता मोर, माजी क्रिकेटपटू आणि निवडकर्ता साबा करीम आणि अभिनेत्री शर्वरी मांडवीय यांच्यासोबत दिल्लीतील रॅलीच्या टप्प्यात सहभागी होणार आहे. मेजर ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियम येथून या सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखवला जाईल.या रॅलीत १,२०० हून अधिक सायकलस्वारांची उपस्थिती अपेक्षित आहे आणि त्याच वेळी, देशभरातील २,००० हून अधिक ठिकाणी तिरंगा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. ३ जून रोजी होणारा जागतिक सायकल दिन, रविवारचा कार्यक्रम केवळ तंदुरुस्तीमध्ये सायकलिंगच्या मोठ्या भूमिकेचा संदेशच नाही, तर भारताच्या सशस्त्र दलांना सामूहिक श्रद्धांजली म्हणूनही काम करेल.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, ओडिशाचे राज्यपाल हरी बाबू कंभमपती तिरंगा रॅलीच्या भुवनेश्वर आवृत्तीला हिरवा झेंडा दाखवतील. (वृत्तसंस्था)

## ऑस्ट्रियन गोल्फ ओपनमध्ये अहलावत ११ व्या स्थानावर

**साल्जबर्ग :** वीर अहलावतने दुसऱ्या दिवशी स्थिर खेळत ऑस्ट्रियन अल्पाइन ओपन गोल्फ स्पर्धेत ११ वे स्थान मिळविले. अहलावत ११-अंडरवर ५-अंडर आणि आघाडीवर असलेल्या मार्सेल श्नायडर (६३-६६) पेक्षा सहा शॉट्स मागे होता. अहलावतचा सहकारी शुभंकर शर्माने दुसऱ्या फेरीत एक-अंडर पारची फेरीसह खूपच चांगली खेळली, परंतु तो त्याला स्पर्धेत ठेवण्यासाठी पुरेसा नव्हता. कठीण पहिला दिवस त्याला पुन्हा त्रास देत होता कारण त्यामुळे तो कटपासून थोडा कमी राहिला, जो एक अंडर पारवर सेट केला होता, तर त्याचा एकूण स्कोअर चार ओव्हर पार होता. शर्माचा हा सलग पाचवा चुकलेला कट आहे. अहलावतने चार बर्डी आणि दोन बोगी मारल्या.



## सोलापूरच्या ऋतिका श्रीरामला यशवंतराव चव्हाण राज्य युवा क्रीडा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

छत्रपती संभाजीनगर येथील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिला जाणारा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार' येथील आंतरराष्ट्रीय डायव्हिंग खेळाडू ऋतिका श्रीराम हिला प्रदान करण्यात आला. हा सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे रुक्मिणी सभागृहात झाला. २१ हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. हा पुरस्कार माजी मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ऋतिकाला हा पुरस्कार दुसऱ्यांदा मिळाला आहे.

## १५ वर्षाखालील जिल्हास्तर बुद्धिबळ स्पर्धा उद्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे -**

सोलापुर चेस अॅकॅडमीने सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने सोमवार २ जुन रोजी सकाळी ठीक १० वाजता सात रस्ता येथील उपलप मंगल कार्यालय १५ वर्षाखालील जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे.

स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ८ फेऱ्यात संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १० मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. या स्पर्धेत सोलापुर जिल्ह्यातील दि. १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. प्रथम येणाऱ्या चार मुले व मुलींची निवड छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय निवड बुद्धीबळ स्पर्धे साठी करण्यात येणार आहे, निवड झालेल्या प्रत्येक खेळाडूंना रु. १०००, मेडल व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेत १० व ७ वर्षाखालील खेळाडूंना देखील प्रत्येक गटात ५ बक्षिसे ठेवण्यात आलेली असून विजेत्या खेळाडूंना एकूण ४० बक्षिसासह रु. १५ हजारपर्यंतची रोख बक्षिसे, चषक व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार आहे. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे (मो. ८८८८०४५३४४) अथवा प्रशांत पिसे (मो. ९१५६८१५९६३) यांच्याकडे संपर्क साधावा असे संस्थेचे सोलापुर चेस अॅकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, सचि सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

## आंतरराष्ट्रीय पदक विजेती कराटेपटू सोलापूरच्या भुवनेश्वरी जाधवचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

ताश्कंद , उझबेकीस्तान येथे झालेल्या एशियन कराटे फेडरेशनच्या एकविसाव्या सिनिअर व पॅरा एशियन कराटे चँपियनशीपमधे सोलापूरच्या भुवनेश्वरी संगीता सुरेश जाधव हिने वैयक्तिक कुमिते प्रकारात कास्य पदक जिंकून देशाच्या अधिकृत कराटे इतिहासात प्रथमच पदक खेचून आणले. त्यानिमित्त शनिवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा



पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी छायाचित्रात सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ अतुल लकडे.



## छत्रपती शिवाजी नाईटच्या संग्राम राठोडला सुवर्ण

**राज्य मैदानी स्पर्धेत पंधराशे मीटर धावणेत कामगिरी**

**सोलापूर, दि. ३१ मे -**

नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धेत छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाच्या संग्राम राठोड याने सुवर्णपदक पटकावले. त्याने वीस वर्षाखालील गटात पंधराशे मीटर धावण्याची शर्यत तीन मिनिटे ५९ सेकंदात पूर्ण करीत ही कामगिरी केली. या कामगिरीवर त्याची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. त्यास महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्राध्यापक संतोष गवळी, प्राध्यापक सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचा मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी त्याचे अभिनंदन करुन राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जन.सेक्रेटरी प्रा. महेश माने , संचालक महादेव गवळी, प्राचार्य डॉ. अरुण मित्रगोत्री आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समतेचे अधिष्ठाता डॉ. पालके यांचे प्रतिपादन

**बार्शी, दि.३१ मे-**
कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी आपले जीवन हयातभर परोपकारासाठी समर्पित केले. त्यांनी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीची स्थापना करुन विकासाची नांदी केली. त्यांच्या विचार व कृतीत समतेचा विचार होता. त्यामुळे ते समतेचे आधिष्ठाता आहेत, असे प्रतिपादन डॉ. राहुल पालके यांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त केले. त्यांनी अंगणातून नभांगणात, कर्मांजली व कर्माक्षरे या ग्रंथामधून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे. पुढे बोलताना डॉ. पालके म्हणाले, कर्मवीर मामासाहेबांनी सोलापूर व धाराशिव या जिल्हयात बोर्डिंगची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व राहण्याची सोय केली. जिल्ह्यांत शाळा व महाविद्यालयांची स्थापना करुन शिक्षणाचे बिगुल वाजविले. स्वावलंबन व शिक्षण हा त्यांचा मुख्य विचार होता. छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम यांची प्रेरणा घेवून त्यांनी विधायक कार्य धाडसाने केले. मामांनी शिक्षणाबरोबरच आरोग्य, सहकार व कृषी या क्षेत्रांत आमूलाग्र कार्य केले. अस्पृश्यांकरिता त्यांनी केलेले कार्य स्पृहणीय आहे. स्त्रिया व कामगार यांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी आग्रही होते. विविध ठिकाणी श्रमातून त्यांनी विहिरी खोदल्या व समतेचा दाखला दिला. शिवजयंतीसारखा सार्वजनिक उत्सव साजरा करुन त्यांनी समतेची हाक दिली. वारकरी संप्रदायाचे विचार लोकांमध्ये रुजविले. सांस्कृतिक कार्यक्रमांतून समतेचे बीज प्रखरपणे रोवले. धेनू संवर्धन केंद्र, छत्रपती मुद्रणालय, आरोग्य मंदिर, जिजामाता स्मारक मंदिर, मागास शेतकरी विकास केंद्र आदींची स्थापना करुन समतेच्या विचारांना केंद्रबिंदू ठेवले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे हे चालते बोलते विद्यापीठ होते व त्या विद्यापीठात न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या लोकशाही मूल्यांचा अंतर्भाव होता.

### गणपती फार्मसीमध्ये अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**टेंभुर्णी, दि.३१ मे-**
अकोले खुर्द (ता. माढा) येथील श्री गणपती फार्मसी कॉलेजमध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रथम वर्षामध्ये शिकत असणाऱ्या साक्षी शीद, शितल बेंडगुडे आणि राज काळे यांनी `य इतिहासातील अहिल्यादेवी होळकरांच्या उल्लेखनीय योगदानावर प्रकाश टाकणारे मुख्य भाषण केले. मावळ्यांची राणी म्हणून त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी त्यांच्या अनुकरणीय प्रशासनाबद्दल, सामाजिक न्यायासाठी त्यांची बांधिलकी आणि पायाभूत सुविधा आणि शिक्षणाच्या विकासासाठी केलेल्या सांगितले. सांगता मुख्याध्यापकांच्या प्रयत्नांबद्दल कार्यक्रमाची महाविद्यालयाच्या आभार ज्यांनी यांच्या प्रदर्शनाने झाली.अहिल्यादेवी होळकरांच्या चिरस्थायी वारशाची सखोल जाणीव घेऊन गेले. कॉलेज च्या प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी त्यांच्या जीवनातील संघर्ष सांगून आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. आर.डी. बेंदगुडे, अध्यक्ष ड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, व डॉ. प्रा प्रशांत मिसाळ, प्रा.नामदेव शिंदे , प्रा. शिवराज ढगे , प्रा. शैलेश पेंदोर इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रा. प्रियांका खडसरे, प्रा. रुपाली राऊत यांनी समन्वयक म्हणून काम केले.

### अज्ञात कारणावरून तरूणाची गळफास घेत आत्महत्या

**सोलापूर** - अज्ञात कारणावरून तरूणाने गळफास घेत आत्महत्या केली. किशोरकुमार नारायण गायकवाड (वय ३८, रा. उत्तर सदर बझार, लष्कर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. शनिवारी सकाळी साडेसातच्या पूर्वी राहत्या घरी अज्ञात कारणावरून किशोरकुमार गायकवाड यांनी लोखंडी अँगलला कापडाच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी किशोरकुमार यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी किशोरकुमार यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### लिना वाईन शॉपसमोर तरूणास मारहाण

**सोलापूर** - गेंट्याल चौक येथील लिना वाईन शॉपसमोर तरूणास लाकडाने मारहाण करण्यात आली. उमिर अबुलखैर देशमुख (वय ३५, रा. शास्त्री नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३० मे रोजी रात्री दहाच्या सुमारा उमिर देशमुख हा लिना वाईन शॉपसमोर असताना तुझ्याशी बोलायचं आहे असे म्हणून विनाकारण जाकीर विजापूरे, युसूफ विजापूरे व इतर ३ जणांनी देशमुख यास लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये देशमुख याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उचारासासाठी शासकीय रुग्णालयाल दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मोबाईल चार्जिंगला लावताना करंट लागून महिला जखमी

**सोलापूर, दि.३१ मे-** मोबाईल चार्जिंगला लावताना करंट लागून महिला जखमी झाली. सोनाली हर्षल साबळे (वय ३१, रा. आमराई, हौसे वस्ती, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. शनिवारी सकाळी आकराच्या सुमारास सोनाली या घरी मोबाईल चार्जिंगला लावत होत्या. त्यावेळी उजव्या हातस करंट लागून त्या जखमी झाल्या. त्यांना भाऊ योगेश फडतरे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### हत्तुर-केगाव बायपासवर देशमुख वस्ती येथे अपघात; महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.३१ मे-**
हत्तुर-केगाव बायपासवर देशमुख वस्ती येथे अपघातात अनोळखी महिलेचा मृत्यू झाला. ३० मे रोजी रात्री साडेअकराच्या पूर्वी हत्तुर-केगाव बायपास रोडवरील देशमुख वस्ती येथे एक अनोळखी महिला जखमी व चेंदामेंदा बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने तिला सलगर वस्ती पोलिस ठाण्याकडील हवालदार उपासे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी त्या महिलेस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### माळशिरस तालुक्यात खरोखरच दारुधंदे बंद होणार का?

**पिलीव, दि. ३१ मे-**
माळशिरस तालुक्यातील अवैध धंदे बंद करावेत म्हणून सतत आंदोलने सुरू आहेत. तालुक्यातील अनेक गावातुन तक्रारी सुद्धा आहेत. नुकत्याच झालेल्या आमसभेत अनेकांनी अवैध धंदे बंद करण्याची मागणी केली होती.यावेळी आमदार उत्तमराव जानकर यांनी पोलीस प्रशासनाला खडे बोल सुनावत तालुक्यात कुठेही दारुचा धंदा दिसता कामा नये असा स्पष्ट इशारा दिला होता. त्यानंतर तरी पोलीस प्रशासन यावर काय कारवाई करणार याची सध्या तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे.

# फक्त घोषणा नको, प्रवाशांना चांगल्या बस उपलब्ध झाल्या पाहिजेत

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ मे-**
प्रवाशांना स्वच्छ,सुरक्षित, सुस्थितीत बसमधून प्रवास एवढीच त्यांची माफक अपेक्षा आहे. त्यासाठी नवीन लालपरी बसेस प्राधान्याने उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतने परिवहन मंत्र्यांकडे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, एलसीडी स्क्रीन, सार्वजनिक घोषणा प्रणाली इत्यादी अनेक सुविधा असणाऱ्या बस लवकरच पुरविल्या जातील अशी घोषणा नुकतीच परिवहन मंत्र्यांनी केली आहे. तथापि अशा सर्व सुविधायुक्त अद्यावत बसेस येतील तेव्हा येऊ द्या. तत्पुर्वी लालपरी बसेसची जास्त गरज आहे. अनेक वर्षांपासून प्रवासी नादुरुस्त बसमधून प्रवास करीत आहेत. त्यासाठी नविन लालपरी बसेस लवकरात लवकर सर्व आगारास मिळण्यासाठी ज्याठिकाणी बांधणी चालू असेल तेथे वेगाने काम कसे होईल यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत. सध्याच्या गतीने प्रत्येक आगाराला नवीन बस मिळणार असतील तर यापुढेही अनेक वर्षे मोडकळीस आलेल्या बसमधूनच प्रवास करणे प्रवाशांच्या नशिबी आहे असे दिसून येते. ७७ वा वर्धापनदिन साजरा करीत असताना वर्धापनदिनाची भेट म्हणून तरी राज्यातील सर्व आगारापर्यत नवीन लालपरी बसेस पोहोचणे, तसे नियोजन होणे अपेक्षित होते. तथापि कित्येक आगार अनेक वर्षांपासून अद्यापही लालपरीच्या प्रतिक्षेत आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्याचप्रमाणे मोडकळीस आलेल्या शिवशाही बस वातानुकुलित बसचे भाडे आकारणी करून अजूनही मार्गावर धावत नाहीत तर बंद पडत हळूहळू चालतात. ही प्रवाशांची एकप्रकारे थट्टा आहे. त्याचबरोबर पंढरपूर येथील ई बस चार्जिंग स्टेशन तयार असुन अद्यापही ई बसच्या प्रतिक्षेत आहे.सोलापूर शिवाय जिल्ह्यातील इतर आगारापर्यत ई बस पोहोचलेली नाही. महामंडळाने गांभीर्याने, तातडीने किमान नवीन लालपरी बसेस सर्व आगारापर्यत पोहोचतील याचे नियोजन प्रत्यक्षात आणावे. महामंडळ प्राधान्याने कार्यवाही करेल अशी अपेक्षा ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते,सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल,जिल्हा सचिव सुहास निकते,जिल्हा महिला प्रमुख सौ. माधुरी परदेशी,जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर,पांडुरंग अल्लापूरकर यांनी व्यक्त केली आहे.



### 'चोखिया-चोखियांचे अवघे कुटुंब संत' ग्रंथाचे प्रकाशन

**पंढरपूर, दि. ३१ मे-**
ज्येष्ठ विचारवंत डॉ.आ.ह. साळुंखे लिखित चोखिया-चोखियांचे अवघे कुटुंब संत या संत चरित्रात्मक ग्रंथाचे प्रकाशन लोकायत प्रकाशन संस्था, सातारा येथे संपन्न झाले. या ग्रंथाचे प्रकाशन सामाजिक कार्यकर्ते रवी सर्वगोड व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.

डॉ. साळुंखे म्हणाले, चोखियाने आणि त्यांच्या कुटुंबाने कमालीचे हाल अपेष्टा सोसल्या. उपासमार, दारिद्र्य, वेठबिगारी, अपमान, विडंबना, मारहाण - हे सर्व सहन करत त्यांनी जीवन जगले. या अन्यायाविरुद्ध त्यांनी विद्रोहाचे उद्गारही काढले. मात्र, तरीही काही मूल्ये त्यांनी कायम जपली - कोणावरही द्वेष नाही, मत्सर नाही. ही संतत्वाची खरी ओळख आहे. कार्यक्रमास पार्थ पोळके, अमित मेधावी, डॉ. नवनाथ शिंदे, डॉ. प्रशांत गायकवाड, लोकायत प्रकाशनचे राकेश साळुंके, जयराज शेंबडे, इंद्रजित घुले, अॅड. विनायक सरवळे, कृष्ण सर्वगोड, सुरज साखरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### कासेगावच्या महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ३१ मे-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे महिलेने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ज्योती सुनिल अवताडे (वय ४०, रा. कासेगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. ३० मे रोजी नऊच्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणावरून ज्योती यांनी घराच्या पत्र्याच्या लोखंडी पाईपला साडीच्या सहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न करीत असताना पती सुनिल अवताडे यांनी बघितले. त्यावेळी त्यांनी ज्योती यांच्या गळ्यातील फास सोडवून त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### पंढरपूरचे मुख्याधिकारी म्हणून महेश रोकडे यांची नियुक्ती

#### प्रशांत जाधव यांची बदली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ मे-**
गेल्या दीड वर्षांपूर्वी पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी म्हणून रुजू झालेले प्रशांत जाधव यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी महेश रोकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लवकरच रोकडे पंढरपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत.



मुख्याधिकारी प्रशांत जाधव यांनी दीड वर्षापासून पंढरपूर नगरपरिषदेचे कामकाज सांभाळाले आहे.

मात्र त्यांचा प्रशासनावर वचक नसल्यामुळे अधिकारी, कर्मचारी मनमानी कारभार करत होते. नागरिकांची कामे होत नसल्यामुळे नागरिकांत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत होता. याबाबतच्या तक्रारी मुंबईपर्यंत पोहोचल्याने याची दखल घेऊन मुख्याधिकारी जाधव यांची बदली करण्यात आली असून पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी म्हणून महेश रोकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रोकडे हे शिस्तप्रिय अधिकारी म्हणून प्रसिद्ध आहेत. रोकडे हे लवकरच पंढरपूर पालिकेच्या मुख्याधिकारी पदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

### भांडणात पतीने केले विष प्राशन

**सोलापूर, दि. ३१ मे-**
नवरा-बायकोच्या भांडणात रागाच्या भरात पतीने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. दिनेश सुखदेव चव्हाण (वय १९, रा. काटी तांडा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. ३० मे रोजी दुपारी राहत्या घरी नवरा-बायकोचे भांडण झाल्याने रागाच्या भरात दिनेश चव्हाण याने विषारी किटक नाशक औषध प्राशन केले. त्यामुळे त्यास त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### अक्कलकोट येथे बौद्ध महासभेतर्फे पुण्यश्लोक होळकर जयंती

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ३१ मे-**
अक्कलकोट येथे भारतीय बौद्ध महासभा तसेच राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.

राजमाता जिजाऊ मंगल कार्यालयाच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन राजमाता जिजाऊ मंगल कार्यालयाचे प्रमुख तथा रिझर्व बँकेचे निवृत्त मॅनेजर दिलीप कदम व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष कॅप्टन कमलाकर कांबळे यांनी केले होते. या कार्यक्रमास मल्लिकार्जुन बाचके, निवृत्त मुख्याध्यापक राजकुमार बनसोडे, मेजर शंभूदेव सुरवसे, श्रीशैल शिवशरण, मसाण्णा मनोरे, बसवराज सक्करगी, बागेहळ्ळी सरपंच रवी दिलीप गायकवाड, मल्लिकार्जुन भणगे, बागेहळ्ळी माजी सरपंच मनगेन लक्ष्मण माशाळे, श्री स्वामी समर्थ विश्राम धामचे सचिव धोंडीबा सिरसट ,माजी सरपंच काशिनाथ राऊत, माजी उपसरपंच विजयकुमार गायकवाड, प्रकाश पोटे, मुख्याध्यापिका सिद्धव्वा शिवशरण, सेवानिवृत्त शिक्षक व्ही आर कुंभार, पत्रकार स्वामीराव गायकवाड आदींची उपस्थिती होती. प्रारंभी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजकुमार बनसोडे, दिलीप कदम यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. महादेव माशाळे, सिद्धाराम दुधाळे, प्रकाश माशाळे, विठ्ठल माने, शिवशंकर गुंजले, ईरेश गवळी, आमसिद्ध पुजारी आदीसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.




### सिंहगड कॉलेजमध्ये राजमाता होळकर जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३१ मे-**
येथील एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे व उपप्राचार्य डॉ. एस. जी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. न्यायप्रिय, समाजकल्याणकारी, व महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या भरीव कार्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक मंदिर, धर्मशाळा, तळी, विहिरी, पाणपोई, घाट आदी जनकल्याणकारी उपक्रमांची उभारणी केली. त्यांच्या वास्तुशिल्पाची वैशिष्ट्ये आजही अनेकांना प्रेरणा देणारी आहेत. विशेषतः महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार अत्यंत उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. कैलास कारंडे सर व डॉक्टर एस जी कुलकर्णी सर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमातून उपस्थितांना अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे महत्वाचे संदेश मिळाले.

### ट्रकला पाठीमागून चारचाकीची धडक

**सोलापूर, दि. ३१ मे -**
अचानक ब्रेक दाबल्याने ट्रकला पाठीमागून चारचाकीची धडक बसल्याने एकजण जखमी झाला. राजू किसन चव्हाण (वय ४५, रा. उध्दव नगर, सैफुल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास राजू चव्हाण हे मंगळवेढा येथून राहत्या घरी चारचाकी वाहन चालवित येत होते. त्यावेळी देगाव ब्रिजजवळ बायपास रोडवर समोरून जाणाऱ्या ट्रकने अचानक ब्रेक दाबल्याने त्यात चारचाकी वाहनाने पाठीमागून ट्रकला धडक दिली. त्यामध्ये राजू चव्हाण यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना प्रकाश राठोड यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शहर विकास आराखडा; पंढरपुरात ३०० मिळकती बाधित

#### २५० नागरिकांच्या हरकती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३१ मे -**
नगरविकास विभागाने नुकताच पंढरपूर शहराचा विकास आराखडा जाहीर केला आहे. यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागण्यासाठी ३० मे पर्यंत मुदत देण्यात आली होती. यावर पंढरपुरातील २५० नागरिकांनी हरकती नोंदविल्या आहेत याची सुनावणी आषाढी यात्रेनंतर घेण्यात येणार आहे.

पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. यामुळे पंढरपुरात विकास कामे करणे गरजेचे आहे म्हणून नगरविकास विभागाने पुढील वीस वर्षाचे नियोजन करून पंढरपूर शहराचा विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात ९८ खाजगी मालमत्ता वर आरक्षण टाकण्यात आले आहेत. तर तीन रस्त्याचे २४ मीटर रुंदीकरण करण्यात येणार आहे. या रुंदीकरणांमध्ये पंढरपूर शहरातील ३०० हून अधिक मालमत्ताधारक बाधित होणार आहेत. नगरविकास विभागाने जाहीर केलेल्या आराखड्याबाबत नागरिकांना हरकती व सूचना देण्यासाठी ३० मे पर्यंत मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपली असून २५० नागरिकांनी हरकती नोंदविल्या आहेत.

या हरकतीवर सुनावणी आषाढी यात्रेनंतर घेण्यात येणार आहे. शासनाने पंढरपूर कॉरिडोर करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे चौफाळा ते महाद्वार घाट पर्यंत सुमारे ६०० मालमत्ताधारक बाधित होणार आहे. यामुळे येथील नागरिकांनी कॉरिडोरला विरोध करून आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे. कॉरिडॉरचा विषय चर्चेत असतानाच नगर विकास विभागाने पंढरपूर शहराचा विकास आराखडा सादर केला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दक्षिण तालुक्याचा ड्रीम प्रोजेक्ट लवकरच पूर्ण करणार

## आमदार सुभाष देशमुख; भिमा-सीना नदी जोड कालव्याचे प्राथमिक सर्व्हेक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
राज्य सरकारने भीमा-सीना जोड कालव्यास मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पंचवीस हजार एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. येणाऱ्या पंचवार्षिक मध्ये सीमा भिमा जोडकालवा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे तालुक्याचा एक ड्रीम प्रोजेक्ट लवकरच पूर्णत्वास जाणार आहे, असे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

वडापूर बॅरेजमधून भिमा-सीना नदी जोड कालवा या कामाचे प्राथमिक सर्व्हेक्षण व अन्वेषण उद्घाटन समारंभ शनिवारी वडापूर (ता. दक्षिण सोलापूर) येथे आ. देशमुख यांच्या हस्ते पार पडला,



त्यावेळी ते बोलत होते. वडापूर बॅरेज येथून जोडकालव्याद्वारे १४.४७ दशलक्ष घन मीटर इतके पाणी सीना नदीत येणार आहे. नदीवरील नंदूर, वडकबाळ, सिंदखेड, बंदलगी, कोर्सेगाव व कुडल येथे कोल्हापूर पद्धतीच्या ६ बंधाऱ्यात उजनी धरणाचे पाणी उपलब्ध होणार आहे. या जोड कालव्याची लांबी १८ किमी असून सीना नदीवरील कोल्हापूर बंधारा अकोले मंद्रूप ते कुडल संगमपर्यंत ३५ किलो मीटर अंतराचा आहे. या कामासाठी एक कोटींचा निधी आ. सुभाष देशमुख यांनी मंजूर करून घेतला आहे. या कामाचे सर्वेक्षण ८ दिवसात पूर्ण होईल. ही योजना लवकरच कार्यान्वीत होण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या विकासाला व उत्पन्नाला चांगलीच गती मिळणार आहे, असेही आ.सुभाष देशमुख म्हणाले. यावेळी तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, यतीन शहा, सुभाष पाटील, रमेश आसबे, मनोज पवार, सुनील नांगरे, पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### वाहून जाणारे पाणी वडापूर बॅरेज येथे येणार

अतिवृष्टीच्या काळात भीमा नदीला महापूर येत असतो अशा काळात जवळपास ९ ते ११ टीएमसी पाणी नदीपत्रातून वाहून जाते. वाहून जाणारे पाणी वडापूर बॅरेज येथे आणून याचे प्रयोजन या प्रकल्पाच्या माध्यमातून होत आहे, असे आ. सुभाष देशमुख म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

## महत्वाचे...



### रेल वनविहार येथे १२५ झाडांचे वृक्षारोपण

**सोलापूर, दि. ३१ मे-**
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रेल्वे विभागाकडून डॉ. सुजित मिश्रा डि.आर.एम. सोलापूर आणि अंशुमाली कुमार ए.डि.आर.एम. सोलापूर यांच्या नेतृत्वाखाली जवळपास १२५ झाडे लावण्यात आली. तसेच १२५ कापडी पिशव्यांचे वाटप प्लास्टिक कॅरीबॅगला पर्याय म्हणून वाटप करण्यात आले. याप्रसंगी अंशुमाली कुमार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सचिन गणेर, शिवकुमार मलभागे, आदित्य त्रिपाठी, प्रवीण तळे, शैलेश स्वामी, परशुराम लांबतुरे, संजय पोळ, कालिदास कोरे उपस्थित होते. जितेंद्र वाघमारे, विजयकुमार खामगावकर, साहील मेश्राम, बब्रुवान सुरवसे, भिमशा मस्के यांनी वृक्षारोपण यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### जीर्ण रेल्वे डब्याचे रुपांतर हॉटेलमध्ये; प्रवाशांसाठी २४ तास राहणार सेवा सुरु

**सोलापूर, दि. ३१ मे-**
सोलापूर रेल्वेस्थानकातील महात्मा गांधी पुतळासमोरील सोलापूर स्थानकात आता २४ तास रेल्वेच्या डब्यात बसून प्रवाशांना नाष्टा व जेवणाचा आस्वाद घेता येणार आहे. येथे रेल्वेच्या स्क्रॅप डब्याचे नूतनीकरण करून त्यात हॉटेल सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान, अमृत भारत योजनेंतर्गत सोलापूर स्थानकाचे नूतनीकरण करण्यात येत आहे. यामध्ये विविध अत्याधुनिक बदल करण्यात येत आहेत. या अनुषंगाने नवीन पार्किंगच्या परिसरात हे हॉटेल सुरू होत आहे. याचे काम अंतिम टप्यात आले असून, १५ दिवसांत हे हॉटेल सुरू होणार आहे. यामध्ये ५० लोक बसतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. प्रवाशांसाठी स्नॅक्स, चहा, व्हेज, नॉनव्हेज अन्न पदार्थांची सोय करण्यात येणार आहे. हॉटेलला सोलापूर एक्स्प्रेस असे नाव देण्यात आले असून, यामध्ये चालत्या रेल्वेप्रमाणे सेवा मिळणार आहे. मात्र ही सोलापूर एक्स्प्रेस रेल्वे कायम जागेवर थांबलेली असणार आहे. या एक्स्प्रेसचा लाभ रेल्वे स्टेशनमध्ये येणाऱ्या प्रवाशांना व बाहेरील लोकांनाही घेता येणार आहे. ही सेवा २४ तास चालू असणार आहे. हॉटेलचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सध्या रंगरंगोटी सुरू आहे.

### जुना विजापूर नाका येथे तरूणास लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. ३१ मे-**
शहरातील जुना विजापूर नाका येथे तरूणास लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी करणाऱ्या दोघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अक्षय दिपक आठवले (वय ३०, रा. गौतम नगर, जुना विजापूर नाका, विजापूर रोड, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन सौरभ राजू घोडकुंबे, किर्तीपाल तुकाराम घोडकुंबे (रा. आंबेडकर नगर, महात्मा फुले शाळेजवळ, विजापूर रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ मे रोजी रात्री पावणे आकराच्या सुमारास जुना विजापूर नाका येथे अक्षय आठवले थांबला होता. त्यावेळी सौरभ घोडकुंबे हा आठवलेजवळ येऊन त्याला किर्तीपाल हा बोलावत असल्याचे सांगत हाताने मारहाण करीत किर्तीपाल जवळ नेले. तिथे किर्तीपाल व सौरभ या दोघांनी मागील भांडणाचा राग मनात धरून तु मला शिवी देतो, तुला मस्ती आली आहे का असे म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच सौरभ याने लोखंडी वस्तूने आठवले याच्या तोंडावर मारहाण करून त्यास गंभीर जखमी केले. यावेळी अक्षयचा भाऊ अविनाश हा वाचविण्याचा प्रयत्न करीत असता त्यासदेखील मारहाण करण्यात आली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भिसे पुढील तपास करीत आहेत.

### १७ वर्षीय युवकाच्या मृत्यूप्रकरणी वाहनचालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ मे-**
महामार्गावर शेळ्या चारणाऱ्या १७ वर्षिय नैतिक माने या बालकाच्या अंगावरून ट्रक घालून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकाविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करणयात आला आहे. नैतिक राम माने (वय १७, रा. कवठे, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्या बालकाचे नाव आहे. याबाबत इंद्रजित बंडा भोसले (वय ५२, रा. कवठे, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन डीडी ०१ एन ९५७४ क्रमांकाच्या कंटेनरचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ मे रोजी दुपारी नैतिक माने हा शेळ्या चरण्यासाठी गेला होता. दुपारी दीडच्या सुमारास केगाव-हत्तुर बायपास रोडवर गावाजवळ तो शेळ्या चारत असताना भरधाव आलेल्या मालट्रकखाली सापडून त्याचा अपघात झाला. अपघातानंतर ट्रकचालक ट्रक जागेवरच सोडून पळून गेला. सलगर वस्ती पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार वाल्मिकी यांनी नैतिक यास शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. शितलकुमार यांनी घोषित केले. निष्काळजीपणे कंटेनर चालवून नैतिकच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाल्मिकी पुढील तपास करीत आहेत.

### एसटी बसमधून प्रवाशाचे पावणे पाच लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. ३१ मे -**
सोलापूरहून डोंबिवली जाणाऱ्या एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या वृध्द प्रवाशाचे ४ लाख ७६ हजार ७०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून चोरट्यांनी चोरून नेले. याबाबत परमेश्वर नरसप्पा बेळे (वय ५९, रा. सी/९, मनोहर भगत बिल्डींग, तुकाराम नगर, आयरे रोड, डोबिवली पूर्व, मुंबई) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ मे रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास परमेश्वर बेळे हे सोलापूर एस टी स्थानकातून सोलापूर ते डोंबिवली जाणाऱ्या एस टी बसमधून डोंबिवली येथे गेले होते. या एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन अनोळखी चोरट्यांनी बेळे यांना बोलण्यात गुंतवून ठेवले तर दोघांनी मिळून त्यांच्या ताब्यातील बॅग फाडून ४ लख ७९ हजार ७०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. यामध्ये ४ तोळे सोन्याचे गंठण, ३ तोळ्याचे सोन्याचे तोडे, २० ग्रॅमचे सोन्याच्या अंगठ्या, ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी असा ऐवज चोरीस गेला आहे. अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक धायगुडे करीत आहेत.

# संघ म्हणजे आधुनिक भारताच्या पुनरुत्थानाचे आंदोलन

## यशवंतभाई चौधरी : पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन करून संघ शिक्षा वर्गाचा समारोप






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे आधुनिक भारताच्या पुनरुत्थानाचे आंदोलन आहे. या आंदोलनात देशातील सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे. संघाच्या शाखेतून देशभक्त तयार करण्याचे कार्य केले जाते, असे प्रतिपादन रा.स्व.संघाचे पश्चिम क्षेत्राचे सहकार्यवाह यशवंतभाई चौधरी यांनी केले. हरीभाई देवकरण प्रशालेच्या संघ शिक्षा वर्गाच्या समारोप समारंभात ते बोलत होते.

१६ मे ते ३१ जून दरम्यान रा. स्व संघाचा सोलापूरसह, नाशिक, पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर या सात जिल्ह्यांसाठीचा पश्चिम महाराष्ट्र निवासी संघ शिक्षा वर्ग झाला. एकूण २८९ स्वयंसेवक या वर्गात सहभागी झाले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सचिव सिद्धेश्वर पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर वर्गाचे सर्वाधिकारी ड. प्रशांत यादव, जिल्हा संघचालक सुनील इंगळे, सोलापूर शहराचे शहर संघचालक राजेंद्रसा काटवे उपस्थित होते.

प्रारंभी ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर संघ प्रार्थना झाली. तसेच संघाच्या संचलनातील 'प्रत्युत् प्रचलनम् ' चे प्रात्यक्षिक करण्यात आले. यानंतर 'प्रदक्षिणा संचलनम् ' करत रा. स्व. संघाच्या गुरुस्थानी असलेल्या परमपवित्र भगव्या ध्वजास संचलनाद्वारे प्रदक्षिणा घालण्यात आली.

यानंतर १५ दिवसीय संघ शिक्षा वर्गात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना देण्यात आलेल्या घोषवादन, पदविन्यास, दंड युद्ध, नियुद्ध, योगासन, सामूहिक पद्यगायन या दिलेल्या प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी सादर केलेल्या या प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी दाद दिली.

त्यानंतर 'वसुंधरा परिवार हमारा, हिंदू का यह विशाल चिंतन' हे वैयक्तिक गीत सादर करण्यात आले.

यावेळी रा. स्व. संघाचे पश्चिम क्षेत्राचे सहकार्यवाह यशवंत भाई चौधरी म्हणाले, ज्या वेळी हिंदू समाज संघटित झाला त्यावेळी भारत विश्वगुरू होता. त्यात विकृती आल्यानंतर ऱ्हास झाला. अनेक वर्षाच्या संघर्षानंतरही संस्कृती व धर्माचे रक्षण करत भारत राष्ट्र म्हणून चिरंतन उभा आहे, असेही त्यांनी सांगितले.

संघ प्रशिक्षण शिबिराचे कार्यवाह ड.आनंद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करताना सहभागी स्वयंसेवक व शिबिराची माहिती उपस्थितांना विस्तृतपणे दिली. सोलापूर शहर सहकार्यवाह प्रवीण चिक्कळी यांनी आभार प्रदर्शन केले. ध्वजावतरणाने कार्यक्रमाचा समारोप झाला. वर्गाचे मुख्य शिक्षक म्हणून ड. अक्षय खांडेकर, बौद्धिक प्रमुख म्हणून बाबासाहेब गांगुर्डे व शरद शिंदे यांनी काम पहिले. या कार्यक्रमास सोलापूरसह, नाशिक, पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी हिंदू संस्कृतीचे मानबिंदू व सांस्कृतिक एकता टिकवून ठेवण्याचे काम केले. आपल्या कार्यातून त्यांनी भारत जिवंत राष्ट्र असल्याचा संदेश जगाला दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने तो संदेश अधिक मजबूत केल्याचे स्मरण चौधरी यांनी केले.

संघ शिक्षा वर्गाच्या समारोप प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, मनीष देशमुख, नरेंद्र काळे , जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत आदी मान्यवरांनीही विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण पाहिले.

याप्रसंगी बसवारूढ मठाचे श्री श्री श्री सद्गुरु ईश्वरानंद महास्वामीजी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हिंदू एकता, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी वापर व नागरिक कर्तव्य याचा नागरिकांनी अंगीकार करावा असेही आवाहन करण्यात आले.

सोलापुरात पार पडलेल्या या संघ शिक्षा वर्गास महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्यासह मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी भेट दिली.

### विवाहितेचा छळ; सहाजणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह सहाजणांवर एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिमरन अक्रम कोठाळकर (वय २०, रा. रेवणसिध्देश्वर नगर, होटगी रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अक्रम, सासू हामीनाबाई, दीर बंदेनवाज, नणंद मदिना, शबाना, पतीची भाची अकलीन मंटुर (सर्व रा. रहिम नगर, विजयपूर, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ एप्रिल २०२३ ते ८ मे २०२५ या कालावधीत सिमरन ही सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती व त्याच्या घरातील लोकांनी सिमरन हिस वेळोवेळी शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. तसेच मानसिक व शारीरीक आणि आर्थिक त्रास दिला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी

## उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील; सोलापूर विद्यापीठात अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
रणरागिणी, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सबंध भारतभर बारा हजाराहून अधिक मंदिरांचा जिर्णोद्धार केला. पाण्यासाठी पाणवठे तसेच बारवे निर्माण करून जलव्यवस्थापनाचे उत्कृष्ट कार्य केले. त्यांचा आदर्श राज्यकारभार, युद्धनीती, न्यायव्यवस्था यातून सर्वांनाच प्रेरणा मिळते, असे गोरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी काढले.

शनिवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विद्यापीठात आयोजित विविध कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्याचे ग्रामविकास, पंचायतराज मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजीतसिंह मोहिते- पाटील, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व स्वागत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. यावेळी पीएम उषा योजनेतून दोन नवीन इमारतींचा पायाभरणी समारंभ तसेच विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीच्या शुभेच्छा देऊन विद्यापीठातील अहिल्यादेवींच्या स्मारकाचे काम १५ जुलैपर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले. अहिल्यादेवींच्या आदर्श समाजव्यवस्था, न्यायव्यवस्थेचे अनुकरण आजचा पिढीने केले पाहिजे. विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर केला आहे. रस्त्याचे कामही लवकरच पूर्ण होईल, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आदर्श विचार व कार्य डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. आज विद्यापीठाची विद्यार्थिनी भुवनेश्वर जाधव हिने कराटे स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पातळीवर कांस्यपदक पटकाविले. १५४ हून अधिक कौशल्य विकासाचे कोर्सेस विद्यापीठात सुरू आहेत. त्याचबरोबर पंढरपुरात आंतरराष्ट्रीय वारकरी संशोधन केंद्र सुरु करण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

तृतीयपंथी तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधा केंद्र देखील सुरू करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.. यासाठी शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा कुलगुरू प्रा. महानवर यांनी यावेळी व्यक्त केली. आयुक्त सचिन ओंबासे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, सिनेट सदस्य तथा भाजपच्या शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, मोहन डांगरे, सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, गणेश डोंगरे, यतीराज होनमाने, अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे सदस्य अमोल कारंडे, माऊली हळणवर यांच्यासह विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व प्रा. श्रुती देवळे यांनी केले.



# आ. कोठे यांनी अल्पावधीत विकासकामांची चुणूक दाखवली

## महसूल मंत्री बावनकुळे; इंदिरानगर येथे आरोग्य शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**
मी २००४ मध्ये आमदार झालो व मागील २२ वर्षांपासून आमदार आहे. मला सरकार विधानसभा मंत्रालय व प्रशासन व्यवस्था शिकण्यासाठी वर्षाचा कालावधी लागला, परंतु आ. देवेंद्र कोठे यांच्याकडे विकासाचा दृष्टिकोन व सर्वसामान्य जनतेसाठी असलेली तळमळ यामुळे त्यांनी अल्पावधीतच विधानसभा दणाणून सोडले मंत्रालय सरकार प्रशासकीय यंत्रणेत आपल्या उत्कृष्ट कामाची चुणूक दाखवली आहे व आम्हा सर्वांचे लक्ष वेधून घेतले, असे उद्गार भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भाजपा सोलापूर शहर मध्यपूर्व मंडळ आयोजित राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ७० फूट रोड इंदिरानगर येथे आयोजित केलेल्या आरोग्य शिबीर उद्घाटनाप्रसंगी चित्रकला स्पर्धा विजेत्यांना पारितोषिक वितरण व वृक्षारोपण प्रसंगी व्यक्त केले. सोलापूरमध्ये विधानसभेचे आमदार देवेंद्र कुठे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी त्यावेळी बोलताना सोलापूरचा जिव्हारीचा पाण्याचा प्रश्न आ. कोठे यांनी सोडविले व १ हजार कोटी दुहेरी पाईपलाईनसाठी मंजूर करून मार्गी लावला, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी येळकोट येळकोट जय मल्हार अशी घोषणा देण्यात आली. याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस आमदार विक्रांत पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, रंजीता चाकोते, शशिकांत चव्हाण माजी महापौर श्रीकांचना यंनम, बिरोबा देवस्थानचे अध्यक्ष पुंडलिक ख्याडे, मंडल अध्यक्ष अक्षय अंजीखाने, नागेश सरगम,नागेश खरात कार्यक्रमाचे आयोजक सिद्धराम ख्याडे, प्रशांत पल्ली यांच्यासह साईनाथ अंदोल, सतीश बगाडे, प्रसाद पल्ली, प्रकाश गाजूल, सुनील यळसंगी, शांतीलाल साबळे, राजू भंडारे, मल्लिनाथ बैरगुंडे याप्रसंगी उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबावदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन



**सोलापूर, दि. ३१ मे-**
राज्यकर्त्या, कर्तृत्ववान तसेच कार्यक्षम शासनकर्त्या, राष्ट्रनिर्मात्या, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने माजी नगरसेविका नूतन गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जनता सुखी, समाधानी व सुरक्षित रहावी, सामान्य माणसांना न्याय मिळावा यासाठी राज्यकारभार केला. अहिल्यादेवींनी केलेला राज्यकारभार हा प्रेरणा देणारा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यकारभाराने प्रजाहितदक्षतेचा आदर्श घालून दिला आहे. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, जेष्ठ नेते श्रीनिवास कोंडी, हेमंत चौधरी, जनरल सेक्रटरी प्रमोद भोसले, माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सलिम नदाफ, अल्पसंख्यांक राष्ट्रीय सचिव फारूक मटके, अल्पसंख्यांक अध्यक्ष अमीर शेख उपस्थित होते.



# 'येळकोट येळकोट जय मल्हार' च्या घोषणांनी दुमदुमला परिसर

## ● बेल भंडारा उधळत राजमाता अहिल्यादेवींची मिरवणूक
## ● राजदरबार गज व अश्व आणि ऑपरेशन सिंदूरने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मे-**

**पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त शहरात मिरवणूक काढण्यात आली. सर्वप्रथम सकाळी हुतात्मा चौक येथील राजमाता अहिल्यादेवी यांच्या पुतळ्याला समाज बांधवांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दुपारनंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून ऐतिहासिक आणि पारंपारिक मिरवणुकीस प्रारंभ झाला. यावेळी येळकोट येळकोट.... जय मल्हार सदानंदाचा येळकोट... या घोषणांनी सारा परिसर दणाणून गेला होता. बेल भंडारा उधळून राजमातांना अभिवादन करण्यात आले.**









दरम्यान, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त यंदाच्या वर्षी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंतीउत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने भव्यदिव्य अशा जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक सार्वजनिक जयंती उत्सव मंडळांनी अहिल्यादेवी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर भव्यदिव्य व ऐतिहासिक अशी मिरवणूक काढून अहिल्यादेवी यांचा जाज्वल्य इतिहास समाज बांधवांसमोर ठेवला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मिरवणुकीस प्रारंभ झाला. त्यानंतर सदरची मिरवणूक भागवत टॉकीज, मेकॅनिकी चौक, नवीवेस चौक, हुतात्मा चौक येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यासमोर दाखल झाली. यावेळी मिरवणुकीमध्ये ऐतिहासिक राज्यकारभाराचे देखावे सादर करण्यात आले होते.

राजमाता प्रतिष्ठानच्या वतीने संत बाळूमामा यांचा देखावा साकारला होता. शेषनाग आणि बाळूमामा यांची प्रतिकृती लक्षवेधी होती. तसेच लखोरी युद्ध जिंकल्यानंतर होळकर दरबारात इंग्रजांनी राजमाता अहिल्यादेवींना अभिवादन केल्याचे देखावे साकारले. भगवा आखाडा संस्थेच्या वतीने देखील बाळूमामांचा देखावा साकारला होता. बाळूमामांचा उभारलेला पूर्णाकृती पुतळा, त्यांचा तळ आणि मेंढ्या यामध्ये आकर्षक होत्या. अहिल्यादेवी धनगर हितवर्धक संघटना यांच्यावतीने देखील शिवतांडव हलता देखावा साकारला होता. भगवान शिवशंकर तांडव स्वरूपात साकारण्यात आले होते. तसेच संत बाळूमामा आणि अहिल्यादेवी यांच्या प्रतिमा देखील विराजमान करण्यात आल्या होत्या. सरस्वती युवक प्रतिष्ठानच्या वतीने होळकर वाडा तसेच महाकाल ज्योतिर्लिंग हा देखावा साकारण्यात आला होता. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या इंदूर या संस्थानमध्ये कशा प्रमाणे धार्मिक स्थळे विकसित केली होती. श्रीनगर, हरिद्वार, केदारनाथ, प्रयाग, बद्रीनाथ, महाबळेश्वर, गोकर्ण, इंदूर, काठमांडू येथील मंदिरे विकसित केली. हे देखाव्याच्या माध्यमातून मांडण्यात आले होते. इंदूर गावातील समृद्धी व ग्रामीण विकास हे पोस्टरच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे पुण्यश्लोक सामाजिक संस्थेच्या वतीने राजमाता यांचा दरबार साकारण्यात आला होता. यावेळी हत्तीवर राजमाता यांची प्रतिमा विराजमान करण्यात आली होती. मल्हार प्रतिष्ठानच्यावतीने श्री खंडोबा आणि राजमाता अहिल्यादेवी यांचा देखावा साकारला होता. जेजुरीचा किल्ला भक्तांचे लक्ष वेधून घेतला. यावेळी चिमुकल्या बालगोपाळांनी पांढरीशुभ्र वेशभूषा परिधान करून कपाळी भंडारा लावून मिरवणुकीमध्ये सहभाग नोंदवला.त्याचप्रमाणे होळकरशाही प्रतिष्ठान, रेड्डी कंपनी व ए.के. कंपनी यांच्या वतीने देखील देखावा साकारला होता.

### ऑपरेशन सिंदूर

राजदरबार, गज, अश्वदळ आणि ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानवर एस ४०० डिफेन्स सिस्टीमद्वारे केलेल्या हल्ल्याचे देखाव्याच्या रूपांतरातून सादरीकरण करण्यात आले होते. हा देखावा समाज बांधवांसाठी आकर्षक आणि लक्षवेधी ठरला.

### डॉल्बी आणि लाईट शो

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती उत्सव सोहळ्यानिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीमध्ये डॉल्बी आणि लाईट शो आकर्षक ठरला. विविध गीतांवर तरुणांनी ठेका धरला. तर विविध प्रकारचे लाईट इफेक्ट हे मिरवणुकीत लक्ष वेधून घेत होते.

### अबालवृद्ध समाज बांधवांनी केली एकच गर्दी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या भव्यदिव्य अशा ऐतिहासिक मिरवणुकीचा भाग होण्यासाठी आबालृद्ध समाज बांधवांनी निवडणुकीमध्ये सहभाग नोंदवला. मोठ्या उत्साही वातावरणात चिमुकल्यांनी पारंपारिक वेशभूषा करून मिरवणुकीचा आनंद लुटला.

### राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या संस्थानची पोस्टरद्वारे माहिती

होळकर राजघराण्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या प्रथम स्त्री राजकर्त्या ठरल्या. मल्हारराव होळकर यांच्या पश्चात राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी राज्यकारभार सांभाळला. त्यांच्या कार्यकाळात त्यांचे इंदूर हे संस्थान कशाप्रकारे सांभाळले. याचे देखावे मिरवणुकीमध्ये साकारले होते. त्याचप्रमाणे विविध पोस्टाद्वारे त्याची माहिती देखील समाज बांधवांसमोर ठेवण्यात आली होती. भगवान महादेव यांची आराधना करून त्यांनी सर्वत्र मंदिरांची उभारणी व जीर्णोद्धार केले. राज्य कारभार कसा चालवावा याचे धडे या माध्यमातून सर्वांना परिचित करण्यात आले.

# अहिल्यादेवी होळकर जयंती मिरवणुकीत १२ मंडळांचा सहभाग

### १०० पोलिस बंदोबस्तासाठी तैनात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत १२ मंडळांचा समावेश होता. या मिरवणुकीप्रसंगी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सोलापूर शहर पोलिसांकडून मिरवणूक मार्गावर चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

प्रभारी पोलिस आयुक्त अजित बोऱ्हाडे, उपायुक्त विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली एक सहायक पोलिस आयुक्त, ४ पोलिस निरीक्षक, १० पोलिस उपनिरीक्षक आणि सुमारे १०० पोलिस कर्मचारी मिरवणुकीच्या बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त शहरात राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती मंडळाच्यावतीने मिरवणुका काढण्यात आल्या. शनिवारी सायंकाळी चारच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून या मिरवणुकींना प्रारंभ झाला. विविध सार्वजनिक मंडळांनी काढलेल्या मिरवणुकीत डॉल्बी, लेजर-एलईडी लाईटींगसह अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील प्रसंग देखाव्यांच्या स्वरूपात सादर केले होते.

तसेच संत बाळूमामा यांच्या जीवनातील प्रसंगदेखील सादर करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरुवात झालेली ही मिरवणूक भागवत थिएटर, मेकॅनिकी चौक, सरस्वती चौक मार्गे चार हुतात्मा पुतळा चौकातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याजवळ रात्री उशिरा विसर्जित करण्यात आली. या मिरवणुकीसाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष बाब म्हणून यंदाच्यावर्षी रात्री १२ वाजेपर्यंत साऊंड स्पिकरला परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे मिरवणुका रात्री १२ पर्यंत सुरु होत्या.

**या मंडळाचा सहभाग :** मिरवणुकीत राजमाता युवा प्रतिष्ठाण (छत्रपती शिवाजी महाराज चौक), भीमरत्न बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मल्हार प्रतिष्ठाण (चौपाड), भगवा आखाडा युवा प्रतिष्ठाण, मल्हार प्रतिष्ठाण (वारद नगर, मडकी वस्ती), सरस्वती युवक प्रतिष्ठाण (लोभा मास्तर चाळ), होळकर शाही प्रतिष्ठाण (छत्रपती शिवाजी महाराज चौक), भिम-अर्जुन प्रतिष्ठाण (साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक), राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठाण (वारद चाळ), पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर मंडळ (शाहीर वस्ती, भवानी पेठ), पुण्यश्लोक बहुउद्देशीय सामाजिक संस्था (बलिदान चौक), पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी धनगर हितवर्धक संघटना (भवानी पेठ) या मंडळांचा सहभाग होता.

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसूती विभागाच्या वतीने उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व आरोग्य अधिकारी राखी माने यांच्या नियंत्रणाखाली राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विविध स्पर्धा दि.३०.५.२५ रोजी घेण्यात आले होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.



मान्यवरांचे भाषणे वैद्यकीय अधिकारी नियंत्रण अधिकारी स्पर्धेत भाग घेतलेले सर्व कर्मचारी यांचे काव्यवाचन व भाषण झाले त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ.उषा जमादार, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ अरुंधती हराळकर, नियंत्रण अधिकारी डॉ. ज्योत्स्ना कोरे, शहर लेखा व्यवस्थापक सिद्धेश्वर बोरगे, स्त्रीरोग तज्ञ दिपीका चिंचोळी, वैद्यकीय अधिकारी शैलजा सरोदे, वैद्यकीय अधिकारी अनिल पवार, संगीता लेकुरवाळे, संगीता गुरव, मिश्रक प्रदीप वेदपाठक, योगेश कांबळे, सुरेखा लोंढे, मेल मिडवाईफ, परिचारिका, आया, सफाई कामगार, रखवालदार सुरक्षा रक्षक यांच्या उपस्थितीने कार्यक्रम पार पडला. सूत्रसंचालन योगेश कांबळे यांनी केले. आभार सिस्टर सुनिता ढगे यांनी मानले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३३

**पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ।।**

ईश्वर केवळ मूर्तीमध्ये नसून तो सर्व जीवमात्रात आहे, असा संत संदेश असतांनाही, अनेक ईश्वर भक्तांना तो केवळ मंदिर, मूर्तीमध्येच दिसतो. द्वैतभावाची ही भक्तांची वृत्ती त्यांना खऱ्या ईश्वरापासून दूर ठेवते. पण संतवचनावर ज्यांचा विश्वास आहे, अशी भक्तमंडळी ईश्वराला स्वत:च्या अंतरंगात व सर्व प्राणीमात्रात पाहतात. चालत्या बोलत्या जीवरुपी ईश्वराला ओळखता आले पाहिजे. सर्व जीवमात्रात भगवंताला पाहून झाल्यानंतर उरल्या-सुरल्या दगडा-धोंडयातही संतांनी भगवंताला पाहिले आहे. संसारात अडकलेल्या जीवाचे मात्र असे नाही. तो प्रथम दगडा-धोंड्यात भगवंताला पाहतो आणि संतकृपा झालीच तर मग तो प्राणीमात्रात ईश्वराला पाहण्याचा प्रयन्त करतो. ईश्वर आणि प्राणीमात्र यांच्यात भेद करणाऱ्याला स्वत:चे वेगळे असे अस्तित्व जाणवत असते. हा वेगळेपणा त्याला मी, माया, मोह, अहंकार, द्वेष, मत्सर अशा शत्रुंच्या सहवासात ठेवतो. हे शत्रू त्याला समता, बंधुता, जिव्हाळा अशा मित्रांपासून दूर ठेवण्याचे काम करतात. या सर्व बाबींची जाणीव संतांना वेळीच होत गेली. म्हणून त्यांनी मूळात स्वत:तच भगवंताला पाहिले. विठ्ठल रुखमाई हे केवळ पंढरपूरच्या मंदिरात नसून ते पाहिल तिकडे दिसणाऱ्या सर्व जिवमात्रात, चराचरात असल्याची अनुभूती तुकाराम महाराजांनी तुम्हा-आम्हाला सांगितली. आपले अनुभवी बोल स्पष्ट करतांना ते म्हणतात, पाहें तिकडे बापमाय । विठ्ठल आहे रखुमाई ।। वा पट्टण एक भाव । अवघा ठाव सरता झाला ।। आठव नाहीं सुख दु:खा । नाचे तुका कौतुकें ।।



सर्व देही विठ्ठल रखुमाईच आपणाला दिसतात. चालता-बोलत्या जीवाबरोबर मुक्या प्राण्यातही माता-पिता असणारे विठ्ठल-रखुमाई तर दिसतातच, पण गांव, शहर, जंगल, वन अशा सर्व ठिकाणी आमचा भाव सारखाच आहे. स्थळ, काळ, वेळ याचा कसलाही विपरीत परिणाम आपल्या भावावर होत नाही. सर्व ठिकाणी समभावच असल्याचेही तुकोबा माऊली म्हणतात. महाराजांच्या या बोलाला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची अत्यंत गरज आहे. संसारात अडकलेला जीव माया, मोह, अहंकाराने त्रस्त होत चालला आहे. त्याच्या डोक्यावर स्वार्थाची पट्टी आवळली जाऊन त्याचे विश्व त्याच्यापुरते मर्यादित होत चालले आहे. सर्व जीवमात्राच्या किंवा चराचराच्या ठिकाणी भगवंताला पाहण्याचे तर सोडाच जन्म देणाऱ्या आई-वडीलांच्या ठिकाणीही या जिवाला भगवंत दिसेनासा झाला आहे. त्यामुळेच अनेक वृध्द आई-वडीलांना वृध्दाश्रमाची वाट धरण्याची वेळ येत आहे. भावा-भावातील, पती-पत्नीतील वाद वाढत आहेत. माणूस माणसापासून व खऱ्या अर्थाने स्वत:पासून दूर चालला आहे. मानवाला माणूस म्हणून जगण्यासाठी व आपल्याबरोबर इतरांना सुख-समाधान मिळण्यासाठी ज्ञानोबा-तुकारामांच्या वचनांचा स्विकार करण्याची गरज आहे. माणसाने जीवमात्रात भगवंताला पाहण्याची सुरुवात आपल्या कुटूंबातील सदस्यांपासून केली पाहिजे. आपली ही सुरुवात आपणाला अभेद्य दृष्टीच्या पूर्णत्वाला नेऊन पोहचविणारी व आपणाला सुख-दु:खाची आठवण न होता महाराजांप्रमाणे निर्भेळ आनंदात रमविणारी ठरो, अशी तुकोबांचरणी प्रार्थना.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : रविवार** | **दिनविशेष - चांगला दिवस** |
| **दि. १ जून २०२५** | **जागतिक पालक दिन** |
| **विक्रम संवत् २०८१** | **चांगदेव महाराज यात्रा** |
| **शके - १९४७** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - विश्वावसु** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - ज्येष्ठ** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु. षष्ठी (१९.५९)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - ग्रीष्म** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - आश्लेषा (२१.३५)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - ध्रुव (०९.१०)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - कौलव (०८.००)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

# अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी

## साहित्यिक समीर गायकवाड; शहरात ठिकठिकाणी अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी आहे. असे मत साहित्यिक समीर गायकवाड यांनी व्यक्त केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जयंती निमीत्त साहित्यिक समीर गायकवाड यांचे राजमाता आहिल्यादेवी होळकर आणि त्यांचा जीवन प्रवास या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.




जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सिईओ कुलदीप जंगम हे होते.

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूरच्या वतीने जिल्हा परिषदेच्या सभागृहात साजरी करण्यात आली . मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या शुभहस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर , उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मनिषा वाकडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, लेखाधिकारी पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव , प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, लेखाधिकारी श्रीकांत मिरगळे, प्रकाश शेंडगे,रणजीत घोडके, अमित सलगर, सुहास चेळेकर , शंकर बंडगर, सचिन घोडके,संतोष जाधव,रविद्र करजगी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी ओम बुरसे, गणेश साळुंखे, गणेश कलुबर्मे, श्रीमती राजश्री रोजी, श्रीम स्मिता पोरेडी, योगेश म्हमाणे, किरण निमसे, प्रविण चव्हाण, विनायक कदम, एम जे कलादगी यांनी परिश्रम घेतले. कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी आभार मानले.



## मनसेच्यावतीने होळकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सव निमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोलापूर शहर व जिल्ह्याच्यावतीने चार हुतात्मा चौकातील पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, जैनोद्दीन शेख, अमर कुलकर्णी, अभिषेक रंपुरे, संतोषकुमार घोडके, जितेंद्र टेंभुर्णीकर, गोविंद बंदपट्टे उपस्थित होते.



## छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

भारतीय इतिहासातील कर्तुत्ववान महिला शासकात लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राणींच नाव अग्रक्रमाने घ्यावेच लागेल. अनेक कौटुंबिक समस्येवर मात करीत प्रजाहितदक्ष काम करीत होत.

विशेष करून प्राणी पक्षी यांच्यासाठी औषधी वने तयार करून मानवहिताबरोबर प्राणिमात्रांची काळजी घेणाऱ्या प्रशासक होत्या. सर्व जातीधर्माना सोबत घेऊन राज्य करणाऱ्या लोकमाता होत्या, असे मत शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान यांनी व्यक्त केले.

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड जिल्हाध्यक्ष म. शफीक रचभरे, माजी महापौर आरीफ शेख, मराठा सेवा संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य इंजि. विश्वनाथ गायकवाड, नगरसेवक हारुण शेख, राजू हुंडेकरी, कादर भागानगरी, बशीर सय्यद, हारिस शेख, रुस्तुम शेख, रियाज पैलवान, रिझवान दंडोती, लक्ष्मण भोसले, मुबीन बागवान, सरफराज काझी, गफूर चौधरी, कमर होटगी ,कय्युम मोहळकर, अफवान बागवान, हुजेर बागवान, अय्यान बागवान, खाशीम बेलीफ, सोहेल बागवान आदी उपस्थित होते.

## संभाजी ब्रिगेडने दिला गरजवंताला मदतीचा हात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

राष्ट्रमाता राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पार्क चौकातील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पार्क चौकातील फूटपाथवर वजन काटा घेऊन व्यवसाय करणाऱ्या एका गरजवंताला संभाजी ब्रिगेडच्या वतीने पावसापासून संरक्षण मिळावे म्हणून रेनकोट व छत्री देऊन मदतीचा हात देण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास शहर उपप्रमुख मनीषा कोळी जिल्हा सचिव सिद्धाराम सवळे शहर संघटक शेखर कंटीकर जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र माने कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर पूर्व सचिव सचिव सतीश वावरे शहर उपाध्यक्ष फिरोज सय्यद सागर शिंदे आदी उपस्थित होते.

## प्रेरणा रॅलीने संभाजी आरमारची अहिल्यादेवींनी मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त वाद्यांच्या गजरात संभाजी आरमारने प्रेरणा रॅली काढत अहिल्यादेवी होळकर यांना मानवंदना दिली. संभाजी आरमार संपर्क कार्यालय ते चार हुतात्मा चौक अशी ही प्रेरणा रॅली आयोजित करण्यात आली होती. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्तीस संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली.

जयंतीच्या दिवशी अभिवादन करून न थांबता अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या २८ वर्षाच्या राजकीय कारकिर्दीमध्ये केलेल्या महान कामगिरीची प्रचिती सर्वांना व्हावी, त्यांच्या चरित्राची महती आणि माहिती सर्वदूर पोचावी या हेतूने या त्रिशताब्दी जयंती वर्षात कर्मयोगिनी आहिल्याबाई होळकर ही चरित्रात्मक पुस्तिकेचे वितरण संभाजी आरमारच्यावतीने केले जाणार आहे. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी यावेळी अहिल्यादेवींच्या खाजगी जीवनामध्ये अनंत संकटे आली तरी त्याचा राज्य कारभारावर परिणाम होऊ न देता प्रजा हिताचा कारभार करत देशभरातील हिंदू धार्मिक क्षेत्रांचा जीर्णोद्धार, धर्मशाळांची उभारणी करत धार्मिक चैतन्य निर्माण करण्याची केलेली कामगिरी महान असल्याचे सांगितले. ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या या प्रेरणा रॅलीत संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, सरचिटणीस गजानन जमदाडे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, शहरप्रमुख सागर ढगे, महिला आघाडीच्या उमा रजपूत, रेखा व्हनकडे, मनीषा महाडिक, अश्विनी गायकवाड, लक्ष्मी गायकवाड, जान्हवी पतंगे,शोभा घंटे,प्राजक्ता चव्हाण, अनिता मोटे,जिल्हा संघटक अमित कदम, नेताजी घोडके, अर्जुन शिवसिंगवाले, गुरुनाथ निंबाळे, महेश घोडके, राज जगताप, ज्ञानेश्वर डोंबाळे, राज दवेवाले, वासुदेव होणकोंबडे, राजू आखाडे,मल्लिकार्जुन पोतदार, सागर दासी, संतोष कदम, नागेश कणगी, गिरीश जवळकर ,सुरेश हिरजे,तेजस चौधरी,रवि काळे, सचिन लंगाळे उपस्थित होते.



## बुरुड समाजाच्या प्रगतीसाठी शैक्षणिक क्रांती झाली पाहिजे

### डॉ. दिपाली पुट्टेवार; इचलकरंजी बुरुड समाजातर्फे गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

गरिबीत जीवन जगणाऱ्या बुरुड समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय तरनोपाय नाही,त्यासाठी शैक्षणिक क्रांती झाली पाहिजे,असे ठाम प्रतिपादन नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील विभागप्रमुख डॉ. दिपाली पुट्टेवार यांनी केले. इचलकरंजी बुरुड समाजातील दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.त्यावेळी डॉ.पुट्टेवार ह्या बोलत होत्या.



प्रथम प्रास्ताविक समाजाचे अध्यक्ष डॉ. सुहास सपाटे यांनी केले. सर्व मान्यवरांचे स्वागत अरविंद कुकडे यांनी केले. मेनका कोरडे, बेळगाव(महिला अध्यक्षा, अखिल भारतीय बुरुड समाज), दशरथ वडतिले, (पत्रकार व अध्यक्ष, सोलापूर बुरुड समाज), डॉ. दिपाली पुट्टेवार, नागपूर या मान्यवरांचा सत्कार व त्यांचा परिचय मुकुंद सुर्यवंश यांनी यांनी करून दिलाप्रा. सुहास सपाटे ,यांनी समाज खूप वर्षांनी असा एकत्र आला म्हणून त्यांनी समाजाचे अभिनंदन केले. समाजातील लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वोपरी मदत करण्याचे अभिवचन दिले. शिक्षणात शासनाकडून असलेल्या योजनाची माहिती त्यांनी सांगितली.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथ वडतिले यांनी समाजाचे प्रबोधन केले. सौ. मेनकाताई कोरडे व डॉ. दिपालीताई पुट्टेवार यांच्याकडे असलेल्या माहितीचा समाजाने लाभ करून घ्यावा ,असे आवाहनही वडतिले यांनी केले. सरकारी वकील ॲड. रश्मी सुहास सपाटे यांनीही मार्गदर्शन केले. दिव्या सुर्यवंशी यांनी, समाजाने जास्तीत जास्त संख्येने समाजाच्या कार्यक्रमाना उपस्थित रहावे व एकत्रित यावे, जेणेकरून समाजासाठी वेगवेगळे उपक्रम राबवता येईल,असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास समाजातील जेष्ठ व महाराष्ट्र बुरुड समाजाच्या माजी विश्वस्त श्रीमती लीलाताई सपाटे ह्या उपस्थित होत्या. सूत्रसंचालन पुष्पा कुकडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री अरविंद कुकडे, राजू तेवरे, युवराज साळुंखे, मुकुंद सूर्यवंशी,अमित तेवरे, अजय कुकडे, अमोल साळुंखे, अवधूत सुर्यवंशी, श्रीधर कोरडे,राजश्री कुकडे, दिव्या सूर्यवंशी, पुष्पा कुकडे, अमृता तेवरे, सोनाली वडे, सुनिता वडे पूजा तेवरे आदींनी परिश्रम घेतले.

## डॉ. आंबेडकर अध्यासनाच्या वतीने उद्या पालि भाषा परिसंवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाअंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन आणि पालि विभाग, भाषा व वाडमय संकुल यांच्या माध्यमातून पालि भाषा परिसंवाद सोमवार दि. २ जून रोजी सकाळी १० वाजता सोलापुरातील निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती डॉ. औदुंबर मस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी भन्ते ज्ञानज्योती महास्थवीर चन्द्रपूर, भन्ते डॉ. यश काश्यपायन (जयसिंगपूर, सांगली) यांचे पालि विषयी धम्मदेसना होणार आहे. या परिसंवादामध्ये डॉ. विजय मोहिते (मुंबई) यांचेही मार्गदर्शन होणार आहे. या परिसंवादाचे उद्घाटक म्हणून अथर्व चॅरिटेबल ट्रस्टचे (गुगवाड) संस्थापक अध्यक्ष ड. सी. आर. सांगलीकर उपस्थित राहणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, तसेच अध्यासनाचे समन्वयक प्रा.डॉ. गौतम कांबळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या विषयावर चर्चा होणार आहे. या परिसंवादाचे संयोजन भाषा व वांग्मय संकुलातील पालि भाषा विभागाचे सहायक प्रा. विजयकुमार झुंबरे, डॉ. उत्तम कांबळे आणि आजी माजी विद्यार्थी करत आहेत. सर्व विद्यार्थी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. औदुंबर मस्के यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस अशोक वाघमारे, शिवपुत्र घटकांबळे, ज्ञानेश्वर कांबळे आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षपदी शाम राजेपांढरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

सोलापूर जिल्हा न्यायालयीन तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष शाम राजेपांढरे यांची महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट-क च्या उपाध्यक्षपदी, सह-सचिव म्हणून संघटनेचे विद्यमान सचिव योगीराज पैठणकर तसेच सदस्य म्हणून संघटनेचे विद्यमान उपाध्यक्ष सदाशिव जाधव यांची नियुक्ती राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट क चे विद्यमान अध्यक्ष दिगंबर निकम यांनी नुकतीच जाहीर केली.



राजेपांढरे, पैठणकर तसेच जाधव यांनी कर्मचारी हाच आपला केंद्रबिंदू मानून त्यांचे कल्याण आणि हित जपण्यासाठी पुढील काळामध्ये सतत कार्यरत राहण्याचा मानस व्यक्त केला. कोव्हिड संक्रमणाच्या काळामध्ये राजेपांढरे यांनी न्यायिक अधिकारी तसेच कर्मचारी यांचे लसीकरणाकरीता योगदान दिले.

या निवडीचे जिल्हा न्यायालयाचे प्रभारी प्रबंधक मुकुंद ढोबळे, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन किडा व कल्याण संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लिंबोळे, न्यायालयीन कर्मचारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन संजय कारले, संचालक अजित पगडयाल, नबीलाल शेख, झहीर शेख, आर. आर. फडणीस, संदीप व्हनकळस, अमित सुपाते यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## स्त्री जीवनाची परवड म्हणजेच एक भाकर तीन चुली ही कादंबरी : डॉ. भैलुमे

एक भाकर आणि तीन चुली ही श्री देवा झिंजाड यांची कादंबरी समाजातील वेगवेगळ्या प्रश्नांची उकल करणारी आहे. त्याचप्रमाणे या कादंबरीत समाज व्यवस्थेवरही भाष्य केले आहे. कादंबरीचा पट मोठा आहे. कष्टकरी महिलांचे जीवन या कादंबरीत आले असून कादंबरीत समाज वास्तवाचे दर्शन घडते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळ आला आहे. पुरुष व्यवस्थेच्या बळी पडलेल्या स्त्रियांचे वर्णन या कादंबरीत आहे.

ही एक उत्कृष्ट कादंबरी असून मराठीत अशा कादंबऱ्या कमी आहेत. यात स्त्रियांच्या वाट्याला आलेले भोग, कष्ट तर आहेत पण तरी यातील नायिका पारू ही जिद्दीने यातून कसा मार्ग काढते. परिस्थितीशी कशी लढते. याचे अत्यंत प्रत्येकाची वर्णन आले आहे म्हणूनच या कादंबरीला आजपर्यंत आठ हजार पेक्षा जास्त प्रतिक्रिया आलेल्या आहेत व जवळजवळ चार हजार लोकांनी या कादंबरीवर भाष्य केले आहे. परीक्षण लिहिले आहे, असे विचार डॉ. राजाभाऊ भैलुमे यांनी सोलापूरच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वाचन संवाद च्या आभासी कार्यक्रमात व्यक्त केले.

वाचन संवादचा हा सत्ताविसावा भाग आहे. डॉ. राजाभाऊ भैलुमे हे शिरूर येथील महाविद्यालयात प्रोफेसर आहेत. त्यांची पाच पुस्तके प्रकाशित असून १२ विद्यार्थी पीएच. डी झाले आहेत. ते एक भाकर तीन चुली या कादंबरीवर परीक्षणाचे पुस्तक संपादित करत आहेत.

या कादंबरीचे वेगळेपण वैशिष्ट्ये त्यांनी आपल्या व्याख्यानातून स्पष्ट केले. यावेळी लेखक देवा झिंजाड यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ही त्यांची पहिलीच कादंबरी असून या कादंबरीच्या तेरा महिन्यात एकोणीस आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत आणि या कादंबरीला सोळा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. देवा झिंजाड यांच्या या कादंबरीत कष्टकरी महिलांचे जीवन, तिची कुचंबणा, परवड व्यक्त झाली आहे. प्रास्ताविक डॉ. अर्जुन व्हटकर, वक्त्यांचा परिचय गोविंद काळे यांनी करून दिला. वंदना कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी केले.

समाजातील स्त्री जीवनाचे वास्तव आणि भेदक दर्शन या कादंबरीतून होते. असे त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. नरेंद्र काटीकर यांनी केले. तर बदिऊज्जमा बिराजदार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुवर्णा गुंड, डॉ. शिवाजी शिंदे, प्रा. भीम गोंडा पाटील ऑनलाईन उपस्थित होते.

## महत्वाचे...



## निंबर्गी येथील शिबीरात ६० जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ३१ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंती व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापूरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून निंबर्गी येथील ग्राम पंचायत कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून सुरेश हसापूरे यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन सरपंच श्रीदिप हसापूरे आणि अरुणकुमार बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच पिरसाब हवालदार, अप्पासाहेब माने, जगदेव ककमारे, प्रदीप खुणे, महादेव फुलारी, बसवराज माळगे, जगदेव सोड्डी, सिध्दाराम येळमंडे, यदा दुपारगुडे, संजय तांडगे, राम गुरव, गौरीशंकर कुंभार, अरविंद दुपारगुडे आदि उपस्थित होते. यावेळी ६० जणांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला.



## परांडा येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**परांडा, दि. ३१ मे-**

परांडा शासकीय विश्रामगृह येथे डीबीए समूह परांडा यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.डी बी ए समूह संस्थापक अध्यक्ष माननीय दयानंद बनसोडे, प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष आप्पासाहेब तरटे, डब्होकेट दयानंद धेंडे, प्रहार संघटनेचे जिल्हा संघटक नागनाथ नरोटे, जनरल कामगार भूम परांडा तालुका अध्यक्ष मोहम्मद शेख, यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून मागासवर्गीय समाजातील इयत्ता दहावी शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हरिभाऊ गोडगे, छगन चौधरी, विशाल जाधव, दत्तात्रय पाटील, सीताबाई पाटोळे, संतराम पाटील, अक्षय उदगे ,अनिकेत कुलकर्णी, दहावी उत्तीर्ण विद्यार्थिनी कुमारी प्राची बनसोडे, तथागत सरवदे, प्रतीक बनसोडे, सम्राट चोतमाल, मंगेश बनसोडे, शुभम सरवदे, आकाश बनसोडे, विशाल जाधव उपस्थित होते. आभार दयानंद बनसोडे यांनी मानले.

## कव्हे येथे जुगार व मटका अड्यावर धाड; एकास अटक

**बार्शी, दि. ३१ मे-**

बार्शी तालुक्यातील कव्हे, येथे दि. २९ मे बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने मौजे कव्हे येथील मारुती मंदिराजवळील पान सेंटरजवळ मटका जुगार चालविणाऱ्या एका व्यक्तीवर धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत नागनाथ महादेव लोकरे (वय ४२, रा. कव्हे, ता. बार्शी) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून जुगाराची साधने आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. पोलीस कॉन्स्टेबल सिद्धेश्वर चंद्रकांत लोंढे (ब.नं. ११३०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि. २९ मे रोजी दुपारी पोलीस कर्मचारी पो. कॉ. १६३२ उंदरे, पो. कॉ. १३८२ जाधव आणि पो. कॉ. ११९४ गायकवाड हे खाजगी वाहनाने गस्त घालत असताना त्यांना गुप्त बातमी मिळाली. मौजे कव्हे मारुती मंदिराजवळील पान सेंटरजवळ नागनाथ महादेव लोकरे हा कल्याण मटका नावाचा जुगार चालवत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी दोन पंचांना बोलावून त्यांना कारवाईची माहिती दिली आणि त्यांच्या उपस्थितीत घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांना एक व्यक्ती पांढ्या कागदावर पेनाने अंक लिहिताना दिसली. त्याला तत्काळ ताब्यात घेण्यात आले. संशयिताने आपले नाव नागनाथ महादेव लोकरे असे सांगितले. त्याच्या अंगझडतीदरम्यान त्याच्या शर्टच्या खिशात ४०० रुपये रोख, एक पांढरा कागद (ज्यावर श्री लीक २९ मे असे लिहिलेले होते आणि त्यावर अंक लिहिलेले होते), एक निळ्या शाईचा बॉलपेन आणि ९०० रुपये रोख (१० रुपयांच्या ३ नोटा आणि २० रुपयांच्या ३ नोटा) अशी जुगाराची साधने जप्त करण्यात आली. ही सर्व साधने आणि रोख रक्कम जागेवरच पंचनामा करून जप्त करण्यात आली असून, त्यावर पोलिसांचे लेबल लावण्यात आले आहे. या प्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात नागनाथ लोकरे याच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी मटका जुगार चालवत होता, असे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे कव्हे येथील अवैध जुगाराला आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. पुढील तपास बार्शी तालुका पोलीस ठाणे करत आहे.

## पाथरी शिवारात मोटारी चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले

**बार्शी, दि. ३१ मे-**

तालुक्यातील पाथरी शिवारामध्ये विहिरीतील विद्युत मोटारी चोरुन नेण्याच्या घटना सातत्याने घडू लागले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण तयार झाले आहे. मागील काही दिवसापासून विहिरीतील पाणबुडी मोटारी केबल वायरसह चोरुन नेण्याचे प्रमाण चारे व पाथरी परिसरात वाढले आहे. गुरुवारच्या दरम्यान पाथरी शिवारातून तीन शेतकऱ्यांच्या सुमारे ६० हजार रुपये किमतीच्या विद्युत मोटारी चोरी गेल्या आहेत. मुकुंद जगदाळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तालुका पोलीस ठाण्यात ५ एचपीची सुमारे २२ हजार रुपये किमतीची पाणबुडी मोटार चोरी गेल्याची फिर्याद दिली आहे. त्याचा अधिक तपास पोहेकॉ अभय उंदरे करत आहेत. या दोन दिवसात मुकुंद जगदाळे, जनक जगदाळे, बाबू कुलकर्णी यांच्या मोटारी चोरी गेल्या आहेत. तर मागील सहा महिन्यात अंबादास मोरे, हरीचंद्र जगदाळे, बिभीषण जगदाळे, नंदकिशोर जगदाळे, गोरख भराटे, सर्जेराव भराटे यांच्या मोटारी तर दोन वेळेस चोरीला गेल्या आहेत. हे शेतकरी चारे येथील आहेत. मात्र त्यांच्या शेतजमिनी पाथरी शिवारात बार्शी- येरमाळा रस्त्यावर आहेत. पाथरीच्या पुढे जुना रस्ता बंद केलेला आहे आणि नवीन रस्ता एकेरी आहेत. त्या टापूत वाहन थांबवून चोर मोटारी चोरुन घेऊन पसार होत आहेत.हा जुना रस्ता बंद करावा अशी मागणी देखील शेतकरी करत आहेत. सुमारे २० हजार ३० हजार रुपये किमतीच्या या मोटारी आहेत.

# भीमा नदीमध्ये अचानक पाणी; तीनशे विद्युत पंपात झाला बिघाड

### शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि ३१ मे -**

मे महिन्यात सतत पडणाऱ्या पावसामुळे भीमा नदीत अचानक पाणी सोडण्यात आले. त्या पाण्यामुळे दक्षिण तालुक्यातील भीमा नदीकाठावरील २०० ते ३०० शेतकऱ्यांच्या पंपात पाणी गेल्याने विद्युत पंपात बिघाड झाली आहे. त्यामुळे पंप दुरुस्तीसाठी हजारो रूपये खर्च करावे लागणार असल्याने आर्थिक फटका बसला आहे.

कर्नाटक हद्दीतील उमराणी बंधाऱ्यातुन मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने दक्षिण तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

यावर्षी मे महिन्यातच मोठ्या अवकाळी पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी दिसून येत आहे. उजनी धरण क्षेत्रात व भीमा नदी परीसरात जोरदार पाऊस झाल्याने भीमा नदीतुन पाणी सोडण्यात आले. हे पाणी दक्षिण तालुक्यातील अनेक बंधारे पार करून कर्नाटक हद्दीतील उमराणी बंधाऱ्यात पोहोचले. यापूर्वी अनेक वेळा नियम मोडून कर्नाटकने पाणी अडविले होते. मात्र यावेळी सतत पाऊस झाल्याने त्यांच्या हद्दीतील शेतीचे नुकसान टाळण्यासाठी दक्षिण तालुक्यातील शेतकऱ्यांना पूर्वसूचना न देता अचानक पाणी सोडले. त्यामुळे निश्चिंत असणाऱ्या शेतकऱ्यांना रात्री त्यांच्या विद्युत पंपात पाणी गेल्याने विद्युत पंप बिघाड झाली. म्हणून त्यांची पळापळ सुरू झाली. मात्र तोपर्यंत नदीकाठावरील २०० ते ३०० शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसयाचे सांगण्यात आले. विद्युत पंपात पाणी गेल्याने सर्व साहित्यांमध्ये बिघाड झाल्याचे सांगण्यात येत आहे. रात्री अचानक पाणी आल्याने मोटारी काढण्यास संधी मिळाली नाही. त्यामुळे दहा फूट खोल पाण्यात मोटारी राहिल्याने सर्व पार्टस खराब झाल्याचे शेतकऱ्यांकडन सांगण्यात येतआहे.

ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाइ असताना सोलापूर शहराला पिण्यासाठी पाणी सोडण्यात आल्यानंतर उमराणी बंधाऱ्यात पाणी साठवण केले जाते. यावेळी कर्नाटक हद्दीतील उमराणी बंधाऱ्याच्या पाण्यामुळे शेतीसाठी पाणी वापरले जाते. त्यामुळे दक्षिणमधील शेतकरी दोन दिवसांनंतर पाणी येणार असे गृहीत धरले होते. उमराणी बंधारा भरल्यानंतर दोन दिवसांनी पाणी येणे अपेक्षित असताना अचानक रात्री पाणी आल्याने दक्षिणच्या शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. कर्नाटक सरकारच्या अशा मनमानी कारभारामुळे दक्षिणच्या शेतकऱ्यांना हजारो रूपयांचा फटका बसला आहे.

> **उमराणी बंधाऱ्यातील सोडलेल्या पाण्यामुळे नुकसान**
>
> भीमा नदी परीसरात सतत पाऊस झाल्याने दक्षिणमधील बंधारे भरून घेण्यासाठी पाणी सोडण्यात आले. उमराणी बंधारा भरून पाणी खाली येण्यास दोन दिवस अवधी असताना अचानक उमराणी बंधाऱ्याची दरवाजे रात्री उघडण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांना विद्युत मोटारी काढण्यासाठी संधी मिळाली नाही. त्यामुळे ३०० शेतकऱ्यांच्या मोटारी बिघडल्या आहेत. एक मोटार दुरूस्तीसाठी पाच हजार रूपये खर्च आहे. ऐन पावसाळ्यात शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे पूर्वसूचना देऊन पाणी सोडण्यात यावे.
>
> **- विक्रांत हविनाळे, शेतकरी, बरूर**

## बार्शीत मुसळधार; २५५ मिमीची नोंद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मे-**

यावर्षी मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने कहर केला असून सलग तेराव्या दिवशी ही बार्शी तालुक्यातील दहाही मंडळात मुसळधार पाऊस पडला. गुरुवारी पडलेला पाऊस हा सरासरी ३४ मिमी एवढा आहे तर १३ दिवसात २५५ मिमी म्हणजे सरासरीपेक्षा १२ पट पावसाची नोंद झाली आहे. गेल्या १३ दिवसांपासून कमी-अधिक प्रमाणात हा पाऊस पडत आहे. गुरुवारी दुपारी बार्शी तालुक्यातील दहा ही मंडळात मुसळधार पाऊस (अतिवृष्टी) पडला आहे. हा पाऊस तब्बल ३४ मिमी एवढा आहे. यामुळे अनेक गावांत जमिनीतील माती वाहून गेली आहे. नदी नाले व ओढ्यांना ही पहिल्यांदाच मे महिन्यात पाणी आले आहे. आजवर तालुक्यातील एकूण २५५ मिमी एवढ्या पावसाची नोंद झाली आहे.

२९ रोजी पडलेला एकूण ३४ आणि मे महिन्यातील १३ दिवसांत २५५ मिमी पाऊस पडला आहे.

> **एकूण पाऊस खालीलप्रमाणे-**
>
> बार्शी- ५४ (२२९), आगळगाव- ३० (२२६), वैराग- ३७ (२७५), उपळे दुमाला- ४३ (३५८), गौडगाव- ३७ (२४७), पांगरी- २३ ( २५३), पानगाव- २१ ( २१९), नारी- २१ (१८४), सुरडी- ४० (२७३), खांडवी- ३९ (२८६)





## सांगोला न.प. तर्फे संविधान उद्देशिका वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३१ मे-**

सांगोला नगरपरिषदेतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल घर घर संविधान या कार्यक्रमांतर्गत भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या फ्रेम चे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांचे हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. तसेच नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी यांच्याम ध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्यासाठी कोल्हापूर येथील धनवर्धन या संस्थेच्या संस्थापिका निर्मला कोळवणकर व सांगली येथील व्याख्याते संतोष सिरशीकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान ठेवण्यात आले होते.

संतोष सिरशीकर यांनी आर्थिक नियोजनाचे महत्व विषद करून म्युच्युअल फंड, एसआयपी व इतर माध्यमांत गुंतवणूक करून आर्थिक उद्दिष्ट कसे गाठू शकतो याबाबत सोप्या उदाहरणासह मार्गदर्शन केले. निर्मला कोळवणकर यांनी लवकर गुंतवणुकीस सुरुवात केल्यास चक्रवाढ व्याजाचा जास्तीत जास्त फायदा घेऊन अधिकाधिक आर्थिक लाभ कसा मिळू शकतो याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उद्देशिकाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. सूत्रसंचालन योगेश गंगाधरे यांनी केले. आभार प्रियांका पाटील यांनी मानले.

> भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानापैकी एक असून संविधानाची उद्देशिका ही संविधानाचे सार असून सर्वांनी आपल्या घरात दर्शनीय भागात सदर उद्देशिकाची फ्रेम लावावी.
>
> **-डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी, सांगोला न.प.**

## 'दक्षिण'च्या तहसीलदारांकडून रस्ता तक्रारीचा त्वरित निपटारा

### दहा दिवसांत रस्ता मोकळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्याचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्याकडे आहेरवाडीतील शेतकऱ्यांची रस्ता अडवल्याबद्दल आठ मे रोजी तक्रार आली होती. त्यांनी यावर तत्काळ सुनावणी घेऊन १९ मे रोजी रस्ता खुला करण्याबाबत आदेश दिला. त्यांच्या आदेशान्वये पोलीस बंदोबस्तात जेसीबीद्वारे रस्ता खुला झाल्याने शेतकऱ्यांचे समाधान व्यक्त केले आहे.

अलीकडच्या काळात शेतरस्ता आडविण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. त्यामुळे तहसील कार्यालयात रस्ता मागणी केल्यानंतर अनेक तारखा पडून सुनावणी सुरू होतात. प्रत्येक सुनावणीदरम्यान दावे प्रतिदावे सांगितल्यानंतर सुनावणी पुढे सुरूच राहते. त्यामुळे दोन-चार वर्ष रस्ता तक्रार सुरू राहते. तोपर्यंत दोन्ही शेतकरी वेळ व पैसा वाया गेल्याने मेटाकुटीस येतात. मात्र रस्त्याचा निकाल लागत नाही. तहसीलदारही शासकीय कामांमध्ये व्यस्त असल्याने स्थळपाहणी करून रस्ता देण्यास चालढकल करतात. मात्र दक्षिणचे तहसीलदार जमदाडे प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित निर्णय देत आहेत. त्यामुळे ऊसवाहतुकीसह अनेक विषय मार्गी लागत आहेत. आहेरवाडी शिवारात गेल्या पाच वर्षांपासून अडवण्यात आलेला शिवार रस्ता तहसीलदार जमदाडे यांच्या आदेशान्वये शुक्रवारी खुला करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.हा रस्ता बंद झाल्यामुळे फुंडिफळे यांच्यासह सोमनाथ बिराजदार, गौराबाई बिराजदार, विजय बिराजदार, शिलसिद्ध बिराजदार, राघवेंद्र बिराजदार, संजीव करजगी, जगदीश करजगी, महादेव करजगी, सुनंदा कोरे, विजयश्री गाडे, मनीषा करजगी यांना शेताला जाण्यास अडवण होती. तहसीलदार जमदाडे यांनी तक्रारीची दखल घेत तो रस्ता खुला करण्याचा आदेश मंडल अधिकारी यांना दिला. मंडल अधिकारी रियाज भाईजान, तलाठी विठ्ठल शिंदे व सहाय्यक फौजदार राजेश निंबाळे यांच्या पथकाने शुक्रवारी आहेरवाडी शिवारात जाऊन तो रस्ता खुला केला . महसूल खात्याने शेतरस्ताबाबत तत्काळ दखल घेऊन आदेश दिल्यास शेतकऱ्यांच्या अडचणी दूर होणार आहेत. त्याचे हे उदाहरण आहे.

> **शेतीरस्त्याबाबत तक्रार असल्यास संपर्क साधावा**
>
> 
>
> 'दक्षिण' मधील अनेक गावात शेती रस्त्याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. वहिवाटानुसार रस्ता असताना अनेक वेळा शेतकऱ्यांकडून विरोध करण्यात येते. त्यामुळे शेतीची कामे करताना अडवणी येतात. म्हणून शेतकऱ्यांनी वहिवाटाची अथवा नवीन रस्त्याबाबत तक्रार असल्यास दक्षिण तहसील कार्यालयाशी संपर्क साधावे. प्रत्येक शेतकर्याला शेतरस्ता देण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांनीही रस्ता अडवून अडचण करण्यापेक्षा एकमेकांना सहकार्य करून रस्ता देण्यासाठी पूढे यावे .
>
> **- किरण जमदाडे, तहसीलदार, द. सोलापूर**

## जि.प. सेस फंडातून मिळणार अवजारे

### पंचायत समितीकडे अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मे-**

ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांची गरज व मागणी लक्षात घेऊन सोलापूर जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून बार्शी तालुक्यातील शेतकरी बांधवांना विविध औजारांसाह आवश्यक उपकरणे, ट्रॅक्टर चलीत अवजारे, कृषि सिंचनासाठी सुधारित अवजारे ही ५० टक्के अनुदानावर डी. बी. टी. धोरणानुसार दिली जाणार असल्याची माहिती बार्शी पंचायत समितीचे कृषि अधिकारी किशोर अंधारे व कृषि विस्तार अधिकारी दिपक चव्हाण यांनी दिली.

अवजारे व इतर लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना २० जून २०२५ पर्यंत बार्शी पंचायत समितीमध्ये अर्ज करावा लागणार आहे. या योजनेत अल्पभूधारक, दिव्यांग, महिला शेतकरी यांना प्राधान्य दिले जाणार आहे. लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ७/१२ उतारा, ८ अ, आधार कार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत व दिव्यांग लाभार्थीसाठी दिव्यांगत्वाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत या कागदपत्रांसह आपले अर्ज बार्शी पंचायत समितीमध्ये सादर करावेत. डी. बी. टी. योजनेतून लाभार्थीची निवड झाल्यावर शेतकऱ्यांनी एक महिन्याच्या आत खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून अवजार खरेदी करावी लागणार आहेत.

तसेच खरेदी करावयाची शेती अवजारे अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी परीक्षण करून बीआयएस अथवा अन्य संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार, तांत्रिक निकषानुसार असणे आवश्यक असणार आहे. लाभार्थी निवड लॉटरी पद्धतीने केली जाईल. अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यावर इन्कद्वारे डी. बी. टी. प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

> **या साहित्याचा समावेश**
>
> श्री पिस्टन स्प्रे पंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप, ब्रश कटर, सोलार इनसेक्ट ट्रॅप, रोटावेटर, पलटो नांगर, पॉवर विडर, पेरणी यंत्र, ५ एच. पी. सबमर्सिबल पंपसंच, डिझेल इंजिन, कडबा कुट्टी, ताडपत्री, स्त्रो फिल्टर ही अवजारे तसेच मधुमक्षिका पेटी, ताग, व धैंचा या हिरवळीच्या खताच्या बियाण्याचा देखील समावेश या वर्षी करण्यात आला आहे.

## सांगोल्यात उद्या तालुकास्तरीय कविसंमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३१ मे-**

येथील महाराष्ट्र साहित्य परिषद, नगर वाचन मंदिर, लायन्स क्लब, रोटरी क्लब व अर्बन को-ऑप बँक यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.२ जून रोजी सायं.५ वा. अर्बन को-ऑप.बँक सभागृहात तालुक्यातील निमंत्रित कवींचे कविसंमेलन होणार आहे.

यासाठी प्रमुख पाहुणे डॉ. अविनाश सांगोलेकर आहेत. तर अध्यक्षपदी रं. ता. चोरमुले आहेत. यामध्ये शिवाजी बंडगर, राधिका प्रेमसंस्कार, तानाजी वाघमारे, साबळे गुरुजी, ना.मा. कांबळे, संतोष जगताप, ॲड. उदय दौंडे, दमयंती कुलकर्णी, पुष्पलता मिसाळ, सुशिला नांगरे पाटील, योजना मोहिते, मनीषा ठोंबरे, हेरंब गुळमिरे, सुवर्णा तेली, अनिल केंगार, गौसपाक मुलाणी, गीता गुळमिरे, आश्लेषा मोदी, सुप्रिया कांबळे, जान्हवी सावंत, सीमा गायकवाड, सुरेखा कुलकर्णी, जयश्री पाटील, तेजश्री बाबर, प्रज्ञा देशपांडे, विद्या शिर्के, सावित्री बाबर, बशीर तांबोळी व सूत्रसंचालक सुनील जवंजाळ हे कविता सादर करणार आहेत. उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, चेअरमन डॉ.प्रभाकर म ाळी,उन्मेष आटपाडीकर, विकास देशपांडे, प्रा.धनाजी चव्हाण यांनी केले आहे.

## करमाळा पोलिसांची कामगिरी
# दीड लाखांचा ६ किलो गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३१ मे -**

करमाळा पोलिसांनी दबंग कामगिरी करत विविध गुन्ह्यातील गुन्हेगारांच्या मुस्क्या आवळण्यास सुरुवात केली आहे. दि.२९ रोजी गोपनियरित्या मिळालेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी आपल्या साथीदारांसह दीड लाख रुपयांचा सहा किलो गांजा जप्त केला आहे. यातील आरोपीलाही पकडले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार हवालदार पांडूरंग तुकाराम आरकिले यांना गोपनिय खबर मिळाली की, जेऊर (ता. करमाळा) येथे एक इसम गांजा विक्रीकरीता येणार आहे. त्याबाबत मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील यांना कलम ४२ (१) (२) एन.डी.पी.एस. ॲक्टप्रमाणे प्रथम खबर अहवाल दोन प्रतिमध्ये तयार करून छापा कारवाईची परवानगीचे अधिकारपत्र प्राप्त करून घेवून छापा कारवाई करीता संपुर्ण सिल साहित्य, शासकीय पितळी सिल, कार्बन व इलेक्ट्रॉनिक वजन काटा, लॅपटॉप, प्रिन्टर, बॅटरीसह पो.नि. रणजीत माने, सहा.पो.नि. पोपट टिळेकर, पोहवा लोहार, पोहवा आरकिले, पोहवा शेख, पोहवा ढेंबरे, पोना गोरे, पो. अंमलदार दहिहांडे, चापोशि बारकुंड दोन पंच, वजनकाटाधारक, असे सरकारी वाहन व खाजगी वाहनाने छापा कारवाई करीता रवाना झाले.





दिनांक ३० मे रोजी दुपारच्या सुमारास जेऊर, ता. करमाळा येथे पोलिसांच्या पथकाने सापळा रचण्यात आला. मिळालेले खबरीप्रमाणे एक इसम पांढ्या रंगाची बॅग घेवून जेऊर टेंभुर्णी बायपास रोड, जय मोटर गॅरेज जवळ जेऊर, ता. करमाळा येथे जेऊरच्या दिशने चालत जात असताना दिसला. त्याचा पोलीस पथकास संशय आला. त्वरीत पोलीस पथकाने सदर इसमास घेराव टाकून पो. नि. रणजीत माने यांनी त्यास त्यांची, सोबतचे पंच व पोलीस पथकाची ओळख करून देवुन आपले ओळखपत्र दाखवुन पोलीस असल्याचा परिचय दिला. सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव महादेव बाबुराव फाळके वय ६८ वर्षे, रा. गोविंद बापु नगर, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर असे सांगितले. त्या इसमांची अंगझडती व त्याच्या ताब्यातील पांढ्या रंगाच्या बॅगेची झडती घेतली असता, त्यामध्ये दोन प्लास्टिकच्या पिशव्या मिळून आल्या व त्यात १,५०,२००/- रुपये किंमतीचा हिरव्या रंगाची पाने, फुले, काड्या, बिया असलेला असा एकूण ०६ किलो ०८ ग्रॅम वजनाचा गांजा मिळून आला आहे.

तो पंचाच्या समक्ष पोनि रणजीत माने यांनी जप्त करून महादेव बाबुराव फाळके (वय ६८ वर्षे) रा. गोविंद बापु नगर, जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापूर यास गुन्ह्याचे तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्या विरुद्ध पोलीस हवालदार पांडूरंग आरकिले यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) (पप) (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करून सदर गुन्ह्याचा तपास सहा. पो.नि. श्री. पोपट टिळेकर यांना देण्यात आलेला आहे. त्यांनी गुन्ह्यातील आरोपी महादेव बाबुराव फाळके यास अटक करून मा. कोर्टात हजर केले असता, त्यास मा.न्यायालयाने दोन तारखे पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

या कामगिरीमुळे करमाळा पोलीसांच्या दबंग कारवाईचे तालुका परिसरात कौतुक होत आहे.

> **या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झाली कारवाई**
>
> सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, करमाळ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरिक्षक रणजीत माने, सहाय्यक पोलीस निरिक्षक पोपट टिळेकर, पोहवा अजित लोहार, पोहवा आरकिले, पोहवा शेख, पोहवा ढेंबरे, पोना गोरे, पो.शि. दहिहांडे, पो.शि. बारकुंड यांनी केली आहे. सदरच्या कामगिरीने गुन्हेगारांच्या मुस्क्या अवळण्याचा पोलीस दलाची सर्वत्र वाहवा होत आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अंजनगावच्या पाटील कुटुंबाचे खा. मोहिते-पाटील यांच्याकडून सांत्वन

**माढा, दि. ३१ मे-**

माढा तालुक्यातील अंजनगाव (खे) येथील बाळासाहेब माणिक पाटील या शेतकऱ्याचा १९ मे रोजी वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला. खासदार धैर्यशील मोहिते पाटील पाटील यांनी या कुटुंबाची सांत्वनपर भेट घेत त्यांच्या कुटुंबाची विचारपूस केली.

माढा तालुक्याच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी अंजनगाव (खे) येथे बाळासाहेब पाटील यांच्या घरी भेट दिली. बाळासाहेब पाटील या



शेतकऱ्याचा १९ मे रोजी झालेल्या मान्सून पूर्व पावसात वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबाचे संत्वन करून खासदार धैर्यशील मोहिते पाटील त्यांनी पाटील कुटुंबीयांला लवकरात लवकर शासनाकडून मदत केली जावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यावेळी त्यांच्यासोबत सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे, रामकाका मस्के, दिपक आबा देशमुख, गोविंद भाऊ पवार, दिनेश जगदाळे, राजकुमार मोहिते तसेच इतर गावकरी उपस्थित होते. पाटील कुटूंबाच्या पाठीशी असल्याचे श्री. मोहीते पाटील यांनी सांगितले.



### महत्वाचे...



## कर्मवीरांच्या विचारांची नव्याने पेरणी करुया : कृष्णात खोत

**बार्शी, दि.३१ मे-**

अराजक वातावरणाने व्यापलेला समाज हा चांगूलपणाचा आव आणत असून, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या चांगल्या विचारांची नव्याने पेरणी करुन ही अराजकता संपवली पाहिजे असे प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक कृष्णात खोत यांनी केले. येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार, सदस्य विष्णू पाटील, माजी प्राचार्य सोपानराव मोरे, विश्वस्त डॉ. चंद्रकांत मोरे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे खोत म्हणाले की, आपण माहितीलाच ज्ञान म्हणून लागलो असून, ज्ञान मिळविण्याच्या वृत्तीची जोपासना केली पाहिजे. भारतीय लोकांची अल्प स्मृती असल्याने राजकारणी व्यक्ती समाजात भ्रम निर्माण करत आहेत. हवा तसा कारभार करत असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. यादव यांनी कर्मवीर डॉ. जगदाळे यांना अपेक्षित असणाऱ्या विचारांचा वारसा आम्ही पुढे घेऊन जात असल्याचे सांगितले. प्रास्ताविक खजिनदार जयकुमार शितोळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्र. प्राचार्य डॉ. विष्णू शिखरे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. आसावरी फडतारे यांनी केले. सहसचिव अरुण देबडवार यांनी आभार मानले.



## मंद्रूपमध्ये अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

**मंद्रूप, दि.३१ मे-**

पुण्यश्लोक राज्यमाता अहिल्यादेवी होळकर योची ३००वी जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. मळसिद्ध देवस्थान कमिटीचे अध्यक्ष व उत्सव समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आला. वॉर्ड क्रमांक तीनमधील नेहरू चौक येथे मान्यवरांच्या हस्ते मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी भाजपाचे गौरीशंकर मेंडगुदले, मळसिद्ध पुजारी, ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, सुरेश पाटील, बाळासाहेब उत्तरे, बाळासाहेब देशमुख, नितीन टेळे, रमेश वाघमोडे, चेमन देशमुख, सचिन वराडे, अनिकेत पाटील, तमणा पुजारी, सुनिल व्हनमाने, भारत वाघमोडे, बिरू व्हनमाने, सुरेश देशमुख, अमोगसिद्ध बोराळे आदि उपस्थित होते. ४ जूनपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आली आहे.

## बार्शीत शनिवारी पत्रकार पाल्यांचा सन्मान व शालेय साहित्य वाटप

**बार्शी, दि.३१ मे-**


तालुक्यातील पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि पत्रकारांच्या परिवाराचा स्नेहमेळावा शनिवारी दि.७ मे रोजी सकाळी ११ वाजता रेल्वे स्टेशन रोडवरील माऊली लॉन्स येथे होणार असल्याची माहिती व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ यांनी दिली. राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राज्याध्यक्ष अनिल मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ यांच्या पुढाकाराने सुमारे १०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले जाणार आहे. यावेळी सुयश विद्यालयाचे संस्थापक शिवदास नलावडे, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अरुण बारबोले, बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका वर्षा ठोंबरे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे पी. टी. पाटील, व्हाईस ऑफ मीडियाचे शिक्षण विंग प्रमुख चेतन कात्रे आदी उपस्थित राहणार आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केलेले पत्रकार पाल्य हर्षद आनंद शेटे (दहावी ९२ टक्के), तन्वी उमेश काळे (दहावी ९० टक्के), सुरभी चंद्रकांत करडे(दहावी ८४ टक्के), साक्षी प्रदीप माळी (बारावी ७८ टक्के) यांचा आणि साक्षी प्रशांत काळे (फिजिओथेरपिस्ट) हिने वैद्यकीय परीक्षेत उज्ज्वल यश मिळविल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार केला जाणार आहे. या कार्यक्रमास पत्रकारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कुंकूलोळ यांनी केले आहे. हर्षद लोहार, शाम थोरात, अस्लम काजी, अमोल आसबे प्रयत्न करीत आहेत.

# अहिल्यादेवी होळकर यांचे लोककल्याणकारी कार्य दिशादर्शक

**● बाजार समितीचे संचालक सुरेश हसापूरे : निंबर्गीसह जिल्ह्यात विविध ठिकाणी अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मे-**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी राज्यकारभार करताना लोककल्याणाबरोबर आदर्श प्रशासक म्हणून अलौकीक कार्य केले आहे. त्यांनी प्रशासक म्हणून एकाच वेळी अनेक भूमिका निभावल्या आहेत. शिवाय तत्वज्ञानी आणि कुशल संघटक असल्यामुळे शत्रूंनाही सळो की पळो केले होते. त्यांचे सर्वसमभावाचे विचार, सतीसाठी केलेले कार्य, मंदिर वाचविण्यासाठीचे प्रयत्न, शेतकरी हितकारक निर्णय आदि कार्य दिशादर्शक आहे. त्यामुळे आजच्या तरूणांनी अहिल्यादेवी यांचे



विचार आत्मसात करावेत, असे आवाहन सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापूरे यांनी केले.

निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात श्री. हसापूरे बोलत होते. यावेळी सरपंच श्रीदीप हसापूरे, उपसरपंच पिरसाब हवालदार, अप्पू माने, जगदेव ककमारे, प्रदीप खुने, महादेव फुलारी, जगदेव सोड्डी, बसवराज माळगे, यदा दुपारगुडे, संजय लांडगे, मंडळाचे अध्यक्ष संजय बंदीचोडे, उपाध्यक्ष बाबुराव लांडगे, सचिव अजय माने, खजिनदार राहुल नायकोडे, बीराप्पा हलबाणे, उमेश माने, विकास येळबंडे, आकाश येळबंडे, महादेव हलबने, कृष्णा हलबने, कृष्णा वटवटे, मल्लिनाथ येळबंडे, दर्शन लांडगे, बीरप्पा लांडगे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### मध्यवर्ती जयंती उत्सव समिती, वैराग

वैराग येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन वैरागचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे व माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर, वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, मकरंद निंबाळकर, सुभाष शेळके यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अरुण सावंत, नानासाहेब धायगुडे, वैजीनाथ आदमाने, नगरसेवक नागनाथ वाघ, नंदकुमार पांढरमिसे, पत्रकार कालिदास देवकते, प्राचार्य खंडेराया घोडके, डॉ. पोपट काळे, सोलापूर जिल्हा भाजप प्रवक्ता प्रफुल्ल भालशंकर आदी मान्यवर उपस्थित होते. उत्सव मंडळाचे अध्यक्ष सचिन पांढरमिसे, उपाध्यक्ष कुलदीप ढेकळे, खजिनदार शंकर ढेकळे, प्रशांत कोळेकर, दत्ता घोडके, भैय्या कोळेकर यांनी परिश्रम घेतले. रिपाई बार्शी तालुका अध्यक्ष दत्तात्रय क्षीरसागर, महेंद्र निंबाळकर, भारत ठोंबरे, बाबा शेख, दादा सातपुते, दीपक लोंढे, धैर्यशील खेंदाड, समीर शेख, केतन ढेकळे, अण्णा ढेकळे, प्रशांत कोळेकर, गोटू ढेकळे, अनिल पांढरमिसे, नगरोप बागवान ,राजाभाऊ पांढरमिसे आदी मान्यवर उपस्थित होते. भारतीय रिझर्व बँक आणि केंद्र शासनाने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त तीनशे रुपयांचे नाणे लोकार्पण केले या निर्णयाचे वैराग भागातील नागरिकांनी स्वागत केले आहे.

### समस्त ग्रामविकास मंडळ, सुळेवाडी

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी आरटीओ हनुमंत सुळे, नाथा सोलंकर, महादेव सुळे, अण्णा सुळे, संतोष सुळे, बापुराव सुळे, बाबुराव सुळे, पांडुरंग इरकर, विक्रम सुळे, संजय दोलताडे, संजय सुळे, दत्ता ढेरे, राहुल जरग, शरद दोलताडे, विश्वंभर सुळे, ग्रामसेवक सुधाकर मुंगुसकर, निशांत दोलताडे, लक्ष्मण सुळे, नामदेव सोलंकर, सुखदा झिंबल, कृष्णा सुळे, यंगा सूळे, प्रदीप सुळे, राहुल सुळे, धनाजी बोडरे, उमाजी बोडरे, नंदु मोटे, संतोष सुळे, रामा सुळे, वादळ ग्रुप, श्रीकृष्ण मित्र मंडळ, जय अहिल्या ग्रुप, विठ्ठल दयाजी मंडळ कार्यकर्ते उपस्थित होते.



### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या सत्तेचा वापर रयतेच्या कल्याणासाठी केला. या महाकर्तृत्ववान महिलेनं 'रयतेचं राज्य' चालवण्याचा आदर्श घालून दिला. समाजातील उपेक्षित घटकांच्या हिताची जपणूक करणाऱ्या एक जबाबदार राज्यकर्त्या आणि कुशल प्रशासक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना त्रिशताब्दी जयंतीदिनी विनम्र अभिवादन. वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी यांच्या हस्ते पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य वीरेश थळंगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, सिध्दाराम भैरामडगी, प्राध्यापक संतोष शिंदे.बसवराज दुधगी, गंगाधर बिराजदार, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते.



### संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप

मंद्रुप (ता.दक्षिण सोलापूर) येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंतीनिमित्त श्रमदान, व्याख्यान, वृक्षारोपण, रील्स बनवणे व प्रतिमापूजन आदि उपक्रम घेण्यात आले.

विद्याथ्यानी परीसर स्वच्छता अभियान राबविले. यामध्ये महाविद्यालयातील परीसर स्वच्छ केला. दि. २८ मे रोजी संगमेश्वर कॉलेज येथील प्रा. सोनाली गिरी यांचे अहिल्यादेवी होळकर जीवन व कार्य याविषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. दि. ३० मे रोजी रील्स बनवण्यात आल्या. यामध्ये प्रणाली व्हनमाने, मळसिध्द व्हनमाने यांनी अहिल्यादेवी यांच्या वेशभुषेसह रील्स प्रसारीत केल्या. दि. ३१ मे रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव एम. डी. कमळे, विश्वस्त नागेश बिराजदार, प्राचार्य डॉ एम. एन. जगताप व सेवानिवृत्त प्राध्यापक एस.डी. शेख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्रा. डॉ. जवाहर मोरे, प्रा. डॉ. दिपक देडे, प्रा. श्रीमती बी. एस. कोरे, प्रा. डॉ. शिवानंद तोरवी यांनी परीश्रम घेतले.



### विविध संस्था व संघटना, पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे पुणयशलोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त निमीत्त विविध संस्था व सामाजिक संघटना यांच्या वतीने बसस्थानकावरील अहील्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी पिलीवचे माजी सरपंच अमोल मदने, पिलीव विकास सोसायटीचे चेअरमन संतोष उर्फ आनंद पाटील, झिंजेवस्तीचे माजी सरपंच अरुण मदने,कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील, पुरुषोत्तम मदने,यूवा नेते सागर शेंडगे, प्रगतशील बागायतदार विजय शंकर मदने पाटील, दादासाहेब वगरे, देवीदास घेरडे, विजय मदने, काळे तसेच नागरी आघाडीच्या वतीने ही जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी अध्यक्ष आरिफखान पठाण, अमोल मदने, कल्याण जावळे, उमेश सरवदे, कुमार भैस, नानासाहेब उर्फ रामचंद्र देशमुख, संतोष पडळकर यावेळी उपस्थित होते. तसेच नितीन कपने,लहु पाटील, कुबेर कपने, शुभजित नष्टे मान्यवरांनी अहील्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले.



### समस्त ग्रामस्थ, उमरड

उमरड (ता. करमाळा) येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन पोलीस पाटील अंकुश कोठावळे सह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक फोजमल पाखरे यांनी केले. यावेळी प्रा. नंदकिशोर वलटे यांनी अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट उलगडून सांगितला तसेच महापुरुषांचे विचार वास्तवात जगण्याची गरज असल्याचे सांगितले. यावेळी आदिनाथ कारखान्याचे संचालक राजाभाऊ कदम यांचेही भाषण झाले. यावेळी मा.सरपंच बापूराव पडवळे, ग्रा.पं.सदस्य चांगदेव चौधरी, मा.सरपंच दादासाहेब मारकड, प्रशांत बदे, देविदास पाखरे मेजर, भगवान चौधरी, रसूल शेख, विकास बदे, वि.का. सोसायटी सदस्य जनार्धन मारकड, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष संजय कोठावळे, महावीर जगताप, शैलेश बदे, दादा कदम, शंकर लोखंडे आदि मान्यवर उपस्थित होते. नियोजन सागर मारकड, बालाजी पाटील, आदित्य पाटील, श्रीकांत मारकड, विशाल मारकड, प्रणव मारकड, दादा मारकड, दासा लोखंडे, ज्ञानेश्वर मारकड, भाऊ मारकड यांनी केले.

# बोगस बियाणे व खतांवर कारवाईसाठी 'दक्षिण' कृषी कार्यालय सतर्क

**तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे ॲक्टीव्ह मोडवर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यात यंदा मान्सूनपूर्व पावसाने चांगली हजेरी लावल्याने जमिनीमध्ये पेरणी योग्य ओल तयार झाली आहे. यामुळे खरीप हंगामाच्या पेरणीला अनुकूल वातावरण निर्मिती झाली आहे. यावर्षी दक्षिण सोलापूर तालुक्यात पेरणीसाठी ५५ हजार ५४८ हेक्टर पेरणीसाठी प्रस्तावित क्षेत्र असून पेरणीसाठी लागणारे खत आणि बियाणांचा साठाही पुरेसा उपलब्ध असून खरीप पेरणीसाठी १७ हजार ४३३ क्विंटल बियाणे उपलब्ध होणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांनी दिली आहे.

यावर्षी खरीपमध्ये पेरणीसाठी अनुकूल पाऊस झाल्याने शेतकरी पेरणीच्या तयारीस लागले आहेत. पण सतत सुरू असलेल्या पावसामुळे जमिनीमध्ये वापसा नसल्यामुळे शेतकरी पेरणीच्या प्रतीक्षेत आहेत. खरिपाच्या पेरणीसाठी लागणारे बियाणे आणि खते खरेदी

| रासायनिक खतांचा मंजूर साठा | |
|---|---|
| युरिया | ६५९९ मेट्रीक टन |
| डीएपी | १५९६ मेट्रीक टन |
| एसएसपी | १८९४ मेट्रीक टन |
| एमओपी | ५४० मेट्रीक टन |
| मिश्र खते | ५१४७ मेट्रीक टन |
| एकूण | १५७७७ मे.टन |

| पीक निहाय पेरणीसाठी प्रस्तावित क्षेत्र | |
|---|---|
| तूर | २१,६२५ हेक्टर |
| उडीद | २०५३२ हेक्टर |
| सोयाबीन | ९४७९ हेक्टर |
| मूग | १७५० हेक्टर |
| मका | १००२ हेक्टर |
| भुईमूग | ११७० हेक्टर |
| एकूण | ५५५४८ हेक्टर |

| प्रस्तावित क्षेत्रासाठी बियाणे | |
|---|---|
| तूर | ३२४३ क्विंटल |
| उडीद | ३०७९ क्विंटल |
| सोयाबीन | ९४७९ क्विंटल |
| मूग | २६२ क्विंटल |
| मका | २०० क्विंटल |
| भूईमूग | ११७० क्विंटल |
| एकूण | १७४३३ क्विंटल |

करण्यासाठी लगबग सुरू आहे. दक्षिण तालुक्यासाठी १५७७७ मेट्रिक टन रासायनिक खतांचा साठा मंजूर असून अॅपद्वारे विक्रेत्यांकडील खताचा साठा पाहता येणार आहे.

दक्षिणमध्ये बोगस बियाणे व बोगस खतविक्री तसेच लिंकींग आढळून आल्यास कारवाई करण्यात येणार आहे. शेतकर्यांनी कृषि विभागाकडे तक्रार केल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी मुळे यांनी सांगितले.

### कृषी विभागाने कारवाई करावी

खरीप हंगामास सुरूवात झाल्यानंतर खत विक्रेत्यांकडून बोगस बियाणे व बोगस खतविक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात येते. शिवाय लिंकींग करून आर्थिक लुबाडणूक होते. त्यामुळे कृषी विभागाने दक्ष राहून खते व बियाणे विक्रेत्यांवर कारवाई करावी. शिवाय अधिक दराने बियाणे व खते विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**- विजयकुमार मेंडगुदले,** शेतकरी मंद्रुप

शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी कृषी विभागाचे कृषिक मोबाईल ॲप प्ले स्टोअर वरून डाऊनलोड करावे. ॲपच्या माध्यमातून गावातील खत विक्रेत्याकडे कोणत्या खतांचा साठा किती आहे हे पाहता येणार आहे. चालू खरीप हंगामात खत विक्रेत्याने खताची कृत्रिम टंचाई, लिंकिंग, जास्त दराने विक्री करणे, पावती न देणे आणि आणखी काही तक्रारी असल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा कृषी अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे तक्रार किंवा संपर्क करावा.

**- अवधूत मुळे,**
तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर